मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | शनिवार, २८ जून २०२५ | वर्ष: १० | अंक: ५९ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात नाशिक येथील उद्योगपतीचा मृत्यू

**नाशिक, दि. २७ प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. मुंबईहून नाशिककडे जाणाऱ्या आलिशान मर्सिडीजता भीषण अपघात झाला. मर्सिडीजने तीनवेळा पलटी मारली आहे, यामध्ये नाशिक येथील उद्योगपती सुनील हेकरे यांचा मृत्यू झाला.त्यांच्या पत्नी व दोन मुलं गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईहून नाशिककडे ही कार जात होती. समृद्धी महामार्गावर इगतपुरी बोगद्याच्या पुढे शहापूर हद्दीत त्यांच्या गाडीला अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की, गाडीने तीन वेळा पलटी मारली आणि सुनील हेकरे हे गाडीतून बाहेर फेकले. यामध्ये त्यांना गंभीर दुखापत झाली. प्रचंड रक्तस्रावामुळे त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, यामुळे जागेवरच मृत्यू झाला.

# पुरीत रथ यात्रेस भव्य आरंभ



**पुरी, दि. २७ वृत्तसंस्था**

**ओडिशामधील पुरी येथे भगवान जगन्नाथांची रथ यात्रा सुरू झाली आहे. ही भव्य यात्रा पुरीच्या जगन्नाथ मंदिरातून सुरू होऊन गुंडिचा मंदिरापर्यंत जाते. या रथ यात्रेमध्ये भक्तांची प्रचंड गर्दी उसळली आहे. बारा दिवस चालणाऱ्या या रथ यात्रेबाबत भक्तांमध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना जगन्नाथ रथ यात्रेच्या शुभेच्छा दिल्या आहेत.**

पुरीच्या जगन्नाथ मंदिरात 'पहांडी' अनुष्ठानाला सुरुवात झाली. या अनुष्ठानात भगवान बलभद्र, देवी सुभद्रा आणि भगवान जगन्नाथ यांना १२व्या शतकातील मंदिरातून त्यांच्या संबंधित रथांपर्यंत मिरवणुकीद्वारे नेले जाते. हे अनुष्ठान एक तास उशिराने सुरू झाले. पहांडी अनुष्ठानात त्रिदेव – भगवान बलभद्र, देवी सुभद्रा आणि भगवान जगन्नाथ यांना सिंहद्वारासमोर उभ्या असलेल्या त्यांच्या रथांपर्यंत नेले जाते, जिथून त्यांना श्री गुंडिचा मंदिराकडे नेण्यात येते. घंटा, शंख आणि झांजांच्या गजरात सर्वप्रथम चक्रराज सुदर्शन यांना मुख्य मंदिरातून बाहेर आणण्यात आले आणि देवी सुभद्राच्या 'दर्पदलन' नावाच्या रथावर बसविण्यात आले. जेव्हा भगवान जगन्नाथ मंदिरातून बाहेर आले, तेव्हा ग्रँड रोडवर भावनांचा पूर उसळला. भक्तांनी 'जय जगन्नाथ' असा जयघोष केला. पुरीत या रथ यात्रेबाबत सुरक्षेच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर तयारी करण्यात आली आहे. ओडिशाचे एडीजी एल अँड ओ संजय कुमार यांनी सांगितले की, आमचा अंदाज आहे की आज १० ते १२ लाख लोक येथे जमतील. गर्दी नियंत्रणासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण शहराला सुरक्षा कवच झोनमध्ये रूपांतरित करण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर मिळालेल्या गुप्त माहितीनुसार काही असामाजिक व राष्ट्रविरोधी घटक अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करू शकतात. त्यामुळे संपूर्ण नियोजन करून परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे. अनेक वरिष्ठ अधिकारी आणि २०० हून अधिक ओडिशा पोलिस प्लाटून येथे तैनात करण्यात आले आहेत.

## अहमदाबादमध्ये जगन्नाथ रथयात्रेत ३ हत्ती बिथरले

**अहमदाबाद, दि. २७ वृत्तसंस्था**

गुजरातमधील अहमदाबादमध्ये जगन्नाथ रथयात्रेत आज सकाळी थरकाप उडवणारी घटना घडली. रथयात्रेत सहभागी झालेले तीन हत्ती अचानक बिथरले आणि गर्दीतून सैरावैरा धावू लागले. या अनपेक्षित गोंधळामुळे हजारो भाविक



जीव वाचवण्यासाठी धावू लागले, यात अनेकजण जखमी झाले. काही वेळ ही भव्य यात्रा भयावह परिस्थितीत बदलली. शुक्रवारी सकाळी १०.१५ वाजता रथयात्रा शहरातील खाडिया परिसरातून जात असताना ही घटना घडली. रथयात्रेच्या मार्गावर अचानक घडलेल्या या प्रकारामुळे भाविकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले. पोलिसांनी लोकांना लांब राहण्याचे आवाहन केले. माहूतांनी हत्तीचा पाठलाग केला आणि त्यांना नियंत्रणात आणले. प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली. पोलीस आणि स्वयंसेवकांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. हत्तींना आणखी चिथावणी मिळू नये म्हणून तात्काळ शिट्ट्या वाजवणे थांबवण्याचे निर्देश देण्यात आले.

या घटनेपूर्वी, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या हस्ते पवित्र पहिंद विधी पार पाडल्यानंतर यात्रेला सुरूवात झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा कुटुंबासह जमालपूर जगन्नाथ मंदिरात मंगला आरतीमध्ये सहभागी झाले होते. या भव्य मिरवणुकीत १८ हत्ती, भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणारे १०१ ट्रक, ३० आखाडे आणि १८ भजनी मंडळांचा समावेश होता. मात्र, या अनपेक्षित घटनेमुळे यात्रेला काही काळासाठी गालबोट लागले. सुदैवाने, प्रशासनाच्या तत्परतेमुळे पुढील अनर्थ टळला आणि भाविकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

## अग्रलेख खरीखरी

### मित्रविहीन पोकळी

पहलगाम येथे भारतावर आतंकवादी हल्ला झाला. भारतात त्याविरुद्ध जबरदस्त प्रक्रिया उमटणे स्वाभाविकच होते. पण जगातील दोन महाशक्ती म्हणजे चीन आणि अमेरिका यांनी अजूनही पाकिस्तानच्या चिथावणीवरून भारतावर आतंकवादी हल्ला झाला आहे. हे दिसत असूनही त्यांनी ती गोष्ट मान्य केलेली नाही. लहरी लाला ट्रम्प पाकिस्तानच्या जनरलला आपल्या पांढऱ्या प्रासादात म्हणजेच व्हाईटहाऊस मध्ये बोलवून त्याला मेजवानीचा प्रसाद देतो. गंमत अशी आहे की, त्यावेळी पाकिस्तानचे प्रधानमंत्री एक शब्दही तोंडातून काढत नाहीत. यावरून पाकिस्तानात खुर्चीवर कोण आहे आणि सत्ता कोणाची आहे. याचा सबंध जगभराला बोध व्हावा. या ट्रम्पाचे डोके कधीच सरळ चालत नाही. बुद्धिबळामध्ये घोडा जसा अडीच घरे चालतो. तसाच हा घोड्यासारखा ट्रम्प उलटसुलट चालत असतो. मात्र अमेरिकेत लोकशाही असल्यामुळे या ट्रम्पाविरुद्ध बरेच पत्रकार आणि बडीबडी वृत्तपत्रे आहेत. जी त्याच्या अनाकलनीय धोरणाबद्दल विरोधात्मक लिहीत आहेत. हे सहज दिसून येते. विशेष म्हणजे त्या बातम्या जगभर प्रसिद्ध होऊ शकतात. आताही इराण आणि इस्राईल युद्धात या ट्रम्पाने शेवटी सपशेल शेपूट घातले. यावरून ट्रम्पाळलेली अमेरिका हे ट्रम्पाळलेले शैवाळ अमेरिकेच्या हिताचे नाही. हेच समजून चुकलेली आहे. अमेरिकेच्या कायद्याप्रमाणे या ट्रम्पाला पुढील साडेतीन वर्ष झेलणे भाग आहे. पण आपले पंतप्रधान मोदी साहेबांचा हा तथाकथित मित्र भारताला घडीघडी अपमानीत करीत असतो. भारतामध्ये अमेरिकन महिलांनी जाऊ नये. हे करू नये. ते करू नये, वगैरे सारख्या ॲडव्हायझऱ्या अगदी झारून झारून देत असतो. त्यातून भारताची जेवढी बदनामी होईल. तेवढी करण्याच्या या ट्रम्पाचा खाक्या आता आपल्याला दिसून आलेला आहे. आपला देश शांततावादी आहे म्हणून त्या ट्रम्पाच्या माकड चेष्टांवर आपण गप्प राहतो. ही आपली महत्ता आहे. हे झाले अमेरिकेचे, आता आपण लोकशाही धोरण नसलेल्या चीन बाबतची गोष्ट बघूया. कालपासून चीनच्या किंग दावो नावाच्या शहरात शांघाय सहयोग संघटनेच्या नावाखाली तेथील संरक्षण मंत्र्यांची बैठक झाली. या बैठकीत भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंगही उपस्थित होते. तसेच त्यामध्ये पाकचे संरक्षण मंत्री ख्वाजा यांचाही सहभाग होता. राजनाथ सिंग यांनी त्या पाकड्या संरक्षण मंत्र्यांची अजिबात भेट घेतली नाही. आपल्या भारताच्या संरक्षण मंत्र्यांनी शांघाय सहयोग संघटनेच्या संयुक्त पत्रकावर हस्ताक्षर म्हणजे स्वाक्षरीसुद्धा केलेली नाही. म्हणजेच भारताने आपला विरोध अगदी ठाम पणाने प्रकट केलेला आहे. (असा ठामपणा अमेरिकेबाबत का व्यक्त होत नाही ) या संयुक्त पत्रकात जम्मू आणि काश्मीर मधील पहलगाम मध्ये झालेल्या आतंकवादी हल्ल्याचा उल्लेखही करण्यात आलेला नव्हता. पाकिस्तानच्या बलुचिस्तान जी एक छोटीशी घटना घडली. त्याचा मोठ्या गाजावाजाने उल्लेख करण्यात आलेला होता. त्यामुळे आपल्या संरक्षण मंत्र्यांनी जो आक्रमक पवित्रा घेतला. त्याला निश्चितच महत्त्व आहे. राजनाथ सिंग म्हणाले की, पाकिस्तान आतंकवाद्यांना पैसा पुरवते. थोडक्यात पाकिस्तानात त्या आतंकवाद्यांचे प्रायोजक आहेत. भारतामध्ये आतंकवादी घटना करून पळालेल्या गुन्हेगारांना पाकिस्तानमध्ये अभय मिळते. असे असूनही पाकवर दोषारोप होत नाही. यावरून राजनाथ सिंग यांनी खडेबोल सुनावले. आपल्या येथे शांती, सुरक्षा आणि विश्वासाची कमतरता आहे. हीच मोठी समस्या आहे. कट्टरता, उग्रवाद आणि आतंकवाद यांच्यासोबत शांतता आणि समृद्धी चालू शकत नाहीत. हे राजनाथ सिंग यांनी स्पष्ट केलेले आहे. आतंकवादाबद्दल ज्या ठिकाणी असे दुहेरी मापदंड आहेत. त्या ठिकाणी आपण उपस्थित राहून आपला दुहेरी मनस्ताप करून घेण्याची गरज आहे काय. याचाही विचार आता झाला पाहिजे. सध्या पाकिस्तान, जो अमेरिकेचाही लाडका आहे आणि चीनचाही लाडका आहे. त्यामुळे हे दोन्ही देश पाकिस्तानला मुक्तहस्ते भीक देण्यास तयार आहेत. या सर्व प्रकरणात भारताकडे किती मित्र देश आहेत. याचाही आपल्याला विचार केला पाहिजे. आपल्याच अटल बिहारी वाजपेयी यांनी म्हटल्याप्रमाणे शेजारी बदलता येत नाहीत. पण शेजाऱ्यांसोबत मैत्री करता येते. आजच्या घडीला एकही शेजारी आपल्याबरोबर नाही. एक बांगलादेश चांगला मित्र होता. त्यानेही भारताबरोबर उभा दावा मांडलेला आहे. इतर आजूबाजूचे सर्व शेजारी भारताबरोबर नाहीत. जागतिक पटलावर सुद्धा आपले मित्र किती आहेत. याचा शोध घेतल्यावर दोन्ही हातांच्या बोटावर मोजण्याइतके मित्रही आपण कमावलेले नाहीत. अशी आपली खरीखरी परिस्थिती आहे. या संमेलनापूर्वी झालेल्या G-7 संमेलनातही भारताला काहीच भाव दिला गेला नव्हता. म्हणून आपल्याला आपले मित्र देश वाढवणे गरजेचे आहे. कठीण परिस्थितीमध्ये आपल्याबरोबर कोण कोण येतील. याचा शोध आता आपणच घेतला पाहिजे. सध्याची आपल्या भोवतीची जी मित्रविहीन पोकळी आहे. ती आजमितीला अत्यंत चिंताजनक आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## राज व उद्धव मनाने एकत्र आलेलेच आहेत- राऊत

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये हिंदी भाषा शिकवण्याच्या फडणवीस सरकारच्या निर्णयाविरोधात ठाकरे बंधू आक्रमक झाले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटी ते आझाद मैदान असा मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली आहे. या मोर्चात शिवसेना (ठाकरे) देखील सहभागी होणार आहे. शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी राज व उद्धव ठाकरे एकत्र या मोर्चात सहभागी होणार असल्याची घोषणा केली आहे.



दरम्यान, हिंदी भाषेच्या सक्तीविरोधातील मोर्चासाठी एकत्र येणारे ठाकरे बंधू राजकारणात हात मिळवणार का? मराठी अस्मिता हा राज व उद्धव ठाकरे राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याचा मुद्दा असू शकतो का? असा प्रश्न विचारल्यावर संजय राऊत म्हणाले, "राज व उद्धव ठाकरे हे मनाने एकत्र आलेलेच आहेत. सध्या भाषा हा महत्त्वाचा विषय आहे. मराठी अस्मिता, मराठी माणसाचा स्वाभिमान टिकवण्यासाठी मुंबईवरील आक्रमणाविरोधात सर्वांनी एकत्र यायला हवं".

संजय राऊत म्हणाले, "आपण याआधी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यासाठी राजकीय मतभेद विसरून एकत्र आलो होतो. त्याच प्रकारचा लढा उभारण्याची आज देखील गरज आहे असं दोन्ही ठाकऱ्यांना वाटतं. यात मला काहीच चुकीचं वाटत नाही. मराठीविरोधात, मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्यासाठी, मुंबईतील मराठी माणूस हद्दपार करण्यासाठी प्रयत्न होत आहेत. ६५ वर्षांपूर्वी असेच प्रयत्न होत होते. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र कृती समिती स्थापन झाली आणि सर्व पक्षांनी, संघटनांनी मिळून लढा दिला. तसाच लढा आता देखील द्यावा लागेल. या लढ्याचं नेतृत्व शेवटी ठाकऱ्यांनाच करावं लागेल. या मोर्चात सहभागी होण्यासाठी आम्ही सर्व पक्ष व संघटनांना निमंत्रण पाठवणार आहोत.

## पहिली ते चौथी हिंदी भाषा नको, अजित पवारांची स्पष्ट भूमिका

**गजानन तुपे**
**मुंबई, दि. २७**

राज्यात पहिलीच्या वर्गापासून त्रिभाषा सूत्र अवलंबून हिंदी भाषेची सक्ती आणण्याच्या धोरणाला कडाडून विरोध केला जात आहे. मराठीच्या मुद्द्यावरून प्रामुख्याने मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनीही हिंदी सक्तीविरोधात आवाज उचलला. आता येत्या ५ जुलैला मराठी भाषा प्रेमींचा भव्य मोर्चा मुंबईत काढला जाणार आहे. या मोर्चाला ठाकरे बंधू पहिल्यांदाच एकत्र दिसून येतील. मराठी आणि हिंदी या वादात राज्य सरकारमध्येही मतमतांतरे असल्याचे दिसून येते. पहिली ते चौथी हिंदी भाषा नसावी असं मत खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडले आहे. परंतु शालेय शिक्षण विभागाची जबाबदारी असणाऱ्या शिंदेसेनेच्या नेत्यांची अडचण झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील या विषयावर ठामपणे बोलले नाहीत. त्यामुळे या संपूर्ण वादात भाजपामुळे शिंदेची कोंडी झालीय का असा प्रश्न अनेकांना पडला आहे.




हिंदी भाषेच्या वादावरून पत्रकारांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांना प्रश्न विचारला. त्यावेळी ते म्हणाले की, पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी या वर्गात हिंदी असू नये. पाचवीपासून हिंदी असावे. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे. ज्यावेळेस मुले पहिलीपासून मराठी लिहायला वाचायला शिकतात तेव्हा हिंदीही लिहिता वाचता येते फक्त बोलण्यासंदर्भात असेल तर पाचवीपासून हिंदी शिकवली तरी काही हरकत नाही. पाचवीपासून हिंदी सक्ती करावी अशी भूमिका अजितदादांनी मांडली आहे. तर आमचे मंत्री दादा भुसे अनेकांना भेटत आहेत. हिंदी भाषेवर ज्यांनी आक्षेप घेतला आहे त्यांच्याशी चर्चा केली जाईल. त्यांच्याशी सल्लामसलत केली जाईल. आम्ही हिंदी अनिवार्य शब्द काढला आहे. हे सरकार सर्वसामान्यांचे आहे. जोरजबरदस्तीने निर्णय घेणार नाही. आम्ही सर्वांशी बोलल्यानंतर यावर निर्णय घेऊ. मी मुख्यमंत्री असताना मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवला, महाराष्ट्रात मराठी भाषा सक्तीची केली. विरोधकांच्या काळात माशेलकर समितीचा अहवाल स्वीकृत केला. कुठलाही निर्णय लादला जाणार नाही. जनतेच्या हिताचा निर्णय घेतला जाईल असं सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मात्र हिंदी भाषा सक्तीवर थेट भूमिका घेणे टाळले.

## नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्य विकासाला प्राधान्य : गडकरी

**नागपूर, दि. २७ प्रतिनिधी**

सर्वप्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध झाल्या तरीही प्रशिक्षित मनुष्यबळ ही काळाची गरज असणार आहे. हे मनुष्यबळ शैक्षणिक धोरणांमधील बदलांच्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात व्यवसायाभिमूख तांत्रिक शिक्षण, रोजगाराभिमूख कौशल्य विकास यांना विशेष प्राधान्य देण्यात आले, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केले.

मंथनच्या वतीने रेशीमबाग येथील कवीवर्य सुरेश भट सभागृहात शिक्षक परिसंवाद आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला भाजपचे नागपूर



शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार प्रवीण दटके, ज्येष्ठ नेते संजय भेंडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू सुभाष कोंडावार, डॉ. शैलेंद्र देवरणकर, डॉ. श्रीपाद ढेकणे, माजी आमदार नागो गाणार, मोहित शाह, विष्णू चांगदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, '२०२० मध्ये आपण शैक्षणिक धोरण स्वीकारले. त्या धोरणाचे उद्दिष्ट्य समजून घेण्याची गरज आहे. आपल्या देशात अनेक क्षेत्रात अनेक लोक उत्तम काम करतात. परंतु, भविष्यातील माणूस घडविण्यासाठी जे आवश्यक आहे, त्यानुसार उद्दिष्ट्य निश्चित करण्याची गरज आहे. आपल्याला विश्वगुरू , जगातील तिसरी अर्थव्यवस्था व्हायचे आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करायचा आहे हे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बघितले आहे.

विश्वगुरू म्हणून मान्यता प्राप्त करायची असेल तर फक्त आर्थिक आधारावर ते शक्य नाही. त्यासाठी आपली संस्कृती, परंपरा, मूल्याधिष्ठित जीवन पद्धती याचा देखील विचार करावा लागेल. याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. शिक्षण म्हणजे गुणांची शर्यत समजली जाते. पण शिक्षण म्हणजे ज्ञान, कौशल्य आणि संस्कार होय. या तिन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आपल्याला जो भविष्यातील माणूस उभा करायचा आहे, त्यासाठी प्रबोधन, प्रशिक्षण आणि संशोधन यावर जोर द्यावा लागेल. आपल्याच देशात सगळं ज्ञान आहे, असे नाही. जगाची आणि आपली काय गरज आहे, आपल्याकडे असलेल्या मनुष्यबळाला कोणते प्रशिक्षण-शिक्षण दिले पाहिजे, याचा विचार करावा लागेल. तंत्रज्ञानाचा उपयोग करून डिजीटल शिक्षण कसे देता येईल, यासाठी प्रयत्न करावा लागेल, अशी अपेक्षाही गडकरी यांनी व्यक्त केली.

## 345 राजकीय पक्षांवर टांगती तलवार, निवडणूक आयोग नोंदणी रद्द करणार

**नवी दिल्ली, दि. २७ वृत्तसंस्था**

निवडणूक आयोगाने ३४५ नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या पक्षांनी २०१९ पासून कोणत्याही निवडणुकीत सहभाग घेतलेला नाही आणि ज्यांची कार्यालये देशात कुठेही प्रत्यक्ष आढळत नाहीत, अशा पक्षांची नोंदणी रद्द केली आहे.

निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या माहितीनुसार, हे ३४५ पक्ष विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील आहेत. सध्या नोंदणीकृत २८०० हून अधिक मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांमध्ये असे अनेक पक्ष आहेत जे राजकीय पक्ष म्हणून नोंदणीकृत राहण्यासाठी आवश्यक अटी पूर्ण करत नाहीत. अशा पक्षांवर मोहीम राबवून कारवाई केली जात आहे, अशी माहिती आयोगाने दिली.

## पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून तीन चिमुकल्यांचा मृत्यू




**बोईसर, दि. २७ प्रतिनिधी**

बोईसरमधील महावीर कुंज इमारतीलगत असलेल्या खासगी मालकीच्या मोकळ्या जागेतील पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून तीन मुलांचा मृत्यू झाला आहे. ही हृदयद्रावक घटना शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास घडली असून या घटनेने परिसरात दुखाचा डोंगर कोसळला आहे. मृत मुलांची नावे सूरज यादव (वय ६), धीरज यादव (वय १२) हे दोघे सख्खे भाऊ होते तर अंकित (वय १२) अशी आहेत. चौथा एक मुलगा मात्र थोडक्यात बचावला असून घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी त्याला बाहेर काढले आहे. महावीर कुंज इमारतीच्या लगत असलेल्या खासगी भूखंडावर भरावासाठी मुरूम मातीचे उत्खनन करण्यात आले होते. मात्र, उत्खननानंतर निर्माण झालेला खोल खड्डा पावसामुळे पाण्याने भरून गेला होता. स्थानिक मुले नेहमीप्रमाणे आंघोळीसाठी याच खड्ड्याजवळ गेली होती. मात्र, पाण्याची खोली लक्षात न आल्यामुळे तिघे पाण्यात बुडाले. घटनेची माहिती मिळताच बोईसर पोलिस आणि औद्योगिक अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. काही वेळाच्या शोधकार्यांनंतर तिघांचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मुलांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. स्थानिक नागरिकांनी अनधिकृत उत्खनन व पाण्याने भरलेल्या असुरक्षित खड्ड्यांविषयी तीव्र संताप व्यक्त करत प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## ठाकरे बंधुंची भेट घेऊन भूमिका घेणार - शरद पवार

**कोल्हापूर, दि. २७ प्रतिनिधी**

शालेय अभ्यासक्रमात हिंदी सक्ती विरोधात विरोधी पक्षांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे 5 जुलै रोजी हिंदीविरोधात एकत्र आंदोलन करणार आहेत. त्यामुळे शरद पवार या आंदोलनात सहभागी होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरनेही हिंदी सक्तीच्या मुद्यावर भाष्य करावं अशी मागणी होत आहे. आता शरद पवारांनी सर्व मुद्यांवर भाष्य केले आहे.



कोल्हापुरात आज शरद पवारांची पत्रकार परिषद पार पडली, यावेळी त्यांना राज्यातील हिंदी सक्तीबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना शरद पवार म्हणाले की, पहिली ते चौथीपर्यंत हिंदीची सक्ती करणं योग्य नाही, तसेच हिंदीला दुर्लक्षीत करूनही चालणार नाही. पाचवीपासून हिंदी योग्य आहे. पहिली ते चौथीपर्यंत एकदम नविन भाषा लादणं योग्य नाही. सचिन तेंडुलकरने हिंदी सक्तीबाबत बोलण्याबाबत प्रश्न विचारला असता शरद पवार यांनी, 'असा का हट्ट करायाचा? सचिन तेंडुलकरने का बोलावे ? तो ज्यात एक्स्पर्ट आहे त्यावर तो बोलेल. त्याला क्रिकेटबद्दल विचारावं.' असं विधान केलं आहे.

हिंदी विरोधातील आंदोलनात सहभागी होणार का? याबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, दोन्ही ठाकरेंची भूमिका वाचली, मी मुबंईला गेल्यावर याबाबत त्यांची भेट घेईल. त्यांनी मोर्चात सहभागी व्हा असं म्हटलं आहे, तुम्ही सहभागी व्हा म्हटल्यावर होता येतं असे नाही, भूमिका समजून घ्यावी लागेल. महाराष्ट्राच्या हिताचे निर्णय असतील तर भूमिका घेतली जाईल. माझं म्हणणं आहे की 1 ते 4 हिंदी सक्ती नको.

## श्री विठ्ठल रूक्मिणीचे २४ तास दर्शन सुरू

**पंढरपूर, दि. २७ प्रतिनिधी**

आषाढी यात्रेला वारकऱ्यांची आणि भाविकांची होणारी मोठी गर्दी लक्षात घेता, त्यांना सुलभ व जलद दर्शन मिळावे, म्हणून यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२.१५ तास पदस्पर्श दर्शन आजपासून सुरू करण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

आषाढी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, त्यांना सुलभ व जलद दर्शन मिळावे, म्हणून यात्रा कालावधीत चांगला मुहुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. त्यानुसार आज (दि.२७) चांगला दिवस असल्याने विधिवत पूजा करून श्रींचा पलंग काढण्यात आला आहे. विठ्ठलाच्या मूर्तीच्या



पाठीशी लोड; तर रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. त्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२.१५ तास पदस्पर्श दर्शन सुरू राहणार असल्याचे औसेकर यांनी सांगितले.

श्रींचा पलंग काढल्याने काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती आदी राजोपचार बंद होवून नित्यपुजा, महानैवेद्य व गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील. दिनांक १६ जुलै (प्रक्षाळपुजा) पर्यंत २४ तास दर्शन उपलब्ध असणार आहे. श्रींचा पलंग काढताना पुजेवेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतलाताई नडगिरे, ॲड माधवीताई निगडे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, विभाग प्रमुख संजय कोकीळ, अतुल बक्षी व पौरोहित्य करणारे कर्मचारी उपस्थित होते.

# खारघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 5 येथे मोफत बहुविशेषज्ञांचे आरोग्य सेवा

**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल: पनवेल महानगरपालिकेच्या खारघमधील सेक्टर 15येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 5येथे एमजीएम वैद्यकिय महाविद्यालय ,रूग्णालयआणि रिसर्च सेंटर वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या चौथ्या गुरूवारी बहुविशेषज्ञांच्यावतीने मोफत तपासणी केली जाणार आहे. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. पनवेलकरांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी महापालिका कायमच तत्पर असते. आयुक्त तथा



प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 23 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, 6 आरोग्यवर्धिनी केंद्र व दोन आपला दवाखाना यांच्या माध्यमातून विविध आरोग्य सुविधा नागरिकांना दिल्या जात आहेत. खारघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 5 येथे आता 'बहुविशेषज्ञांच्यावतीने मोफत तपासणी' या नवीन सुविधेची भर घालण्यात आली आहे. नुकताच या सुविधेचा शुभारंभ कार्यक्रम मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ. उमेश ऐगल व एमजीएमचे तज्ज्ञ व वैद्यकिय अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 5 येथे एमजीएम वैद्यकिय महाविद्यालय ,रूग्णालयआणि रिसर्च सेंटर वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या चौथ्या गुरूवारी सकाळी 10.00 ते 1.00या वेळेत बहुविशेषज्ञ नाक घसा तज्ज्ञ (ENT), नेत्रचिकित्सा, स्त्री रोग तज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ आरोग्य सेवा देणार येणार आहेत.

गरोदर मातांची काळजी घेण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेच्या खारघरमधील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 5येथे 'प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजना' राबविण्यात येत असून दर महिन्याच्या 9 तारखेला स्त्री रोग तज्ज्ञाचे मार्गदर्शन गरोदर मातांना देण्यात येत आहे. तसेच दर मंगळवारी व शुक्रवारी सकाळी 10.00 ते 1 यावेळेत गरोदर मातांची मोफत सोनोग्राफी करण्यात येत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या खारघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 5 येथे रोज सकाळी 9.30 ते 1.00 या वेळेत मोफत रक्त चाचणी करण्यात येत आहे. या सुविधेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

## पाटनुस ग्रामपंचायतमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठाला खिंडार

**महासागर प्रतिनिधी,**



माणगाव: माणगाव तालुक्यातील पाटनुस ग्रामपंचायतमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा गटातील माजी सरपंच पूजा जयदीप म्हामुणकर, माजी सरपंच शिवानी म्हामुणकर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी मंत्री नामदार भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत पक्षप्रवेश केला आहे. पक्षप्रवेश मोठ्या उत्साहात करण्यात आला होते, यावेळी शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी, युवासेना लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक कार्यकर्ते शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पक्षप्रवेशाने पाटनुस परिसरातील राजकीय वातावरणात लक्षणीय बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या या गटाचा शिवसेनेमध्ये विलीन होणं शिवसेना पक्षासाठी मोठी ताकद निर्माण होणार आहे. माजी सरपंचांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा मोठा गट एकत्र येऊन स्थानिक पातळीवर शिवसेनेच्या राजकीय प्रभावाला बळकटी देईल, अशी भूमिका पक्षातील नेत्यांनी व्यक्त केली. मंत्री नामदार भरत गोगावले यांनी सांगितले की, "या विभागातील लोकांच्या हितासाठी आणि विकासासाठी आम्ही एकमताने काम करणार आहोत पाटनुस विभागात विकाससाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून शिल्लक राहीलेले कामे मार्गी लागतील पाटनुस ग्रामपंचायतमध्ये राष्ट्रवादी गटाच्या माजी सरपंचांसह कार्यकर्त्यांचा समावेश झाल्याने शिवसेनेची ताकद वाढेल." या पक्षप्रवेशामुळे पाटनुसातून पुढील काळात होत असणार्या राजकीय संघर्षामध्ये नव्या रंगाचे प्रदर्शन होणार आहे, असा अंदाज असून स्थानिक लोकांचा प्रतिसाद उत्साहवर्धक असल्याचे दिसून येत आहे.

## संगणक संच व शालेय उपयोगी वस्तूचे वाटप

**महासागर प्रतिनिधी,**



मुरुड जंजिरा: पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीतील सुमारे 300 शालेय विद्यार्थ्यांना पुणे येथील उद्योजक संजय मनोहर , व्यावसायिक मोहन वर्तक, सौ .वर्तक मॅडम व सौ. मनोहर मॅडम यांचे कडून त्यांच्या शुभ हस्ते शैक्षणिक वस्तूचे वाटप करण्यात आले आणि त्यांनी शाळेच्या दैनदिन कामासाठी उपयुक्त असणारा संगणक संच सुधा यावेळी भेट देण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उद्योजक संजय मनोहर व व्यावसायिक मोहन वर्तक यांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष .खेळू वाजे व विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे सर यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले .संजय मनोहर यांनी आपल्या मनोगतात म्हटले की ,प्रत्येक विद्यार्थी हा चार्टर्ड अकाउंट, इंजिनियर, डॉक्टर ,आर्किटेक्चर होऊन तो देशाचा एक सजग नागरिक पण बनला पाहिजे तसेच विद्यार्थ्यांनी आपले लक्ष गावाकडे, आई-वडिलाकडे तसेच शिक्षणाकडे सुद्धा दिले पाहिजे .सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना दहा मिनिटे ध्यानधारणाचे प्रात्यक्षिक करून सुद्धा दाखवले. या कार्यक्रमासाठी .जगदीश शिंदे व राकेश कासार हे सुधा उपस्थित होते. शाळेस संगणक संच व शैक्षणिक साहित्य मिळावे यासाठी या शाळेचे शिक्षक भागीनाथ बांगर यांनी विशेष सहकार्य केले. शैक्षणिक साहित्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास सहा वह्या व कंपास पेटी यावेळी वाटप करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील तेलंगे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन अकिल मुलाणी सर यांनी केले.

## तळोजा एमआयडीसी महामार्गावरील स्पीड ब्रेकरची झाली दुरावस्था तर देवीचापाडा येथील रस्त्याची कामे रखडली

**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल: तळोजा प्रभागातील नावडे फाटा ते नितळस येथील महामार्गाची अक्षरशः दुरावस्था झाली आहे. यातही महामार्गावरील स्पीड ब्रेकर अतिशय वाईट अवस्थेत आहे. बरेचसे स्पीड ब्रेकर हे तुटलेले असून, नवीन झालेल्या रस्त्यांवरती स्पीड ब्रेकर टाकण्यात आलेले नाहीत. यामुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या संदर्भात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या युवासेनेमार्फत एमआयडीसी अधीक्षक श्री. राऊत यांना निवेदन दिले आहे. यावेळी युवासेना महानगर चिटणीस जीवन पाटील यांच्यासह उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, विभाग प्रमुख प्रमोद पाटील, तळोजा उपशहर प्रमुख हरीश पाटील, देवीचा पाडा गावाचे उपशाखाप्रमुख नंदकुमार म्हात्रे यांनी एमआयडीसी अधीक्षक श्री. राऊत यांची भेट घेऊन तळोजा एमआयडीसी महामार्गावरील स्पीड ब्रेकरची झाली दुरावस्था तसेच



देवीचापाडा येथील रस्त्याची कामे रखडली या संदर्भात त्यांच्याशी चर्चा केली तसेच पावसाळी दिवस असल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. त्यामुळे हे दोन्ही प्रश्न निकाली काढावे अशी मागणी यावेळी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## गव्हाण विभागात विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल: विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन मोठे व्हावे आणि आपल्या आई वडीलांचे, शाळेचे आणि आपल्या गावाचे नाव उज्वल करावे असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी गव्हाण विभागात वह्या वाटपांच्या कार्यक्रमावेळी केले.सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात गेली तीस वर्षे उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोड यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विभागातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम आज (शुक्रवारी) संपन्न झाला. या अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या शिवाजीनगर, कोपर, शेलघर, बेलपाडा आणि गव्हाण कन्या आणि रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, रतनशेठ भगत, अनंता ठाकूर, गव्हाण विभाग अध्यक्ष अध्यक्ष निलेश खारकर, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, सुधीरठाकूर, वामणशेठम्हात्रे, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, वहाळचे माजी उसरपंच अमर म्हात्रे, ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या योगीता भगत, उषा देशमुख, हेमंत पाटील, भुषण म्हात्रे, श्री राममंदिर जिर्णोध्दार समितीचे अध्यक्ष महादेव कोळी, मच्छीमार को ऑपरेशन सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत कोळी, महिला मोर्चा अध्यक्षा निकीता खारकर, सुहास भगत, अजय भगत, विनायक कोळी, राजकिरण कोळी, वैभव घरत, रोशन म्हात्रे, राजेंद्र भगत, संतोष म्हात्रे, गणेश पाटील, अरिष पाटील, मधुकर पाटील, तुकारम ठाकूर, प्रकाश कडू, अशोक घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते.

## मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे च्या दणक्याने जे एम बक्षी पोर्ट नमले

## गुजरातला काढलेली जाहिरात रद्द,

**महासागर प्रतिनिधी,**

उरण: उरण तालुक्यातील जेएनपीटी पोर्ट मधील न्हावाशेवा फ्रीपोर्ट टर्मिनल (NSFT) जे एम बक्षी & सी एम ए टर्मिनल्स या पोर्टने इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये नोकर भरतीची जाहिरात प्रसिद्ध केली होती. ती जाहिरात रद्द करून यापुढे स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन पोर्ट मध्ये होणाऱ्या नोकर भरती प्रक्रियेत मराठी तरुणांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार असल्याचे आश्वासन जेएनपीए बंदराचे चेअरमन उन्मेष वाघ यांनी दिले आहे.त्यामुळे हा विजय हा मनसेचे नेते राज ठाकरे यांच्या विचारांचा विजय असणार आहे.असे प्रतिपादन मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी व्यक्त केले.

जेएनपीटी पोर्ट मधील न्हावाशेवा फ्रीपोर्ट टर्मिनल (NSFT) जे एम बक्षी & सी एम ए टर्मिनल्स या पोर्टने दहा दिवसापूर्वी इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये नोकर भरतीची जाहिरात प्रसिद्ध करून मुलाखती( इंटरव्यू ) ह्या गुजरात राज्यातील मुद्रा या ठिकाणी घेऊन संबंधित व्यवस्थापनाने कामाचा पत्ता हा जेएनपीटी उरण नवी मुंबई म्हणून प्रसिद्ध केले होते.एकंदरीत व्यवसाय महाराष्ट्र मध्ये करायचा,आणि नोकर भरती मुलाखती या गुजरात राज्यात घ्यायच्या यासंदर्भात कोणीच आवाज उठवित नसल्याने स्थानिकांच्या अस्तित्वासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर व उरण तालुका अध्यक्ष अँड सत्यवान भगत यांनी आवाज उठविण्याचा निर्णय घेतला असता या नोकर भरती प्रक्रियेची दखल मनसेचे नेते राज ठाकरे यांनी घेऊन प्रसारमाध्यमांतून



आवाज उठविला.यांची दखल जेएनपीए बंदराचे चेअरमन उन्मेष वाघ यांनी घेऊन शुक्रवारी( दि २७) बंदर प्रशासनाच्या दालनात बैठकीचे आयोजन केले होते.या बैठकीत मनसेचे नेते अविनाश जाधव, मनसेचे सरचिटणीस संजय नाईक, मनसेचे सरचिटणीस संदिप दळवी यांनी मराठी माणसावर पोर्ट टर्मिनल कशा प्रकारे अन्याय करत आहे.ही बाब बंदराचे चेअरमन उन्मेष वाघ यांच्या निदर्शनास आणून दिली.

यावेळी जेएनपीटी पोर्ट मधील न्हावाशेवा फ्रीपोर्ट टर्मिनल (NSFT) जे एम बक्षी & सी एम ए टर्मिनल्स या पोर्टने इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये नोकर भरतीची जी जाहिरात प्रसिद्ध केली होती ती जाहिरात रद्द करून यापुढे स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन पोर्ट मध्ये होणाऱ्या नोकर भरती प्रक्रियेत स्थानिक भूमिपुत्र व मराठी तरुणांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार असल्याचे आश्वासन जेएनपीए बंदराचे चेअरमन उन्मेष वाघ यांनी मनसेच्या शिष्टमंडळाना दिले.यावेळी मनसेचे नेते अविनाश जाधव, मनसेचे सरचिटणीस संजय नाईक, मनसेचे सरचिटणीस संदिप दळवी यांनी मनसेचे नेते राज ठाकरे यांच्या वतीने बंदराचे चेअरमन उन्मेष वाघ यांचे आभार व्यक्त केले. तसेच मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी मनसे यापुढे ही आवाज उठविणार असल्याचे सांगितले.

# कृषिदूतांद्वारे शेतीसाठी फायदेशीर व घातक कीटकांची ओळख व माहिती

**महासागर प्रतिनिधी,**



महाड: येथील कृषिदूतांनी कोळोसे गावात ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेतीसाठी फायदेशीर व घातक कीटकांची ओळख व माहिती करून दिली त्यामध्ये त्यांनी मधमाशी, चित्रांग, भुंगेरा, नाकतोडा, फुलपाखरे, रेशीम किडा, टोळ, वाळवी, घरमाशी, कसर अशा काही मित्र कीटक व शत्रू कीटक यांची चित्रांसहित शेतकऱ्यांना माहिती व ओळख करून दिली. या प्रात्यक्षिकामध्ये त्यांनी मित्र कीटक कशाप्रकारे कार्य करतात व ते आपल्याला उत्पन्न वाढवण्यासाठी कसे मदत करू शकतात हे पटवून दिले त्याचबरोबर शत्रू कीटक कशा प्रकारे नुकसानकारक ठरतात हे सविस्तर सांगितले. शत्रू कीटकांचे जैविक रासायनिक व यांत्रिक नियंत्रण करण्यासाठी उपाय सांगितले. हे प्रात्यक्षिक घेतेवेळी शेतकऱ्यांनी या कीटकांबद्दल असणाऱ्या समस्या मांडल्या व कृषिदूतांद्वारे त्यांचे निरसन करण्यात आले. कोळोसे गावातील शेतकरी नक्कीच या माहितीचा पुरेपूर वापर करतील व इतर शेतकऱ्यांनाही चांगल्या प्रकारे समजावून सांगतील. हे प्रात्यक्षिक घेते वेळेस कोळोसे गावचे ग्रामस्थ उपस्थित होते. कृषी महाविद्यालय मोहोप्रे- आचळोलीचे प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर, कार्यक्रम समन्वयक प्राध्यापिका व्ही. आर. पवार, कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक एस. एस. संकपाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली हे कृषिदूत कोळोसे गावामध्ये प्रात्यक्षिक राबवत आहेत. कृषि महाविद्यालय मोहोप्रे- आचळोली येथील कृषिदूतांमध्ये विपुल हगवणे, प्रतिक जाधव, युवराज सुर्यवंशी, गौरव विश्वकर्मा, मानव पाटील, रामचंद्र ठणके, रोहन चव्हाण, समीर न्हावेलकर यांचा समावेश आहे.

## श्रीवर्धन तालुक्यात आधार कार्ड सेवा कोलमडली; नागरिकांना करावा लागतोय अडचणींचा सामना!

**महासागर प्रतिनिधी,**

श्रीवर्धन: देशात आधार कार्ड एक आवश्यक कागदपत्र बनले आहे. आधार कार्ड हा केवळ ओळखीचा पुरावा नाही तर अनेक सरकारी आणि निमसरकारी लाभांसाठी अनिवार्य कागदपत्र आहे. असे असतांना श्रीवर्धन मध्ये आधारकार्ड सेवा कोलमडली असून याचा नाहक त्रास शाळेतील विद्यार्थ्यांना व नागरिकांना सहन करावे लागत आहे. याकडे शासन स्तरावर अक्षम्य दुर्लक्षही केले जातो आहे. शासन स्तरावर आधार कार्ड एक अद्वितीय दस्तऐवज असून मुलांच्या प्रवेशापासून ते सरकारी अर्ज भरेपर्यंत अनेक महत्वाच्या कामांमध्ये आधारकार्डचा वापर केला जातो. आधार कार्ड बनवण्यासाठी व दुरुस्ती करून घेण्यासाठी दररोज शहरापासून ग्रामीण भागापर्यंत मोठ्या संख्येने नागरिकांना हेलपाटे मारावे लागत असून यामध्ये आर्थिक व वेळ वाया जात आहे यामुळे फक्त आणि फक्त नागरिकांना मनस्ताप सहन करावे लागत आहेत. सामान्य नागरीकांना त्यांचे नाव, जन्मतारीख आणि आधार कार्डमधील इतर चुका दुरुस्त करण्यासाठी तहसील तसेच ऑनलाइन आधारकार्ड केंद्र येथे येत असतात मात्र आधारकार्ड कामे होत नाही. यापूर्वी तहसील कार्यालयात आधारकार्ड केंद्रे सुरू होती, ती बंद करण्यात आली आहेत. शहरातील दोन ठिकाणी चालू असलेली आधारकार्ड सेवा नियमित सर्व्हर डाउन होत असल्याने कोलमडून गेली आहे. यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून नागरिकांना मोठा मनःस्ताप सहन करावा लागत आहे.

शाळांमधील विद्यार्थ्यांना आधार कार्डातील त्रुटी दूर करण्यासाठी अनेक दिवस ताटकळत राहावे लागत आहे.

## रोह्यातील पाले खुर्द येथील स्मशानभुमी मोजते अखेरची घटका

**महासागर प्रतिनिधी,**

रोहा: तालुक्यातील पाले खुर्द येथील कुंडलिका नदीच्या तिरावर असणारे वैकुंठधाम स्मशानभूमी अखेची घटका मोजत असल्याचे चित्र येथील नागरिकांना पहावयास मिळत आहे.ती लवकरात लवकर नवीन बांधण्यात यावी अशी मागणी येथील नागरिक करीत आहेत. जीवनाच्या रंगमंचावरील शेवट म्हणजे मृत्यू,असे म्हणतात की मृत्यूची वाट ही कठीण असते हे खरे असुन याचा प्रत्यय पाले खुर्द येथील स्मशान भूमीची दूरवस्था पाहता दिसून येत आहे.या बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीवरील शेडचे पत्रेच राहिले नाहीत. सरणाचे चौथाऱ्यांचीही मोडतोड झाल्याने एखाद्या मयताचे सरण रचण्यासाठी मोठे अडथळे निर्माण होत आहेत.तसेच त्याच्या आजूबाजूला काटेरी झाडेझुडपे देखील पावसामुळे भयानक वाढली आहेत.यातून जातांना नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.याबाबत ग्रामस्थानी वारंवार तक्रारी करून ही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. स्मशानशेडवर पत्रे नसल्यामुळे पावसाळ्यात सरणासाठी आणलेली लाकडे ओली राहत आहेत यामुळे मृतदेहाची विल्हेवाट योग्य प्रकारे होत नाही पावसाळ्यात पाण्यापासून बचाव करण्यासाठी छत्रीचा



आधार घ्यावा लागत आहे. तसेच अस्थी गोळा करण्यासाठी त्रासाला सामोरे जावे लागत आहे.'याच साठी केला होता अट्टाहास शेवटचा दिवस गोड व्हावा,ही प्रत्येकाची इच्छा असते. परंतु मेल्यानंतरही याठिकाणी मरणयातना भोगाव्या लागत आहेत.तरी सदरील प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या विकास निधीतून ग्रामपंचायत मार्फत स्मशानशेडचे काम पूर्ण करण्यात यावे अशी मागणी येथून ग्रामस्थ नागरिकांकडून केली जात आहे.

## सुधागड तालुक्यात कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी विविध मोहिमांचा जागर कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी,**

सुधागड: कृषी विभागाच्या योजनांची प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी सुधागड तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुधागड तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये विशेष मार्गदर्शन कार्यक्रम शिबिरे आयोजित करण्यात आले या कार्यक्रमात शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमांमध्ये विभागीय कृषी सहसंचालक कोकण विभाग ठाणे बालाजी ताटे, तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम, मंडळ कृषी अधिकारी पाली उदय भोसले, मंडळ कृषी अधिकारी परळी सुखदेव कोळपे आदी मान्यवरांनी शेतकऱ्यांना महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना, पी. एम. किसान संपृक्तता मोहीम सिआरए टेक्निक, भात शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा उपयोग व वापर, बीज प्रक्रिया, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी, कृषी निविष्ठांच्या वाजवी वापराबाबत जनजागृती मोहीम, कृषी आधारित व्यवसाय युनिट उभारणी, कृषी विषयक माहिती तंत्रज्ञानाचे साधने बाबत माहिती, खरीप पिकांच्या रोपवाटिका, माती परीक्षण



आधारित खतांचा वापर व मृदा आरोग्य पत्रिका वाटप या बाबत तालुक्यातील प्रत्येक गावात जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले व शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला या कार्यक्रमाचे आयोजन तालुक्यातील सर्व सहाय्यक कृषी अधिकारी व उप कृषी अधिकारी यांनी केले.

## ट्रकला कर्जतमध्ये भीषण अपघात

**महासागर प्रतिनिधी,**

कर्जत: लाद्यांची वाहतूक करणाऱ्या भरधाव ट्रकला कर्जत चार फाटा येथे भीषण अपघात घडला.चौक रस्त्यावरून कर्जत शहराकडे येत असताना रस्त्याच्या उतारावर वाहनाचे ब्रेक फेल झाल्याने हा अपघात घडला.सुदैवाने यामध्ये कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी अडकलेल्या वाहन चालकाला ट्रकचे केबिन तोडून नागरिकांनी सुखरूप बाहेर काढले आहे.कायम वाहनांची वर्दळ असणाऱ्या या ठिकाणी सकाळी सात वाजण्याच्या सुमार अपघात घडल्याने मोठी दुर्घटना होता टळली.वाहन



चालकाने देखील प्रसंग अवधान राखत हात करून लोडेड ट्रक थांबवण्यासाठी चार फाट्यावर बांधकाम करीत असलेल्या चबुत्र्यास धडक देऊन ट्रक रस्त्याच्या खोल बाजूस उलटवला. वाहन चालकास क्रेनच्या मदतीने केबिन बाहेर सुखरूप काढून नागरिकांनी माणूस धर्म पाळला.घटनास्थळी कर्जत पोलीस हजर होवून जखमी चालकास रायगड हॉस्पिटल येथे उपचारासाठी नेण्यात आले आहे.

## तळा बाजारपेठेत यावर्षी लवकरच अळंबी दाखल

**महासागर प्रतिनिधी,**

तळा: दरवर्षी पावसाळा सुरू झाला की खवय्यांना आपसूकच अळंबीची आठवण येते. बाजारात विक्रीसाठी कधी अळंबी येते आणि ती कधी खरेदी करून खायला मिळते याची आतुरतेने हे खवय्ये वाट बघत असतात. मात्र यावर्षी अळंबी साठी खवय्यांना जास्त प्रतीक्षा करावी लागली नाही.यावर्षी ही अळंबी लवकर आल्याने ती विक्रीसाठी बाजारात दाखल होताच खवय्यांची खरेदीसाठी एकच झुंबड उडाली.अळंबी ही डोगंराळ भागात सागवानी झुडपात कुजलेल्या पालापाचोळा व माळरानावर सुद्धा आढळते. या अळंबी साठी शेतकरी वर्ग सकाळी लवकर उठून माळरानावर अळंबीच्या शोधात फिरत असतात. अळंबी सकाळी पहाटे कळ्या स्वरुपात,तर दुपारी ती फुललेली आढळते. अळंबी ही चविष्ट व रुचकर अशी रानभाजी म्हणुन लोक आवडीने खातात. शहरातील नागरिकांमधून सुद्धा अळंबीला मोठी मागणी असते.आदीवासी महिला अळंबी बाजारात विक्रीसाठी आणताच शहरातील नागरिक आहे ती किंमत



मोजून त्यांच्याकडुन विकत घेतात.सध्या बाजारपेठेत अळंबीचा वाटा हा ५० रुपये प्रमाणे विकला जात असून त्यांचे वजन साधारण १००ते१५०ग्रॅम असते. आदीवासी भगिनी मोठ्या प्रमाणात या अळंबी विक्री करून पैसे मिळवितात.व या पैशातूनच आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवितात.

## ग्रामपंचायत आंबेवाडी आदिशक्ती अभियान समिती अध्यक्षापदी सौ.प्रितम ताई पाटील यांची निवड

**महासागर प्रतिनिधी,**

रोहा: नुकतीच माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. त्यातच महिला सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकारने आदिशक्ती अभियान ही योजना ग्राम पंचायत स्तरावर सुरू केली आहे. या अभियाना अंतर्गत महिला विकास विषयक कार्ये म्हणजेच बालविवाह रोखणे,हुंडा पद्धती बंद करणे,महिला संरक्षण, गावातील एकल महिला, विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच,महिला सक्षमीकरण विषयक कार्ये अंतर्गत महिला बचत गटांची निर्मिती व सक्षमीकरणासाठी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मदतीने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य करण्यात येणार आहे.या अनुषंगाने आंबेवाडी ग्रामपंचायतीने आदिशक्ती अभियान समिती स्थापन केले असुन या समितीच्या अध्यक्ष पदी सौ.प्रितमताई निशिकांत पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या जाणीव जागृती कार्यक्रमांतर्गत कायदे, योजना व त्यांची अंमलबजावणी



करणाऱ्या यंत्रणा व सुविधा याबाबत प्रबोधन करण्यात येणार आहे. ग्राम सुरक्षा यंत्रणे अंतर्गत आरोग्य, शिक्षण व संरक्षणाशी संबंधित असणाऱ्या समित्यांना बाल संरक्षण समिती, महिला आरोग्य व पोषण समिती, महात्मा गांधी तंटा मुक्त ग्राम समित्ती शालेय व्यवस्थापन संदर्भात काम करण्यात येईल.

# शासकीय जमिनींवर आर्थिक केंद्र विकसित करा- मुख्यमंत्री

**मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**

पायाभूत सुविधांचे विकास प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्या जवळील शासकीय जमिनी चिन्हांकित करण्यात याव्यात. या शासकीय जमिनींचा वांद्रे कुर्ला संकुलाच्या धर्तीवर विकास करून नवीन आर्थिक केंद्र विकसित करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले.

देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृह येथे सागरी किनारा रस्ता उत्तर वाहिनी कामाचा आढावा घेतला. कांदळवनांचे संवर्धन करीत वर्सोवा ते भाईंदर सागरी किनारा उत्तर वाहिनी रस्त्याचे काम पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी बैठकीत दिल्या. सागरी किनारा रस्त्यांच्या कामांमुळे बाधित होणाऱ्या कांदळवनापेक्षा अधिकचे कांदळवन वाढविण्यात यावे. प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या एकाच वेळी घेण्यात याव्यात. प्रकल्प निश्चित केलेल्या डिसेंबर २०२८ कालावधी पर्यंत पूर्ण करावा, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या रस्ता कामासाठी १६५ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. यामध्ये बहुतांशी शासकीय जमिन आहे. प्रकल्पासाठी शासकीय जमीन हस्तांतरित करण्याची कार्यवाही यंत्रणांनी पुढील १५ दिवसात पूर्ण करावी. वर्सोवा येथील मत्स्य व्यवसाय विभागाची प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जागाही पाठपुरावा करून प्राप्त करून घ्यावी. या सागरी किनारी मार्गाला मढ ते वर्सोवा जोड मार्ग एमएमआरडीए सोबत समन्वय ठेवून तयार करावा, असे फडणवीस म्हणाले.

हा सागरी किनारी रस्ता निर्माण करतानाच यावर जाहिरातींसाठी फ्लेक्स, होर्डिंगच्या संबंधाने नियोजन करावे. यासाठी सल्लागाराची नियुक्ती करावी. जाहिरातींच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातून रस्त्यांच्या दुरुस्ती आणि व्यवस्थापनावरील खर्चासाठी तरतूद करता येईल, अशा सूचनाही फडणवीस यांनी केल्या.

या बैठकीला मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मिरा -भाईंदर मनपा आयुक्त राधाबिनोद शर्मा, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड आदी उपस्थित होते.

**वर्सोवा ते भाईंदर सागरी किनारी मार्ग**

या सागरी किनारी मार्गाचा मुख्य रस्ता २६ किलोमीटर लांबीचा आहे. या रस्त्याची जोडमार्गांसह एकूण लांबी ६३ किलोमीटर आहे. सागरी किनारी प्रकल्पाचे काम सहा टप्प्यात करण्यात येणार आहे. यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली प्रकल्पासाठी एकूण १६५ हेक्टर जमीन लागणार आहे.

# इंदिरा गांधींची आणीबाणी संविधानाच्या चौकटीत राहूनच-संजय राऊत

**मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**




तत्कालीन स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू केली होती. या आणीबाणीला विरोध करत भाजपने (तेव्हाचा जनसंघ) आंदोलन उभारले होते. आता केंद्रातील भाजपा सरकार आणि राज्यातील भाजपा सरकार २५ जून हा संविधान हत्या दिन म्हणून साजरा करतात. इंदिरा गांधी यांनी त्यावेळची गरज ओळखून संविधानाच्या चौकटीत राहूनच आणीबाणी लागू केली होती. यामुळे भाजपाचे हे कृत्य म्हणजे संविधानाची हत्या आहे असे वक्तव्य असे राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे एका सभेच्या वेळी सांगितले.

फ्रेण्ड्स ऑफ डेमोक्रसी संस्थेच्या वतीने फॅसिस्ट हुकुमशाहीला विरोध करण्यासाठी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे गुरुवारी एका सभेचे आयोजन केले होते त्या मंचावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. आणीबाणी प्रकरणी इंदिरा गांधी यांनी चूक नसताना चूक मान्य केली होती. हा त्यांचा मोठेपणा पाहून त्यांना पुन्हा जनतेने भरघोस मतांनी निवडून दिले होते असेही राऊत यांनी सांगितले.

आणिबाणीच्या काळात वर्तमानपत्र बंद करणारे शंकरराव चव्हाण यांचा मुलगा आज भाजपात सामील झाला आहे. मग भाजपने तो काळा अध्याय मानायचा का? काळा अध्याय म्हणायचं असेल तर महात्मा गांधींचा खून झाला तो होता, दुसरा काळा अध्याय आहे. अमेरिकेचे प्रेसिडेंट ट्रम्पच्या दबावाखाली देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी नतमस्तक झाले यापेक्षा मोठा काळा अध्याय कोणता असू शकतो? असे राऊत म्हणाले.

**संजीव भट यांना खोट्या केस मध्ये गुंतवले**

गुजरात मध्ये अन्यायाविरोधात आवाज उठवणारे स्वर्गीय पोलिस अधिकारी संजीव भट यांच्या पत्नी श्वेता भट यावेळी म्हणाल्या की, सात वर्षापूर्वी माझ्या नवऱ्याला सकाळी आमच्या घरातून ४० पोलिसांच्या पथकाने संजीव भट यांना उचलून नेले. ते आज पर्यंत घरी आले नाहीत. ३० वर्षापूर्वीच्या खोट्या केस मध्ये त्यांना गुंतवले होते. या प्रकारे होत असलेला अन्याय मी सहन करत लढत आहे.

**गोध्रा हत्याकांड पूर्वनियोजित- कुमार केतकर**

माजी राज्यसभा सदस्य कुमार केतकर म्हणाले, गोध्रा हत्याकांड पूर्वनियोजित होते. मोसाद इस्रायल देश आपल्या देशावर ताबा मिळवत असताना पंतप्रधान गप्प आहेत. समाजसेवक अण्णा हजारे प्रामाणिक नाहीत. भाजपाचे सरकार हुकूमशाही सरकार आहे. असे आरोप त्यांनी केले. तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी भाजपा सरकार जोपर्यंत सत्तेवरून जात नाही तोपर्यंत गोरगरीब जनतेला न्याय मिळणार नाही असे सांगितले.

माजी गृहमंत्री अनिल देशमुख म्हणाले, माझे हिंदी चित्रपट अभिनेत्री सोबत संबंध आहेत असे व अजून डझनभर खोटे आरोप करत कसाब राहत असलेल्या तुरुंगातील कोठडीत मला व संजय राऊत यांना ठेवले होते. आम्ही एकत्र जेवण करू नये म्हणून पाळत ठेवायचे. असे अनेक किस्से सांगितले. आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले, भाजपची सत्ता ज्यावेळी नव्हती तेव्हा भाजपचे किती मंत्री आमदार खासदार भाजप सोडून इतर पक्षात गेले ? आता जर जनता शहाणी झाली नाही तर, देशाचे भविष्य अवघड आहे.

# नवी मुंबईची पाण्याची तहान भागवण्यासाठी सिडकोने अंमलात आणलेल्या उपाययोजना सिडकोचे धोरणात्मक जलनियोजन : नवी मुंबईकरिता वरदान



**नवी मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) आणि महागृहनिर्माण योजना, यांसारख्या प्रकल्पांमुळे नवी मुंबईचा वेगाने विस्तार होत आहे. याचा परिणाम म्हणून या प्रकल्प क्षेत्रांमध्ये पाण्याची मागणीही दिवसेंदिवस वाढत आहे. पाण्याची ही वाढती मागणी पूर्ण करण्यासह नवी मुंबईच्या गतिमान विकासाला आधार देणाऱ्या पाणी पुरवठा योजनांची आखणी सिडकोकडून करण्यात येत आहे. पाणी पुरवठा प्रकल्पांचे महत्त्व लक्षात घेऊन जलबोगदे व जलशुद्धीकरण केंद्रांच्या गुणवत्ता आणि प्रगतीवर देखरेख करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्ञान आणण्याच्या दष्टीकोनातून नामांकित प्रकल्प व्यवस्थापन सल्लागांराची नियुक्ती करण्यात येत आहे. हेटवणे पाणी पुरवठा जलावर्धनाचे काम 2029 च्या मध्यापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

सन 2050 पर्यंत सिडको आणि नैना क्षेत्रांमधील पाण्याची अंतिम मागणी 1275 एमएलडी इतकी प्रकल्पित आहे. ही मागणी पूर्ण करण्याकरिता सिडकोने व्यापक आराखडा तयार केला असून त्या अंतर्गत हेटवणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा), नवी मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) या सध्या अस्तित्वात असलेल्या स्रोतांचा कमाल वापर करण्यासह बाळगंगा धरण व कोंढाणे धरण यांसारखे नवीन स्रोत निर्माण करण्याचा समावेश आहे.

> “नवी मुंबईचा विकास आणि विस्तार सातत्याने होत असताना शाश्वत जलव्यवस्थापनप्रति असणारी आमची कटिबद्धता कायम आहे. वर्तमानातील तसेच भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी सक्षम असे पाणी पुरवठा पायाभूत सुविधांचे जाळे आम्ही विकसित करीत आहोत.”
>
> **- विजय सिंघल**
> **उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोतर्फे प्रस्तावित करण्यात आलेला बहुप्रतीक्षित कोंढाणे धरण प्रकल्प हा सिडको प्रशासित क्षेत्रातील वेगाने विकसित होत असलेल्या भागांना पाणी पुरवठा करणारा महत्त्वाचा स्रोत ठरणार आहे. कोंढाणे धरण हे उल्हास नदीवर मोक्याच्या ठिकाणी स्थित आहे. सुरूवातीस या धरणातून 250 एमएलडी पाणी पुरवठा होणार असून अंतिमत: तो 350 एमएलडी पर्यंत वाढविण्यात येणार आहे.

बाळगंगा व कोंढाणे धरणांचे काम पूर्ण होण्यासाठी लागणारा अंदाजे 4-5 वर्षांचा कालावधी लक्षात घेता, सध्याची पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी हेटवणे धरण आणि मजीप्राच्या न्हावा-शेवा-टप्पा-3 या सध्या अस्तित्वात असलेल्या स्रोतांद्वारे अतिरिक्त पाण्याचा कोटा मंजूर करण्याची विनंती सिडकोने केली आहे.

ऑगस्ट 2020 मध्ये रु. 119.80 कोटी रकमेच्या बदल्यात महाराष्ट्र शासनाने पाण्याचा अतिरिक्त 120 एमएलडी कोटा मंजूर केल्याने सिडकोला सद्यस्थितीत हेटवणे धरणातून 270 एमएलडी पाणी मिळत आहे. सदर अतिरिक्त 120 एमएलडी पाणी उपयोगात आणण्याकरिता आराखडा तयार करण्यासह सध्याच्या 270 एमएलडी पाणी पुरवठा प्रणालीचे आवर्धन करण्यासाठी सिडकोतर्फे तज्ज्ञ सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

हेटवणे जलावर्धन योजना जून 2029 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून योजना चाप टप्प्यांत विकसित करण्यात येत आहे. सद्यस्थितीत जलशुद्धीकरण केंद्राचे 41%, प्रक्रिया न केलेल्या पाण्याच्या जलबोगद्याचे 8.5% व शुद्ध पाण्याच्या जलबोगद्याचे 25.7% काम पूर्ण झाले आहे.

कोंढाणे धरणाद्वारे नैना प्रकल्पाला सुरळीत पाणी पुरवठा होणार आहे. त्याचप्रमाणे, हेटवणे पाणी पुरवठा जलावर्धन योजनेद्वारे सिडको अधिकारक्षेत्रासह पनवेल महानगरपालिका क्षेत्राला सुरळीत पाणी पुरवठा होणे सुनिश्चित होणार आहे.

## व्हर्टिकल सातबारा येणार; इमारतीतील प्रत्येकाला मिळणार जागेचे थेट स्वामित्व!

**मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**

राज्यातील फ्लॅटधारकांना त्यांच्या घराचे थेट स्वामित्व मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जाणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने ‘व्हर्टिकल सातबारा’ या क्रांतिकारी योजनेवर काम सुरू झाले असून, येत्या पावसाळी अधिवेशनात या संदर्भातील विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.

सध्या गाळेदार (leasehold) तत्त्वावर असलेल्या इमारतींमध्ये राहताना रहिवाशांना सातबारा उतारा मिळत नाही. मात्र व्हर्टिकल सातबारा लागू झाल्यास, प्रत्येक फ्लॅटमालकाला त्याच्या फ्लॅटचा स्वतंत्र सातबारा उतारा मिळू शकणार आहे. त्यामुळे घराच्या खरेदी-विक्रीसह बँक कर्ज व्यवहार, वारसाहक्क हस्तांतरण या बाबी सोप्या आणि पारदर्शक होतील.

राज्यातील शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर बहुमजली इमारती उभ्या राहिल्या असताना, त्या जागेच्या मूळ सातबारावरच नोंद होत असल्याने फ्लॅटधारकांना त्यांचे थेट मालकी हक्क सिद्ध करणे अवघड जाते. हे लक्षात घेऊन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या योजनेचा प्रस्ताव तयार केला असून, अंतिम मसुद्यावर सध्या विचारविनिमय सुरू आहे. ‘व्हर्टिकल सातबारा’ हा महाराष्ट्रातील मालमत्ता हक्क व्यवस्थेतील ऐतिहासिक बदल ठरणार आहे. यामुळे घर खरेदी करणाऱ्यांना त्यांच्या जागेचा स्वतंत्र मालकी हक्क मिळेल आणि शासकीय कागदपत्रांतील गुंतागुंत कमी होईल, असे महसूल विभागातील सूत्रांनी सांगितले.


ANAND RATHI आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, ओबेरॉय मॉलच्या समोर, गोरेगाव (ई), मुंबई ४०००६३.भारत

एम/एस बालाजी एन्टरप्राईज **ताबा सूचना** LAN No. APPL00001202

तर, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा कायदा ५४) अंतर्गत आणि कलमांखाली दिलेल्या अधिकारांचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह १३(१२) वाचले, सिक्युरिटायझेशन आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि कलम १३ उप-कलम २ अंतर्गत डिमांड नोटिस जारी केली (तपशील खालील तक्त्यामध्ये, यापुढे डिमांड नोटीसमध्ये नमूद केले आहे) सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या अंमलबजावणीची कर्जदारांना (तपशिल खाली दिलेल्या तक्त्यामध्ये नमूद केले आहे, त्यानंतर कर्जदाराला) डिमांड नोटिसमध्ये नमूद केलेल्या रकमेसह पुढील आणि भविष्यातील व्याज एकत्रितपणे व्याजाच्या दराने परतफेड करण्याचे आवाहन डिमांड नोटिसच्या तारखेपासून (असल्यास) देय असलेले खर्च आणि शुल्क आणि इतर पैसे (जर असेल तर) डिमांड नोटिस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत एआरजीएफएल द्वारे देय आणि/किंवा वसूलीपर्यंत (यापुढे देय रक्कम).

कर्जदार (ते) आणि सह-कर्जदार (ते) देय रक्कम परत करण्यात अयशस्वी झाले आहेत, ही सूचना खाली नमूद केलेल्या कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसाधारणपणे सार्वजनिकपणे दिली जाते की खाली स्वाक्षरीदाराने मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. (डिमांड नोटिस अंतर्गत परिभाषित केल्यानुसार) सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या पोटकलम (४) अंतर्गत त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या वापरात खाली वर्णन केले आहे. तारखेला सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ मध्ये खाली नमूद केले आहे.

कर्जदार आणि सह-कर्जदार (ने) विशेषतः आणि सामान्यत: लोकांना याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेशी व्यवहार करू नका आणि मालमत्ता/सुरक्षित मालमत्तांशी कोणतेही व्यवहार आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडच्या शुल्काच्या अधीन असतील (विशेषत: खाली नमूद केले आहे) थकबाकीच्या रकमेसाठी पुढील आणि भविष्यातील व्याजासह त्यावरील व्याजाच्या दराने खर्च आणि शुल्क आणि एआरजीएफएल द्वारे पेमेंट आणि/किंवा वसूलीच्या तारखेपर्यंत (असल्यास) देय असलेले इतर पैसे आणि / किवा सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात आले आहे.

कर्जदाराचे नाव पत्ता: एम/एस. बालाजी एंटरप्राइजेस, ५/७, मोतीशाह चाळ, सत्ता गल्ली, झवेरी बाजार, मुंबई ४००००२.

सह-कर्जदारांचे नाव पत्ता: १. श्री. रमेशकुमार रावसाहेब देशमुख २. श्री. रणवीरसिंग रमेशकुमार देशमुख ३. श्रीमती भारती रमेशकुमार देशमुख फ्लॅट क्रमांक ३०३, तिसरा मजला, पी विंग, नेमिनाथ नगर, नालासोपारा पूर्व, पिन कोड: ४०१२०९.

| | | |
|---|---|---|
| मागणी सूचनेनुसार देय रक्कम पुढील व्याजासह लागू: रु. २३,२२,९९३/- (रुपये तेवीस लाख बावीस हजार नऊशे त्रिनव्वद फक्त) | आरओआय | 13.00% |
| | मुख्य थकबाकीदार | 2,162,406 |
| मागणी सूचनेची तारीख: १७ एप्रिल २०२५ | ईएमआय रक्कम प्रलंबित | 117,356 |
| | खंडित कालावधी व्याज | 7,028 |
| कर्ज करार क्रमांक: **APPL00001202** | थकीत व्याजापेक्षा जास्त | 10,546 |
| | कायदेशीर शुल्क | 16,500 |
| ताबा घेण्याची तारीख: २६ जून २०२५ | नोटीस शुल्क | 1,100 |
| | ईएमआय बाऊन्स चार्जेस | 8,057 |
| | एकूण थकबाकी | **23,22,993** |

मालमत्तेचा तपशील: फ्लॅट क्र. ३०३, तिसरा मजला, पी विंग, नेमिनाथ नगर सीएचएसएल, आचोळे रोड, नेमिनाथ हॉस्पिटलजवळ, नालासोपारा पूर्व, पालघर-४०१२०९.

तारीख: २६ जून २०२५
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
प्राधिकृत अधिकारी


## संविधान बदलून मनुस्मृती लादण्याचा संघ-भाजपाचा अजेंडा-हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**

भाजपा व त्यांची मातृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला पहिल्यापासूनच संविधान मान्य नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान बदलून मनुस्मृती लादण्याचा त्यांचा अजेंडा लपून राहिलेला नाही. संविधानाच्या उद्देशिकेतून सेक्युलर आणि सोशालिस्ट हे शब्द काढण्याच्या रा. स्व. संघाचे सरचिटणीस दत्तात्रय होसबळे यांच्या मागणीतून ते पुन्हा एकदा स्पष्ट होत आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला हिंदू राष्ट्र स्थापन करायचे आहे हे सातत्याने त्यांच्या व भाजपा नेत्यांच्या विधानातून उघड होत आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तर भाजपा नेते ४०० जागांवर विजय मिळाला तर संविधान बदलणार हे जाहीरपणे सांगत होते. सरसंघचालक मोहन भागवत यांनीही संविधानाची समिक्षा केली पाहिजे असे वक्तव्य केले होते. तर पंतप्रधान मोदी यांचे आर्थिक सल्लागार म्हणून काम पाहताना विवेक देबरॉय यांनीही संविधान बदलण्याची गरज आहे असे उघडपणे म्हटले होते. भाजपा व संघ परिवारातून अशा विधानाचे खंडनही केले जात नाही. संविधान, तिरंगा झेंडा हे संघाला मान्य नाही त्यामुळे ते बदलण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु आहे तो आजही कायम आहे.

# प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींचे विसर्जन न्यायालयात टिकेल असे धोरण -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मोठ्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात प्रथा परंपरेनुसार व्हावे, यासाठी पर्यावरणाचा दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असलेले व न्यायालयात टिकेल असे धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासंदर्भात सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशिष



शेलार आदी उपस्थित होते.


प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेश मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात न्यायालयाने निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार राज्य शासनाने राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोगाकडून अहवाल मागविला होता. आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी हा अहवाल दिला असून त्यात काही शिफारसी करण्यात आल्या होत्या. खोल समुद्रात मोठ्या मूर्तींचे विसर्जन करण्यासंदर्भात अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचा अभ्यास करून न्यायालयासमोर बाजू मांडण्यात यावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले. तसेच सार्वजनिक गणेश विसर्जनानंतर समुद्र किनारे स्वच्छ करण्याची काळजी घेण्यासाठी ठोस उपाय आवश्यक आहेत, तसेच गणेश मूर्तीं तयार करताना पर्यावरणस्नेही सामुग्रीचा वापर व नैसर्गिक रंगाचा वापर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार म्हणाले की, सार्वजनिक गणेशोत्सव प्रथा परंपरेनुसार साजरा व्हावा व उंच व मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी पर्यावरणपूरक मार्ग काढण्यात यावा. तसेच छोट्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्यात यावे. शाडूच्या व पर्यावरण पूरक सामग्रीचा वापर करून मूर्ती बनविण्यासंदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे.

डॉ. काकोडकर यांनी जल प्रदुषणाचा विचार करून पर्यावरणपूरक गणेश मूर्ती बनविण्यावर भर देण्यात यावा. रासायनिक रंगांमुळे जास्त प्रदुषण होते. त्यामुळे नैसर्गिक रंगाचा वापर करणे, पर्यावरणपूरक साहित्य वापरणे यावर भर देऊन जनजागृती करण्यासंदर्भात त्यांनी सूचित केले, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# मनमाडहून कॅनडापर्यंत : संघर्षातून घडलेली रेचलची यशोगाथा

**मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**



मनमाडसारख्या छोट्या शहरात वाढलेल्या, पण मोठी स्वप्नं पाहणाऱ्या रेचल शांतवन निकाळजे हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या जोरावर कॅनडामध्ये यशस्वी वाटचाल करत आपल्या कुटुंबाचेच नाही, तर संपूर्ण गावाचेही नाव उज्वल केले आहे.

कॅनडातील Conestoga College मधून Nursing Leadership and Healthcare Management हा अभ्यासक्रम पूर्ण करणे हे तिच्यासाठी सोपं नव्हतं. मध्यमवर्गीय कुटुंब, आर्थिक मर्यादा, आईच्या गंभीर आजारपणात शस्त्रक्रिया, दोन नोकऱ्या गमावण्याचा धक्का… या साऱ्या अडथळ्यांनी रेचलचा प्रवास खडतरच केला. पण तिच्या स्वप्नांच्या उंच झेपेला कोणताही अडथळा थांबवू शकला नाही.

“माझे वडील शाळेत जाऊ शकले नाहीत, पण त्यांनी मला शिकवले की, परिस्थिती कशीही असली तरी स्वप्नं पाहणं थांबवू नकोस. वडिलांनी मला पंख दिले, आणि त्या पंखांना बळ देण्याचं काम केलं माझ्या आईने,” असं रेचल सांगते, आणि तिच्या डोळ्यातून कृतज्ञतेचे अश्रू ओघळतात.

आर्थिक अडचणी, जबाबदाऱ्या, आईच्या आजारपणाचा काळ, शिक्षणाच्या खर्चासाठी धडपड… हे सगळं सांभाळत तिने कॅनडामध्ये शिक्षण पूर्ण केलं. तिने सिद्ध केलं की, “मनमाडसारख्या लहान गावातूनही मोठी स्वप्नं पाहता येतात, आणि ती सत्यातही उतरवता येतात.”

आज रेचलने तिच्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे. तिच्या यशोगाथेने मुंबईसह महाराष्ट्रातील हजारो तरुणांना प्रेरणा मिळेल की, संकटं कितीही मोठी असली, तरी धैर्य, संयम आणि प्रामाणिक प्रयत्न हेच यशाचे खरे मंत्र आहेत.

**मनमाडच्या रेचलने दाखवून दिलंय –**

“स्वप्नं कुठून पाहिली याला अर्थ नसतो, ती पूर्ण करण्यासाठी किती झगडलं, हाच खरा अर्थ असतो.”

## त्रिभाषा अहवाल उद्धव ठाकरेंनी स्वीकारला-मंत्री उदय सामंत

**मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**

राज्यात हिंदी सक्तीवरून राजकारण करणाऱ्या शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी त्रिभाषेचा अहवाल २०२२ मध्ये स्विकारला होता, असा पलटवार उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला. आंदोलनाची भूमिका घेणाऱ्या उद्धव ठाकरेंचे मराठी प्रेम बेगडी असल्याची जोरदार टीका केली.

राज्यात हिंदी सक्तीचा मुद्दा तापला आहे. मनसे आणि शिवसेनेने (ठाकरे) यांनी हिंदी विरोधात आक्रमक भूमिका घेत, आंदोलनाचा इशारा दिला आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सामंत यांनी गुरुवारी बाळासाहेब भवन येथे पत्रकार परिषद घेऊन हिंदी सक्तीबाबतचे उद्धव ठाकरेंचे मुद्दे खोडून काढले.

महाविकास आघाडी सरकारमध्ये ठाकरे तत्कालीन मुख्यमंत्री होते. याकाळात डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी त्रिभाषीय अहवाल तयार केला होता. तो तत्कालीन कॅबिनेट बैठकीत ठाकरेंनी स्वीकारला. या अहवालात मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेचा उल्लेख होता. त्यामुळे मराठी भाषेवर प्रेम सांगणाऱ्यांनी तेव्हा हा त्रिभाषिक अहवाल का स्वीकारला? असा सवाल सामंत यांनी उपस्थित करत ठाकरे यांच्यावर टीका केली. मराठी आणि मराठी माणसाबद्दल त्यांच्या मनात प्रेम नाही. आगामी पालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे हिंदी सक्तीचे आणि मराठीवरून राजकारण करत आहेत, असा आरोप केला.

राज्य सरकार हिंदी भाषेचा आग्रह किंवा अनिवार्य देखील केलेला नाही. परंतु दोन-तीन वर्षांपूर्वी आदित्य ठाकरे यांनीही मराठी, इंग्रजी आणि तिसऱ्या भाषेचा पर्यायाबदल भूमिका मांडतानाचा जुना व्हिडिओ पत्रकार परिषदेत दाखवला. तिसऱ्या भाषेबद्दल त्यांची तेव्हा भूमिका होती तर आता भूमिका का बदलली? की फक्त निवडणुकीच्या तोंडावर त्यांची भूमिका बदलली, अशी टीका सामंतांनी आदित्य यांच्यावर केली. मराठी माणसाबद्दल बोलत आहेत. पण त्यावेळी विरोध केला असता तर आज ही वेळ आली नसती, असेही त्यांनी सांगितले. सरकारने कुठेही हिंदी भाषा सक्ती आहे, असा उल्लेख केलेला नाही. उलट विरोधक संभ्रम निर्माण करत आहेत. मात्र मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक झाली असून साहित्यिक, लेखक, कवी मराठी भाषेची अभ्यासक, तज्ञ जाणकार यांची मते घेऊन हिंदी भाषेबद्दल निर्णय घेण्यात येईल, असे सामंत म्हणाले. शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेऊन शासनाचे धोरण आणि भूमिका समजून सांगितली. परंतु सरकारचे धोरण अमान्य असल्याचे राज म्हटले. तसेच त्यांनी ६ जुलैला गिरगाव चौपाटी ते आझाद मैदानात मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली. सर्वपक्षीयांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. राज यांचा हेतू हा मराठी माणसांसाठी आणि मराठी भाषेसाठी आहे, असे सामंत यांनी सांगितले. तर दुसरीकडे काही जण राजकारण आणि निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ७ जुलैला मोर्चा काढत आहेत, असा निशाणा साधला.


ANAND RATHI आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, ओबेरॉय मॉलच्या समोर, गोरेगाव (ई), मुंबई ४०००६३. भारत

एम/एस. श्री शांतीनाथ एन्टरप्राईजेस LAN No. APPL00011150

**ताबा सूचना**

तर, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा कायदा ५४) अंतर्गत आणि कलमांखाली दिलेल्या अधिकारांचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह १३(१२) वाचले, सिक्युरिटायझेशन आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि कलम १३ उप-कलम २ अंतर्गत डिमांड नोटिस जारी केली (तपशील खालील तक्त्यामध्ये, यापुढे डिमांड नोटीसमध्ये नमूद केले आहे) सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या अंमलबजावणीची कर्जदारांना (तपशिल खाली दिलेल्या तक्त्यामध्ये नमूद केले आहे, त्यानंतर कर्जदाराला) डिमांड नोटिसमध्ये नमूद केलेल्या रकमेसह पुढील आणि भविष्यातील व्याज एकत्रितपणे व्याजाच्या दराने परतफेड करण्याचे आवाहन डिमांड नोटिसच्या तारखेपासून (असल्यास) देय असलेले खर्च आणि शुल्क आणि इतर पैसे (जर असेल तर) डिमांड नोटिस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत एआरजीएफएल द्वारे देय आणि/किंवा वसूलीपर्यंत (यापुढे देय रक्कम).

कर्जदार (ते) आणि सह-कर्जदार (ते) देय रक्कम परत करण्यात अयशस्वी झाले आहेत, ही सूचना खाली नमूद केलेल्या कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसाधारणपणे सार्वजनिकपणे दिली जाते की खाली स्वाक्षरीदाराने मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. (डिमांड नोटिस अंतर्गत परिभाषित केल्यानुसार) सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या पोटकलम (४) अंतर्गत त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या वापरात खाली वर्णन केले आहे. तारखेला सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ मध्ये खाली नमूद केले आहे.

कर्जदार आणि सह-कर्जदार (ने) विशेषतः आणि सामान्यत: लोकांना याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेशी व्यवहार करू नका आणि मालमत्ता/सुरक्षित मालमत्तांशी कोणतेही व्यवहार आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडच्या शुल्काच्या अधीन असतील (विशेषत: खाली नमूद केले आहे) थकबाकीच्या रकमेसाठी पुढील आणि भविष्यातील व्याजासह त्यावरील व्याजाच्या दराने खर्च आणि शुल्क आणि एआरजीएफएल द्वारे पेमेंट आणि/किंवा वसूलीच्या तारखेपर्यंत (असल्यास) देय असलेले इतर पैसे आणि / किवा सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात आले आहे.

कर्जदाराचे नाव पत्ता: मेसर्स श्री शांतीनाथ एंटरप्रायझेस, गाला क्रमांक ९, मोहम्मदअली कंपाउंड मालवणी, गेट क्रमांक ६, गुडलक सलूनजवळ, एएच मार्ग, मुंबई-४०००९५.

सह-कर्जदार(चे) नाव पत्ता: १ श्री. सुनील कुमार फूलचंद जैन २ श्रीमती सीमा सुनील जैन, ४०४, चामुंडा ज्वेल, टीन डोंगरी, यशवंत नगर, रोड क्रमांक ०१, गोरेगाव पश्चिम -४००१०४.

| | | |
|---|---|---|
| मागणी सूचनेनुसार देय रक्कम लागू असलेल्या पुढील व्याजासह: रु. १,९१,६६,६४२/- (रुपये एक कोटी एक्याण्णव लाख सहासष्ट हजार सहाशे बेचाळीस फक्त) | आरओआय | 12.75% |
| | प्राचार्य थकबाकीदार | 18,061,280 |
| मागणी सूचनेची तारीख: १७ एप्रिल २०२५ | ईएमआय रक्कम प्रलंबित | 921,160 |
| | खंडित कालावधी व्याज | 57,570 |
| कर्ज करार क्रमांक: **APPL00011150** | थकीत व्याजापेक्षा जास्त | 80,642 |
| | कायदेशीर शुल्क | 32,890 |
| ताबा घेण्याची तारीख: २६ जून २०२५ | नोटीस शुल्क | 1,100 |
| | ईएमआय बाऊन्स चार्जेस | 12,000 |
| | एकूण थकबाकी | **1,91,66,642** |

मालमत्तेचा तपशील: फ्लॅट क्रमांक ४०४, ४था मजला, चामुंडा ज्वेल सीएचएसएल, सुंदर नगर रोड, दालमिया कॉलेज जवळ, गोरेगाव पश्चिम, मुंबई -४०००६४, मुंबई, महाराष्ट्र, भारत.

तारीख: २६ जून २०२५
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
प्राधिकृत अधिकारी

# शेख हसीना भारतातच सुरक्षित...!

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा मुक्काम भारतात नवी दिल्लीत असला तरी दिवसेंदिवस बांगलादेशचे सल्लागार मुहम्मद युनूस यांच्या हंगामी सरकारने हसीना यांना कायदेशीर कारवाईत अडकविण्यासाठी सर्व काही पणाला लावले आहे.

बांगलादेशच्या नॅशनल सेंट्रल ब्युरोने इंटरपोलला बारा जणांच्या विरोधात रेड नोटीस जारी करण्याची शिफारस केली आहे. उच्चपदस्थांच्या यादीत शेख हसीना यांचेही नाव आहे. बांगलादेशात गेल्यावर्षी सरकारविरोधात मोठा हिंसक उठाव झाल्यानंतर ५ ऑगस्ट २०२४ रोजी ७७ वर्षांच्या शेख हसीना यांना पंतप्रधानपदावरून पायउतार होऊन आश्रयासाठी भारतात यावे लागले होते. बांगलादेशात सरकारविरोधी असंतोषाचा स्फोट झाल्यावर देशावर तब्बल सोळा वर्षे असलेल्या अवाम लीग पक्षाचे वर्चस्व संपुष्टात आले आणि या पक्षाचे शासनही सत्तेवरून गेले.

गेल्या वर्षी जुलै-ऑगस्टमध्ये शेख हसीना यांच्या सरकारच्या विरोधात असंतोष शिगेला पोहोचला होता. ढाका व अन्य शहरात हिंसाचाराचे थैमान सुरू होते. आपला जीव वाचविण्यासाठी देश सोडणे त्यांना भाग पडले. त्या ढाक्यातून विमानाने भारताकडे निघाल्या आणि अवघ्या तीस मिनिटांत आंदोलकांनी ढाक्यातील त्यांच्या अधिकृत निवासस्थानाचा कब्जा घेतला व तेथे तोडफोड व जाळपोळ केली.

हसीना ढाक्यातून पलायन करण्याच्या तयारीत आहेत हे लष्करप्रमुख जनरल वकार उझ जमान यांनाही तेव्हा ठाऊक नसावे. हसीना पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याच्या तयारीत आहे, एवढीच माहिती त्यांच्याकडे होती. नंतर जनरल वकार यांनी दिलेल्या एका मुलाखतीत म्हटले की, परिस्थिती एवढी चिघळली होती की, शेख हसीना यांनी देशात राहणे हे त्यांच्या जीवाला धोकादायक होते.

अशा परिस्थितीत बांगलादेश हवाई दलाच्या विशेष विमानाने ढाक्यातील बंग बंधू विमानतळारून दुपारी ३ वाजून ९ मिनिटांनी उड्डाण केले व हसीना यांना भारतातील उत्तर प्रदेशातील गजियाबादमधील हिंडन विमानतळावर पोहोचवले. हसीना यांची हिंसक आंदोलनातून कशी सुटका करण्यात आली याविषयी तेव्हा कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती, त्याचा वृत्तांत डेली स्टार या ढाक्यातील वृत्तपत्राने प्रसिद्ध केला.

ढाक्यात सर्वोच्च पदावर वर्षानुवर्षे बसलेल्या शेख हसीना यांना देशातील प्रखर लोकक्षोभापुढे देश सोडून भारतात यावे लागले. बांगलादेशच्या हंगामी सरकारने भारताकडे अनेकदा शेख हसीना यांना आमच्या ताब्यात द्या अशी मागणीही केली. मात्र बांगलादेशच्या मागणीवर भारताने कधीही प्रतिक्रिया दिली नाही.

शेख हसीना सत्तेवर असताना भारत-बांगलादेश यांचे संबंध मैत्रीपूर्ण होते व दोन्ही देशांत डझनावारी द्विपक्षीय करारही झाले. शेख हसीना यांनी भारतात राजाश्रय घेतल्यापासून मोहमद युनूस यांच्या काळात दोन्ही देशातील संबंध बिघडले व कटुता निर्माण झाली. मुहम्मद युनूस यांच्या सरकारचा कल पाकिस्तान व चीनकडे झुकलेला आहे हे जाणवत आहे.

बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणात शेख हसीना व इतरांच्या विरोधात आरोपपत्र दाखल झाले आहे. हसीना यांच्याविरोधात १३४ पानी आरोपपत्र दाखल झाले आहे. जुलै २०२४ मध्ये देशात आंदोलनाचा वणवा पेटला असताना आंदोलकांना हसीना सरकारने क्रूरपणे वागवले, हसीना सरकारच्या काळात विरोधी पक्षाचे अनेक नेते बेपत्ता होते व अनेकांच्या हत्यांमध्ये सरकारमध्ये असलेल्यांचा सहभाग होता, असेही आरोपपत्रात म्हटले आहे.

जुलै-ऑगस्टमध्ये झालेल्या आंदोलनात १४०० पेक्षा जास्त लोकांची हत्या झाली, त्यालाही हसीना व त्यांचे सहकारी कारणीभूत असल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर शेख हसीना व तत्कालीन गृहमंत्री असदुज्जमां खान कलाम यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे.

माजी पोलीस महानिरीक्षक चौधरी अब्दुल्ला अल मामून यांना यापूर्वीच अटक झाली आहे. विदेशात असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी व त्यांना हुडकून काढण्यासाठी बांगलादेश नॅशनल ब्युरोने इंटरपोलची मदत घेतली आहे.

मुहम्मद युनूस हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार आहेत व गेल्या वर्षी ८ ऑगस्टपासून त्यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशाचा कारभार पाहत आहे. मुहम्मद युनूस यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर आंतरराष्ट्रीय अपराध न्यायाधिकरणाने हसीना, त्यांच्या सरकारमधील मंत्री तसेच सल्लागार यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले. सैन्य दल व नागरिकांना अमानवीय वागणूक दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला होता.

एवढेच नव्हे हसीना सरकारने देशात नरसंहार घडविण्याचा गंभीर आरोप बांगलादेश सरकारने केला आहे. शेख हसीना यापुढेही भारतातच राहणार असतील तर त्यांना देशात परत आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय हस्तक्षेप करण्याची विनंती आम्हाला करावी लागेल असा इशारा बांगलादेशने भारताला दिला आहेच.

रेड कॉर्नर नोटीस हे काही वॉरंट नसते. जरी इंटरपोलने शेख हसीना यांना रेड कॉर्नर नोटीस बजावली तरी त्यांना बांगलादेशात परत पाठवायचे की नाही हे भारत सरकारच्या मर्जीवर अवलंबून आहे. भारतीय कायद्यानुसार शेख हसीना यांना इंटरपोल थेट अटक करू शकणार नाही. बांगलादेशबरोबर भारताचा प्रत्यार्पण करार झालेला आहे का? शेख हसीना यांच्याविरोधात केवळ राजकीय दृष्टिकोनातून रेड कॉर्नर नोटीस बजावण्यात आलेली आहे का? शेख हसीना यांना बांगलादेशकडे सोपविणे म्हणजे नव्या राजकीय वादळाला ओढवून घेण्यासारखे आहे, असे भारताला वाटले तर भारत रेड कॉर्नर नोटिसीला प्रतिसादही देणार नाही.

बांगलादेशातील मुहम्मद युनूस यांच्या सरकारने शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षावर दहशतवाद विरोधी कायद्याचा बडगा दाखवून यापूर्वीच बंदी घातली आहे. आवामी लीग पक्षाने मात्र सरकारची कृती ही हुकूमशाही व लोकशाही विरोधी असल्याचे म्हटले आहे.

आवामी लीगवर बंदी घालून व नेत्यांवर खटले भरून युनूस सरकार बांगलादेशची ओळखच पुसून टाकत आहे, आवामी लीगच्या नेत्यांवर खटले भरण्यासाठी कायद्यात केलेली सुधारणा हा बांगलादेशच्या इतिहासातील काळा दिवस आहे असे, पक्षाने म्हटले आहे. एवढेच नव्हे तर बांगलादेशच्या चलनातील नव्या नोटांवरून देशाचे संस्थापक व निर्माते शेख मुजीबूर रहेमान यांचा फोटोही हटविण्यात आला आहे.

आवामी लीग हा बांगलादेशचा सर्वात जुना पक्ष आहे. बंगबंधू शेख मुजीबूर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशला पाकिस्तानमधून मुक्ती मिळाली व नवा स्वतंत्र देश उदयाला आला. बांगलादेशच्या निर्मितीत भारताचे योगदान फार मोठे आहे. पण मुहम्मद युनूस हे ते मान्य करायलाच तयार नाहीत.

गेल्यावर्षी २०२४ मध्ये शेख मुजीबूर यांच्या कन्या शेख हसीना यांनाच देश सोडून भारतात आश्रय घेण्यासाठी यावे लागले हे दुर्दैव आहे. बांगलादेश राष्ट्रीय परिचय पत्र नोंदणी महासंचालकांनी शेख हसीना व त्यांच्या परिवारातील दहा जणांचे राष्ट्रीय ओळखपत्रही रद्द केले आहे. शेख हसीना या फेसबुकवर सक्रिय असून मुहम्मद युनूस सरकारवर कठोर प्रहार करीत आहेत. युनूस यांच्यावर आरोप करताना त्या म्हणतात - त्यांनी दहशतवाद्यांच्या मदतीने सत्ता काबीज केली आहे.

शेख हसीना व त्यांच्या पक्षाला बांगलादेशच्या राजकारणात कोणतीही भूमिका बजावता येणार नाही, अशी कायदेशीर कोंडी मुहम्मद युनूस यांच्या हंगामी सरकारने केली आहे. मात्र मुहम्मद युनूस यांना कुठे अपयश आले तर शेख हसीनांवरील कारवाई त्यांच्यावर बूमरँग ठरू शकते. बांगलादेश नॅशनल पार्टीच्या प्रमुख खलिदा झिया या डिसेंबरपर्यंत देशात निवडणुका घ्या म्हणून आग्रही आहेत.

लष्करप्रमुख जनरल वकार उझ जमान यांनी म्हटले आहे की, केवळ निवडून आलेल्या सरकारमुळेच बांगलादेशात राजकीय स्थिरता येऊ शकते, अनिर्वाचित प्रशासनामुळे नाही. देशात राजकीय पक्षांशी सहमती होत नसल्याने मुहम्मद युनूस राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या.

शेख हसीना यांचे राजकीय भविष्य संपविणे व त्यांना कायमचे जेलमध्ये डांबणे हाच युनूस यांचा अजेंडा दिसतोय. बांगलादेशातील अस्थिर वातावरणात शेख हसीना भारतातच सुरक्षित आहेत.

■ ■ ■

# मद्याची दुकाने, बिअर बार यांवरील देवतांची नावे केव्हा बदलणार?

४ जून २०१९ या दिवशी महाराष्ट्र सरकारने मद्याची दुकाने, बियर बार आणि परमिट रूम्स यांना देण्यात आलेली देवीदेवता, राष्ट्रपुरुष, संत, गड-किल्ले यांची नावे बदलण्यात यावी असा शासन आदेश काढला.

या आदेशाला आज ६ वर्षे उलटली तरी राज्यातील अनेक बिअर बार आणि मद्याच्या दुकानांवरील श्रद्धास्थानांची नावे अद्याप पालटली गेली नसल्याचे दिसून येत आहे. शासनाच्या या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याऐवजी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर आदेशच मागे घेण्यासाठी शिफारस केल्याचा धक्कादायक प्रकार गतवर्षी एका माहितीच्या माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या माहितीद्वारेउघड झाला होता.

भाविक, राष्ट्रप्रेमी आणि शिवप्रेमी यांच्या श्रद्धेचा सन्मान राखण्याऐवजी बार मालकांची वकीली करणाऱ्या उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र शासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणीही हिंदुत्ववादी आणि राष्ट्रप्रेमी संघटनांनी त्यावेळी केली होती.

या गोष्टीला आता वर्ष उलटले तरीही परिस्थिती जैसे थे आहे. दुकाने आणि बार यांची नावे बदलण्यासाठी अनेक शासकीय विभागांकडे पत्रव्यवहार करावा लागतो. कमी कालावधीमध्ये हे करणे शक्य नाही. त्यामुळे हा आदेशच रद्द करण्यात यावा आणि नवीन नावे देतांना श्रद्धास्थानांची नावे न देण्याची सुधारणा विभागाने सुचवली आहे. मुळातच हा आदेश निघून आज सहा वर्षे उलटली असताना राज्य उत्पादन शुल्काला आणखी किती वेळ हवा आहे?

नियमाची अंमलबजावणी करणे हे अधिकाऱ्यांना बंधनकारक आहे. त्यामुळे उत्पादन शुल्क विभागाने शासनाजवळ बार मालकांची वकिली न करता शासनाच्या आदेशानुसार कठोर कार्यवाही करणे अपेक्षित असताना तसे काही घडताना दिसत नाही. वरील आदेश निघाल्यानंतर प्रशासनाकडून तत्परतेने कारवाईला सुरुवातही करण्यात आली होती.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

या आदेशाचे पालन करताना राष्ट्रपुरुष म्हणून कोणती नावे ग्राह्य धरण्यात यावीत यासंबंधी विद्यमान पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्या नावासह ५६ नावांची जंत्री सोबत जोडण्यात आली होती, त्याचसोबत १०५ गड आणि दुर्गांची सूचीही देण्यात आली होती त्यामुळे कार्यवाही करण्याबाबत अधिकाऱ्यांमध्येसुद्धा स्पष्टता आली होती; मात्र देवता म्हणून कोणती नावे ग्राह्य धरावीत याबाबत कोणतीच सुस्पष्टता नसल्याने मद्याची दुकाने, परमिट रूम्स आणि बिअर बार यांना आजही देवतांची नावे दिलेली अनेक ठिकाणी दिसून येतात.

देवतांच्या नावाची सूची आदेशात देण्यात आली नसल्याने कारवाईसाठी गेलेल्या अधिकाऱ्यांना संबंधित आस्थापनांचे मालक दिलेली नावे ही त्यांच्या नातेवाईकांपैकी कुणाची तरी असल्याचे सांगतात. देवतांच्या नावांबाबत स्पष्टता नसल्याने अधिकाऱ्यांमध्येही संभ्रम निर्माण होतो. परिणामी कारवाई करण्यावर बंधने येतात. अशी कारणे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आली होती.

धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाव अथवा चित्र असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि शक्ती कार्यरत असते. त्यामुळे मद्याची दुकाने, परमिट रूम्स आणि बिअर बार्स यांसारख्या आस्थापनांना त्यांची नावे दिल्याने देवतांचा अवमान होतो. हा अवमान थांबवण्यात यावा यासाठी धार्मिक असेच हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी अनेक वर्षे आंदोलने केल्यामुळेच सरकारला आदेश काढून यांवर कारवाई करणे भाग पडले होते; मात्र ही कारवाई तोंडदेखली होती आणि शासनाला या बाबीशी काही देणेघेणे नव्हते हे आज ६ वर्षानंतर लक्षात येत आहे.

आजमितीला राज्यात सत्तेत असणाऱ्या ३ पक्षांपैकी दोन प्रमुख पक्ष हिंदुत्वनिष्ठ विचारांचे आहेत. त्यांनी याप्रकरणी तत्परतेने लक्ष घालून देवतांची नावे संकलित करून ती सुधारित आदेशात जोडावीत आणि देवतांचा होणारा अवमान थांबवावा!

■ ■ ■

# समाजाला घडवत असताना कवितेच्या दुनियेत रमणारी आदर्श शिक्षिका

सौ अनुपमा जाधव यांचा २७ जून हा वाढदिवस. त्यानिमित्त दोन शब्द लिहिण्याचे भाग्य मला प्राप्त झाले. डहाणू येथील उपक्रमशील आदर्श शिक्षिका कथाकार बालकवयित्री समाजसेविका, सामाजिक कार्यकर्त्या, पर्यावरण प्रेमी.

आपली नोकरी सांभाळून, घर संसार सांभाळून साहित्याच्या दुनियेत रमल्या आहेत. सौ. जाधव यांची लोकक्रांती सेना प्रणालीत लोक क्रांती शिक्षक सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश संपर्कपदी त्यांची निवड झालेली आहे तसेच त्यांची चार पुस्तकं प्रकाशित झालेली आहे.

१. समुद्रसंगीत काव्यसंग्रह
२. वहिवाट कवितासंग्रह.
३. अनुबंध कथासंग्रह.
४. रानझरा हा मराठी व अहिराणी बोलीभाषेतील कविता संग्रह प्रकाशित झालेला आहे.



तसेच मुंबई, पुणे, नाशिक केंद्रावर त्यांचे कविता वाचन व मुलाखती प्रसारित झालेल्या आहेत. डहाणू नगरपालिकेसाठी स्वच्छ भारत अभियान प्रबोधन गीतांची त्यांची निर्मिती केली असून त्यांची गाणी नगरपालिकेच्या घंटागाडीवर वाजवली जातात.

ईश्वर पाटील
आकाशवाणी खमण, सुरत.
९९९८५२५०७२

सौ. अनुपमा जाधव या विद्यार्थी प्रेमी शिक्षिका असून त्यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. राष्ट्रीय हरितसेनेचे त्या कार्य करत आहे. उपक्रम राबवीत असताना शालेय विद्यार्थ्यांसाठी कविता फुलते.. कथाकथन कसे करावे, टाकाऊ वस्तुपासून टिकाऊ वस्तू कशी तयार करावी. एक विद्यार्थी एक झाड, राष्ट्रभाषा हिंदी परीक्षांचे आयोजन, गरजू विद्यार्थ्यांना शालेय ग्रंथालय वस्तू प्राप्त करुन देणे, अशा विविध कार्यक्रमातून त्या सतत झिजत असतात, कार्य करत असतात. त्या शिक्षिका मुलांची केवळ बाई नाही तर चिमुकल्यांची आई होऊन मायेची पाखरन करत असतात आणि त्या मायेच्या प्रेमाने त्या मुलं घडवत असतात.

मुलांशी असलेलं जीवाभावाचं हृदयाचं नात त्या शिक्षिकेचं वेगळं पण आधारित करत असतं. मुलांसाठी कविता गाणी गोष्टींचा भरपूर साठा आहे खाऊ आहे शिवाय कथाकथनाचे त्यांच्याकडे उपजत अंग आहे.

आकाशवाणी विविध शैक्षणिक सामाजिक साहित्यिक संस्थांमधून त्यांचे कथाकथन कार्यक्रम वाचन नियमित होत असतात. विविध उपक्रम राबवण्याऱ्या या शिक्षिका कथा निवेदक अहिराणी आणि राष्ट्रभाषा हिंदी राष्ट्रभाषेच्या प्रचारक, प्रसारक आहेत.

त्यांच्या या अनुबंधनात ऋण बंधनाचे एक आगळे वेगळे नाते असून समाजाच्या प्रति असलेली त्यांची बांधिलकी मुलांना घडवण्याचे व्रत समाजासाठी जाणीव जागृत करत असते. त्यांच्या लेखणीतून विविध कंगोरे छटा त्यांच्या साहित्यात दिसून येतात, जाणवत आहे. जीवन फुलवण्यासाठी त्यांची धडपड विलक्षण अशी आहे.

धरी लाभ चित्ती वसा सदगुणांचा अशा विचारांवर रूढ श्रद्धा ठेवण्याचा त्यांचा स्वभाव गुण त्यांच्या अनेक कवितेचा आत्मा होऊन जातो. त्यांच्या संघर्षात पूर्वतेची ओढ आहे असे सहजगत्या वाचकांना सांगून जाते. त्यांची लढण्याची वृत्ती भावनेतून रचता येते.

सद्गुण सुलभता वास्तविकता शिकवण अवघड होऊन जातं मोठे होण्याची उर्मी आपलं वेगळं पण लोकांच्या मनावर घर करुन संवेदनशील कविता जन्माला येतात.

स्वतःचं दुःख हरवून अस्वस्थता त्यांना स्वस्त बसू देत नाही कवीची चळवळ हाच त्यांचा ध्यास आहे आणि यशस्वी माणूस तोच असतो जो स्वतःच्या यशात जो दुसऱ्याला उभा करतो आणि मार्गदर्शक होतो. अशा या हळव्या हिरव्यागार मनाच्या कवयित्री डहाणू येथील निसर्गाच्या सानिध्यात राहतात, समुद्र उशाशी घेऊन मुंबईची गर्दी पाहतात. आणि त्यांचं शब्दांचे पीक जोरात उगवू लागतं. उद्याच्या सूर्यनारायणाची किरण त्यांच्या अंगणात पडतील.

*पक्षांचे थव्यांचे मधुर गायन त्यांच्या*
*कानी नेहमी ऐकायला मिळो...*
*अंधकारातून उजेडाकडे घेऊन*
*जाणारी पायवाट अधिक बळकट*
*होओ...*
*त्यांच्या लेखणीला अजून बळ येवो*
*आणि असंच सातत्य त्यांच्यात कायम*
*राहो ......*
*फळांचा फुलांचा सुगंध घेऊन येणारी*
*हवेची पहिली लाट त्यांच्या अंगणात*
*दुर्मळो.....*
*त्यांना आरोग्यमय करुन जाओ आणि*
*दीघार्युष्य लाभो ही त्यांच्या*
*वाढदिवसानिमित्त लाख लाख*
*शुभेच्छा.....*

# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी व्ही नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज १०४ वि जयंती.

आजच्याच दिवशी म्हणजे २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला.

१९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली.

१९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली.



१९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सवार्नुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते.

त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले.

यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे.

नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली.

देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निधार्राचे दर्शन घडवले.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन! ■ ■ ■

# हिंदी सक्तीचा विरोध आणि एकत्र मोर्चा

महाराष्ट्रातील शाळांमध्ये हिंदी सक्ती विरोधामध्ये राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी वेगवेगळे आंदोलन करण्याची घोषणा केली होती. मात्र आता महाराष्ट्रातील शाळांत हिंदी सक्ती विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी घोषणा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले आहे. त्यांच्या या पोस्टमुळे आता राज्यातील नव्या राजकीय समीकरणाची चर्चा सुरू झाली आहे.

महाराष्ट्रातील शाळांमध्ये हिंदी सक्ती विरोधामध्ये सर्वच विरोधी पक्ष एकत्र येणार असल्याचे संकेत मिळत होते. तेच आता स्पष्ट झाले आहे. काल राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी मोर्चा काढणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर लगेच उद्धव ठाकरे यांनी सात जुलै रोजी आझाद मैदानावर आंदोलन करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासूनच सर्व एकत्र का येत नाही? असे प्रश्न विचारले जात होते.

यावर आता अखेर तोडगा निघाला असून हिंदी सक्ती विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी पोस्ट संजय राऊत यांनी केली आहे. यासोबतच संजय राऊत यांनी राज आणि उद्धव ठाकरे यांचा एकत्रित फोटो देखील पोस्ट केला आहे.

राज्य सरकारच्या वतीने त्रिभाषा सूत्र स्वीकारण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा शिकवली जाणार आहे. राज्य सरकारच्या निर्णयाच्या विरोधामध्ये ठाकरे बंधू एकत्र आले आहेत.

या आधी राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी तर उद्धव ठाकरे यांनी ७ जुलै रोजी मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली होती. दोन्ही ठाकरे बंधू जर मोर्चा काढणार असतील तर एकत्र का नाही? असा प्रश्न त्यामुळे राज्यात विचारला जात होता. त्यातच आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठी घोषणा केली आहे.

महाराष्ट्रातील शाळात हिंदी विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी पोस्ट त्यांनी केली आहे. त्यामुळे हिंदी सक्ती विरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार हे निश्चित झाले आहेत.



ठाकरे बंधू एकत्र आल्यास काही सत्ताधारी पक्षांना मोठा फटका बसू शकतो. बघुया, काय होते ते?

■ ■ ■

# केवळ दुध दहीमध्येच नव्हे तर शाकाहारी पदार्थांमध्येही आहे भरपूर कॅल्शियम




कॅल्शियम हे आपल्या शरीरासाठी एक आवश्यक खनिज आहे, जे आपल्या शरीरातील हाडे व दात मजबूत ठेवण्यास मदत करतात. तसेच मज्जासंस्थेसाठी, स्नायूंच्या आकुंचनासाठी आणि हृदयाच्या आरोग्यासाठी देखील महत्त्वाचे आहे. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडे कमकुवत होऊ शकतात. कॅल्शियम फक्त दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधून मिळते असे नव्हे तर अनेक शाकाहारी पदार्थ आहेत जे कॅल्शियमने समृद्ध आहेत.

**तीळ :** तीळ कॅल्शियमचा एक उत्तम स्त्रोत आहे. १०० ग्रॅम पांढऱ्या तिळामध्ये सुमारे ९७५ मिलीग्राम कॅल्शियम असते. आहारात तीळाचा समावेश करा जेणेकरून हाडे मजबूत होतीलच, शिवाय त्वचा आणि हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल.

**हिरव्या पालेभाज्या :** पालक, मेथी यासारख्या हिरव्या भाज्या कॅल्शियमचे चांगले स्त्रोत आहेत. १०० ग्रॅम पालकामध्ये सुमारे ९९ मिलीग्राम कॅल्शियम असते. त्यामुळे तुमच्या आहारात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करा.

**बदाम :** बदाम केवळ प्रथिने आणि व्हिटॅमिन ई ने समृद्ध नाही तर ते कॅल्शियमचा एक चांगला स्त्रोत देखील आहे. १०० ग्रॅम बदामात सुमारे २६० मिलीग्राम कॅल्शियम असते. त्यामुळे नाष्ट्यामध्ये किंवा दिवसभरात केव्हाही बदामाचे सेवन करा.

**अंजीर :** सुक्या अंजीरमध्ये कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते. २ सुक्या अंजीरमध्ये सुमारे ६५ मिलीग्राम कॅल्शियम आढळते. हे पचन सुधारण्यास तसेच हाडे मजबूत करण्यास मदत करते.

**सोया उत्पादने :** टोफू, सोया मिल्क आणि सोया चंक हे कॅल्शियमचे चांगले स्त्रोत आहेत. १०० ग्रॅम टोफूमध्ये सुमारे ३५० मिलीग्राम कॅल्शियम असते. याच्या नियमित सेवनाने हाडे मजबूत होतात.

**चिया बियाणे :** १०० ग्रॅम चिया बियांमध्ये ६३१ मिलीग्राम कॅल्शियम असते. त्यात ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि फायबर देखील भरपूर असते जे हाडांसाठी तसेच हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तुम्ही हे चिया बियाणे स्मूदी किंवा दह्यात मिक्स करून खाऊ शकता.

**राजमा आणि चणे :** राजमा, चणे आणि काळे वाटाणे यासारख्या कडधान्यांमध्ये आणि बीन्समध्ये कॅल्शियमचे प्रमाण चांगले असते. १०० ग्रॅम राजमामध्ये १०० मिलीग्राम कॅल्शियम असते आणि त्याहून अधिक म्हणजे १०० ग्रॅम हरभरामध्ये १०५ मिलीग्राम कॅल्शियम असते.

**दूध आणि दुग्धजन्य पदार्थ :** दूध, दही आणि चीज हे कॅल्शियमचे उत्तम स्त्रोत आहेत. १ ग्लास दुधात ३०० मिलीग्राम कॅल्शियम असते. सर्व सदस्यांनी रोज दुधाचे सेवन केले पाहिजे, जेणे करून कॅल्शियमची कमतरता भासणार नाही. ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### गड आला पण..!

**ये रे ये रे पावसा म्हणून**
**केली पावसाची मनधरणी**
**विनवणीला तर पावला**
**म्हणून हर्ष जाहला मनी..**

**आला होता वाजत गाजत**
**पण .. जाता जाता**
**गेला ना नाचत**
**उभी पिके घेऊन सोबत..**

**नद्यांना आला महापूर**
**शेतात साचले पाणी**
**क्षणार्धात सारे हिरावले**
**म्हणून आसू आले नयनी ..**

# ती आणीबाणी नव्हती, तर सत्तेवर बसलेल्या काँग्रेसचा अन्यायकाल होता : अमित शाह

**नवी दिल्ली, २७ जून :** भारताच्या घटनात्मक इतिहासात २५ जून १९७५ ही केवळ एक तारीख नाही, तर तो एक काळा दिवस आहे जेव्हा सत्तेच्या हव्यासाने लोकशाहीची आत्मा चिरडून टाकण्यात आली. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की तो काळ केवळ 'आणीबाणी' नव्हता, तर सत्तेवर टिकून राहिलेल्या काँग्रेसची खुर्ची वाचवण्याची अखेरची धडपड होती तो 'अन्यायकाल' होता, जो देशाच्या सुरक्षेच्या नावाखाली देशावर लादण्यात आला होता.

या काळ्या अध्यायाने केवळ अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा दाबला नाही, तर न्यायपालिकेला बहिरे केले आणि प्रसारमाध्यमांची शाई आटवली. २१ महिने हा लोकशाहीविरोधी शांततेचा अंधार संपूर्ण देशावर पसरलेला होता, आणि भारताची जनता आपल्या देशातच कैदी बनली होती. जेव्हा भारत सरकारने या दिवसाला संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला, तेव्हा तो लोकशाहीच्या मूल्यांप्रती एक राष्ट्रीय नवचेतनेचा उद्घोष होता.

आणीबाणीच्या त्या अंधारमय काळात, जेव्हा संपूर्ण देश दडपशाही आणि भीतीच्या सावटाखाली होता, तेव्हा एक तरुण प्रचारक जो आज भारताचा पंतप्रधान आहे भूमिगत होऊन लोकशाहीचा दिवा पेटवत होता. कधी साधू तर कधी वृत्तपत्रविक्रेते अशा रूपात त्यांनी लोकजागृतीची मशाल पेटवली. आज तेच नेते १४० कोटी भारतीयांच्या विश्वास, आकांक्षा आणि आशांचा आधारस्तंभ आहेत. ही केवळ इतिहासाची विडंबना नाही, तर एक प्रतिशोध आहे अशा युगापासून जो मी सर्वोच्च या विचारसरणीने ग्रस्त होता, तेव्हा आता आपण अशा युगात प्रवेश करत आहोत जिथे राष्ट्र सर्वोपरि हा उद्घोष जनमानसाची जागृत चेतना बनलेला आहे.




पंतप्रधान मोदी जिथे जनभावनांचे प्रतीक आहेत, तिथे त्यांचे सर्वात विश्वासू रणनीतिक सहकारी, लोकशाहीचे दृढ सेनापती आणि आधुनिक भारताचे चाणक्य अमित शहा ते लोकशाहीचे सजग प्रहरी आहेत, जे लोकशाहीला केवळ एक व्यवस्था नाही, तर भारतीय जीवनशैलीचा अविभाज्य भाग मानतात.

संविधान हत्या दिवस या राष्ट्रीय कार्यक्रमात अमित शहा यांचे भाषण हे केवळ एक वक्तव्य नव्हते, तर लोकशाहीची पुनर्परिभाषा होती. त्यांनी आठवण करून दिली की २४ जून १९७५ ची रात्र ही भारताच्या इतिहासातील सर्वात अंधारी रात्र होती, ज्यात लोकशाहीचा सूर्य २१ महिन्यांसाठी मावळला. एका किचन कॅबिनेटच्या आदेशावर, संसद किंवा मंत्रीमंडळाच्या मान्यतेशिवाय, केवळ एका सहीने संविधानाला गप्प करण्यात आले. ज्याच्या निर्मितीस संविधान सभेला २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस लागले, त्या संविधानाला केवळ एका निर्णयाने अपंग करून टाकले गेले. १.१० लाखांहून अधिक राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकण्यात आले, १ कोटीहून अधिक नागरिकांची जबरदस्तीने नसबंदी करण्यात आली आणि २५३ पत्रकारांना अटक करण्यात आली. प्रेसवर सेन्सॉरशिप इतकी कडक होती की वृत्तपत्रांचे संपादकीय पानं रिकामी छापून यायला लागली.

हे लक्षात घेण्यासारखं आहे की खरोखर देशाला कोणताही धोका होता का? की फक्त सत्ता हातातून जात होती? आता इतिहासच याचं उत्तर देतो आहे. हा धोका देशाचा नव्हता, तर एका कुटुंबाच्या सत्तेचा होता. आज जे काही पक्ष वारंवार संविधानाच्या रक्षणाची हाक देतात, त्यांनीच १९७५ मध्ये संविधानाची हत्या केली होती. संसद, न्यायपालिका, प्रेस सगळ्यांना अधीन करण्याचा प्रयत्न केला गेला. आज जे पक्ष लोकशाहीच्या नावाने गोडवे गात आहेत, त्या सगळ्याच त्या काळात सत्तेशी एकत्र उभ्या होत्या आणि सत्तेचा लाभ घेणाऱ्यांमध्येही होत्या. आणि हाच तो टप्पा आहे जिथून काँग्रेसच्या राजकीय अधोगतीची सुरुवात झाली जी आज राजकीय अप्रासंगिकतेच्या उंबरठ्यावर उभी आहे.

आणीबाणी हा केवळ इतिहासाचा एक भाग नाही, तर तो एक इशारा आहे की लोकशाहीला सदैव जागृत पहारेकरी लागतात. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात भारताने गुलामीच्या मानसिकतेपासून मुक्तीचा जो निर्धार घेतला आहे, तो तेव्हाच पूर्ण होईल जेव्हा आपण भूतकाळाच्या चुकांना केवळ लक्षात ठेवणार नाही, तर त्यातून शिकणारही आहोत. आज भारत अशा युगात प्रवेश करत आहे जिथे मी नव्हे तर आपण ही भावना नेतृत्व करते. आणि हा बदल केवळ राजकीय नाही, तर सांस्कृतिक आणि राष्ट्रीय चेतनेचा जागर आहे ज्याचे नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा करत आहेत.




## अदानी फाउंडेशनने सुरबर्डी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले

**नागपूर, २७ जून :** अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या वाढदिवसानिमत्त साजरा करण्यात येणाऱ्या 'अदानी दिवसा'निमित्त, सुराबर्डी येथील इनक्लाइन साइटच्या व्हीटीसी रूममध्ये 'मेगा रक्तदान मोहीम २०२५' आयोजित करण्यात आली होती. या शिबिरात रक्त संकलन जीवन ज्योती रक्तपेढीने केले.

या उपक्रमात एकूण ३७ जणांनी रक्तदान केले, ज्यात अदानी ग्रुपचे २७, डीसीएस लिमिटेडचे ६ आणि इतर ४ कर्मचारी होते. या कार्यक्रमाचा उद्देश लोकांमध्ये रक्तदानाविषयी जागरूकता पसरवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत प्रभावित झालेल्यांना महत्त्वाची मदत पुरवणे आहे.

## लॉरिट्झ नूडसन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनने त्यांचा सर्वात महत्त्वाकांक्षी उत्पादन पोर्टफोलिओ लॉंच केला

**नवी दिल्ली, २७ जून :** देशातील प्रमुख औद्योगिक क्लस्टर्स आणि ग्रोथ कॉरिडॉरना पाठबळ देण्याच्या उद्देशाने भारतीय इलेक्ट्रिकल आणि ऑटोमेशन क्षेत्रातील आघाडीची कंपनी लॉरिट्झ नूडसन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनने आज त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या उत्पादन पोर्टफोलिओचे अनावरण केले. या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा एक भाग म्हणून, ब्रँड देशातील ३० औद्योगिक शहरांमध्ये फिरून भारतातील उत्पादन आणि पायाभूत सुविधा केंद्रांच्या मध्यभागी तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविण्यासाठी स्थानिक नेते, भागधारक आणि इकोसिस्टम भागीदारांशी संवाद साधत आहे.

कमी-व्होल्टेज, औद्योगिक ऑटोमेशन आणि नवीन ऊर्जा लँडस्केपसाठी आवश्यक उपायांवर लक्ष केंद्रित करून, लॉरिट्झ नूडसेन तंत्रज्ञानावर आधारित परिवर्तन घडवत आहे जे भारताच्या औद्योगिक केंद्रांपर्यंत पोहोचते. ही ऐतिहासिक मोहीम सरकारच्या विकसित भारत २०४७च्या दृष्टिकोनाशी सुसंगत असून, तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत, आर्थिकदृष्ट्या लवचिक आणि एनर्जी-स्मार्ट भारत निर्माण करण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

ग्राहकांना सुरक्षित, जलद आणि स्मार्ट काम करण्यास सक्षम बनवणाऱ्या स्मार्ट तंत्रज्ञानाचा पुरवठा करणे हा आमचा उद्देश आहे. या पोर्टफोलिओद्वारे, आम्ही नव्याने सुरू केलेले उपक्रम हा भारतातील प्रत्येकासाठी सुलभ आणि त्यांच्याशी जोडलेले असले पाहिजेत, याची काळजी घेतो. रायपूरमधील भात गिरणीचे स्वयंचलितकरण असो, कोइम्बतूरमधील कापड गिरणीला वीजपुरवठा असो किंवा पुण्यातील प्लांटचे आधुनिकीकरण असो, आमचा पोर्टफोलिओ प्रभावासाठी डिझाइन केलेला आहे, असे लॉरिट्झ नूडसेन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनचे सीओओ नरेश कुमार म्हणाले.

२०२९ पर्यंत भारतातील विद्युत उपकरण क्षेत्र ९५ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त वाढेल आणि २०३३पर्यंत औद्योगिक ऑटोमेशन ३९.६५ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल अशी अपेक्षा आहे. १. भारतीय उत्पादक आधीच त्यांच्या ऑपरेटिंग बजेटपैकी ३५% टेक्नॉलॉजी मॉडर्नायझेशनमध्ये गुंतवत आहेत - हे जागतिक सरासरीपेक्षा जास्त आहे. हे बदल केवळ संख्यात्मक नाहीत; तर ते अधिक स्मार्ट, अधिक कार्यक्षम प्रणालींसाठी देशव्यापी मोहिमेचे प्रतिबिंब आहेत. २०४७च्या विकसित भारत दृष्टिकोनाशी जुळवून घेत, आम्ही केवळ उत्पादने लॉंच करत नाही - तर स्मार्ट, स्वच्छ आणि भविष्यासाठी भारताला संक्रमण सक्षम करत आहोत, असे ते पुढे म्हणाले.

## जयपूर ते नागपूर, सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोने देशभरात समस्या-निवारक घडवण्याला चालना दिली

**गुरूग्राम, २७ जून :** जयपूरमधील पुरेसा प्रकाश असलेल्या क्लासरूम्सपासून नागपूरमधील गजबजलेल्या व्याख्यानगृहांपर्यंत कॅम्पसेसमध्ये प्रश्न विचारण्यात आला: 'तुम्ही भारतासाठी कोणत्या समस्येचे निराकरण कराल?'.

हा प्रश्न राष्ट्रीय इनोव्हेशन चॅलेंज 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो'चा मुख्य पैलू आहे. हे चॅलेंज उज्ज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांना चेंजमकर्समध्ये आणि कॅम्पसेसना लॉंचपॅड्समध्ये बदलत आहे.

२९ एप्रिल रोजी लॉंचनंतर डिझाइन थिंकिंग वर्कशॉप्स आणि कॉलेज ओपन हाऊसेस संपूर्ण भारतात पसरले प्रमुख महानगरांसह ईशान्येकडील प्रमुख स्थळांपर्यंत देखील पोहोचले.

सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५ अव्वल चार विजेत्या टीम्सना त्यांच्या प्रकल्पांच्या इन्क्यूबेशनला पाठिंबा देण्यासाठी १ कोटी रुपये देईल, तसेच प्रत्यक्ष प्रोटोटाइपिंग, गुंतवणूकदारांशी संपर्क आणि सॅमसंग प्रमुख व आयआयटी दिल्ली प्राध्यापकांकडून तज्ञ मार्गदर्शन प्रदान करेल.

जयपूरमधील नीरजा मोदी स्कूलमध्ये १,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सभागृहात त्यांच्या संकल्पना, महत्त्वाकांक्षा आणि स्वप्नांना सादर केले. त्यांच्यापैकी नमन लखानीने पाठ्यपुस्तकांपलीकडील त्याच्या विचारसरणीला व्यक्त केले.

''माझी नेहमी असे काहीतरी घडवण्याची इच्छा होती, ज्यामुळे वास्तविक विश्वातील समस्यांचे निराकरण करता येईल. सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोने मला दाखवून दिले की, कोणीतरी खरेच आमचे ऐकत आहे आणि संकल्पनांना वास्तविकतेत आणण्यास मदत करत आहे.''




आणखी एक विद्यार्थीनी अंशिका गुप्ता म्हणाली, ''मला उत्साहपूर्ण वाटले. हा उपक्रम इनोव्हेशनसह सर्वसमावेशकतेबाबत आहे. यामुळे मला शाळेमध्ये असताना देखील भारताचे उज्ज्वल भविष्य घडवण्याचा भाग असल्यासारखे वाटले.''

हा प्रवास जयपूरमधील महाराजा सवाई भवानी सिंग स्कूलमध्ये देखील सुरू राहिला, जेथे उपस्थित ८५० विद्यार्थ्यांपैकी एक ईशान शर्माचा दृष्टिकोन बदलला.

''मला समस्यांचे निराकरण करण्यासाठी पदवीधर किंवा प्रौढ व्यक्ती बनण्याची वाट पाहण्याची गरज नाही हे जाणवले. आपल्याकडे उत्तम संकल्पना असतील तर सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो त्या संकल्पना जाणून घेते. हे अत्यंत सक्षम करणारे आहे.''

नागपूरमध्ये रामदेवबाबा युनिव्हर्सिटीमधील उत्साहपूर्ण समुदायाने खुल्या मनाने व स्वत:चे मत व्यक्त करत या मोहिमेचे स्वागत केले. ६४० सहभागींपैकी मान्याने सार्वजनिक आरोग्यासाठी एआय-संचालित सोल्यूशन्स निर्माण करण्याचे तिचे स्वप्न व्यक्त केले.

''असे पहिल्यांदा घडले आहे की, प्लॅटफॉर्म आमच्या शहरातील आमच्या कॅम्पसमध्ये आमच्याकडे आला आहे आणि म्हणाला, 'चला काहीतरी महत्त्वपूर्ण असे घडवूया'. ही फक्त स्पर्धा नाही, हे एक लॉंचपॅड आहे.''

''क्रिएटर्सचा राष्ट्रीय स्तरावरील वर्ग असल्यासारखे वाटले,'' असे चॅटिंगमध्ये एका विद्यार्थ्यांनी शेअर केले. ''आम्ही एकमेकांपासून अनेक मैल अंतर दूर होतो, पण आमच्या संकल्पना एकमेकांशी जुडल्या.''

भोपाळमध्ये ओरिएण्टल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (ओआयएसटी)ने स्थानिक समस्या सोडवण्यासाठी विद्यार्थी तंत्रज्ञानाचा वापर कसा करू शकतात या विषयावर चर्चा सुरू केली. २९० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसह या इव्हेण्टमध्ये शांतमय, निश्चयी ऊर्जा दिसण्यात आली.

सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो भारतभरात विस्तारित होण्यासह एक पैलू स्पष्ट करत आहे: इनोव्हेशन फक्त प्रयोगशाळा किंवा मोठ्या शहरांपर्यंत मर्यादित नाही, तर प्रश्न विचारण्याचे आणि त्याचे निराकरण करण्याचे साहस असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे आहे.

तुम्ही विद्यार्थी असण्यासोबत तुमच्याकडे वास्तविक समस्येचे निराकरण करू शकणारी संकल्पना असेल तर हा उपक्रम तुमच्यासाठी आहे. सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोसाठी आत्ताच अर्ज करा. तुमचा क्लासरूम या प्रवासामधील पुढील थांबा असेल. आणि तुमची संकल्पना? हे सर्वकाही बदलू शकते.

## नागपूरमध्ये जेएसडब्ल्यू स्टीलने यशस्वीपणे बनावटी विरोधी छापा

**नागपूर, २७ जून :** ब्रँड ओळख आणि ग्राहकांच्या सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, जेएसडब्ल्यू स्टीलने २५ जून २०२५ रोजी यशस्वीरित्या छापा टाकला. रुद्र एंटरप्रायझेस नागपूर येथे स्थानिक कायदा अंमलबजावणीच्या सहकार्याने टाकलेल्या छाप्यात बनावट जेएसडब्ल्यू कलर कोटेड शीट्स जप्त करण्यात आल्या

छापानंतर, कायदेशीर कारवाई जलदगतीने सुरू करण्यात आली. कॉपीराइट कायद्याच्या कलम ५१ आणि ६३ अंतर्गत उल्लंघनांसह आरोपांसह एफआयआर दाखल करण्यात आला. हे कायदेशीर पाऊल गुन्ह्यांची गांभीर्य आणि बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जेएसडब्ल्यू स्टीलची वचनबद्धता अधोरेखित करते.

या कारवाईचे यश मुख्यत्वे जेएसडब्ल्यू स्टील आणि स्थानिक कायदा अंमलबजावणी मधील निर्बाध सहकार्यामुळे झाले. ही भागीदारी बनावटी उत्पादनांचा सामना करण्यासाठी कॉर्पोरेट संस्था आणि कायदा अंमलबजावणीमधील प्रभावी समन्वय दर्शवते.

सुरुवातीच्या तपासात असे आढळून आले की काही व्यक्ती जेएसडब्ल्यू स्टीलच्या खऱ्या उत्पादनांसारखेच बनावट ब्रँडिंग असलेल्या बनावट कोटेड शीट्सचे बेकायदेशीर उत्पादन, विक्री

**५९,१२७ रुपये किमतीची बनावटी उत्पादने जप्त केली**




आणि प्रोफाइलिंगमध्ये सहभागी होत्या. या बनावट वस्तू मूळ जेएसडब्ल्यू स्टील उत्पादनांसारखे विकल्या जात होत्या.

जेएसडब्ल्यू स्टील त्यांच्या ट्रेडमार्क, लोगो आणि इतर बौद्धिक मालमत्तेच्या अनधिकृत वापराचा तीव्र निषेध करते. त्यांच्या ब्रँड प्रतिष्ठेचे आणि सद्भावनाचे रक्षण करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये, जेएसडब्ल्यू स्टील बनावटी आणि कंपनीच्या बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही घटकांवर कठोरपणे लक्ष ठेवते आणि कारवाई करते.

जेएसडब्ल्यू स्टीलची उत्पादने आणि उपायांनी गेल्या काही वर्षांत एक मजबूत प्रतिष्ठा निर्माण केली आहे, त्यांच्या उत्कृष्ट गुणवत्तेसाठी आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोनासाठी विश्वास ठेवला आहे. कंपनी सर्वोच्च मानके राखण्यासाठी वचनबद्ध आहे आणि तिच्या ब्रँड आणि मालमत्तेला धोका निर्माण करणाऱ्या बेकायदेशीर क्रियाकलापांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि कारवाई करण्यासाठी तिचे प्रयत्न सुरू ठेवेल. पुढे जाऊन, जेएसडब्ल्यू स्टील बनावट उत्पादनांविरुद्ध तिची सतर्क भूमिका कायम ठेवण्याची योजना आखत आहे. कंपनी तिच्या बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि ग्राहकांना तिच्या उत्पादनांच्या प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेवर विश्वास ठेवता येईल याची खात्री करण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांसोबत जवळून काम करत राहील.

## कलाकारांनी सांगितले त्यांच्या वैश्विक श्रद्धेबाबत!

**मुंबई, २७ जून :** सकाळी चहाचा आस्वाद घेत राशीभविष्य वाचण्यापासून ते अंकांमधून मार्गदर्शन मिळवण्यापर्यंत ज्योतिष आणि अंकशास्त्र उत्सुकता आणि आनंद निर्माण करतात. काहींसाठी या जुन्या पद्धती आध्यात्मिक संकेत आहेत, तर काहींसाठी त्या दैनंदिन जीवनात उत्तम अनुभव देणाऱ्या आहेत. या वैश्विक संकेतांच्या माध्यमातून खास काहीतरी शोधणाऱ्यांमध्ये एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार देखील आहेत, जसे हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'). त्यांनी ज्योतिष आणि अंकशास्त्र त्यांची विचारसरणी, दिनचर्या व दृष्टिकोनाला कसे आकार देतात, याबद्दल सांगितले. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये कटोरी अम्माची भूमिका साकारणाऱ्या हिमानी शिवपुरी आनंद व्यक्त करत म्हणाल्या, ''माझा ज्योतिषशास्त्रावर फारसा विश्वास नाही, पण ते वर्षानुवर्षे माझ्या आयुष्याचा एक भाग आहे. दररोज सकाळी बाहेर पडण्यापूर्वी मी वर्तमानपत्रातील दिवसाचे राशीभविष्य पाहते. भविष्य जाणून घेण्यासाठी नाही तर दिवसाची सुरुवात सकारात्मकतेने करण्यासाठी करते. काही चांगल्या ओळी तुमचा मूड चांगला करू शकतात. मजेदार गोष्ट म्हणजे, दिवसाच्या शेवटी मी अनेकदा त्यात काय म्हटले आहे ते विसरून जाते, पण आशावाद कायम राहतो.'' त्या पुढे म्हणाल्या, ''मंदिरांना भेट देताना किंवा मित्रांसोबत प्रवास करताना बहुतेकदा असाच किंवा एखाद्याच्या आग्रहास्तव मी काही वेळा माझा तळहात वाचायला दिला आहे आणि प्रत्येक ज्योतिषाने काहीतरी वेगळे म्हटले, पण ते सर्व सकारात्मक होते. त्यावेळी मला जाणवले की ज्योतिषशास्त्र मनोरंजक आहे, पण जीवनासाठी मार्गदर्शक नाही. मी कर्मावर आणि माझ्या मानसिकतेवर अधिक अवलंबून आहे. तुम्ही तुमचे काम प्रामाणिकपणे केले आणि दयाळू व सकारात्मक राहिले तर मार्ग नक्की सापडतो असा माझा विश्वास आहे. कदाचित राशीभविष्य नेहमीच अचूक नसते, पण तोच तुमचा दृष्टिकोन आहे का? हे जाणून घेणे महत्वाचे आहे.''

रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले, ''माझ्यासाठी अंकशास्त्र नेहमी लक्षवेधक रहिले आहे. फक्त भाग्यवान अंक शोधणे नाही तर निर्णय व घटनांमागील ऊर्जा समजून घेणे महत्त्वाचे आहे. जीवनात कोणतेही मोठे पाऊल उचलण्यापूर्वी मी अंकशास्त्राचा सल्ला घेतो. यामुळे मला आधार मिळाल्यासारखे वाटते आणि स्पष्टता मिळते. लोक अनेकदा ते अंधश्रद्धा समजून त्याकडे दुर्लक्ष करतात, पण माझ्यासाठी ते उपयुक्त आहे. या अंकांमध्ये लय असते आणि त्यांचे वाचन करायला शिकल्यानंतर मार्गदर्शकासारखे वाटते. गोंधळलेल्या किंवा आव्हानात्मक काळामध्ये मला समजले आहे की, अंकशास्त्रामधून कम्फर्ट व मार्गदर्शन मिळते. हे आधारस्तंभ नाही तर साधन आहे. आणि तुम्हाला संतुलित व आत्मविश्वासू राहण्यास मदत करणाऱ्या गोष्टीचा अवलंब का करू नये? जीवन अनपेक्षित आहे आणि कधी-कधी, थोडेसे मार्गदर्शन देखील खूप उपयुक्त ठरते.''

## आज का अंदाज

शनिवार २८ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | १ | ५ | ७ | ८ |
| ३४५ | १२० | १७८ | १३५ | १३७ | २३० | १६० | २२४ |
| ४८० | ३०० | ३५८ | ३६० | ४७० | ३५७ | २२३ | ४६८ |
| ५७० | २२९ | २२७ | ५६८ | ३४४ | ७८० | ७०० | ३५० |
| २१ | ३१ | ६४ | ९४ | १० | ५२ | ७३ | ८५ |
| २० | ३० | ६८ | ९८ | १३ | ५४ | ७८ | ८७ |
| २७ | ३७ | ६५ | ९५ | १६ | ५६ | ७९ | ८९ |

**२८ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | ४२ | ७० | ८० |
| १२ | ४३ | ७५ | ८५ |
| १६ | ४६ | ७९ | ८९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**

## सॅमसंग न्यूयॉर्कमध्ये ९ जुलै रोजी नवीन फोल्डेबल्स लॉंच करणार


**गुरूग्राम, २७ जून :** वर्षानुवर्षे सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने लोकांना गरजेची वैशिष्ट्ये जसे सर्वोत्तम कार्यक्षमता, आकर्षक कॅमेरे आणि कनेक्टेड राहण्याच्या स्मार्टर पद्धती यांना अनुसरून डिवाईसेस डिझाइन केले आहेत. आणि गॅलॅक्सी एआयसह डिवाईसेसच्या क्षमतांमध्ये अधिक वाढ केली आहे. तसेच व्यक्तींच्या संवाद साधण्याच्या पद्धतीमध्ये देखील बदल केला आहे.

एआय नवीन युजर इंटरफेस बनत असताना तंत्रज्ञानासोबत आपल्या संबंधाला नव्या उंचीवर घेऊन जात आहे. ॲप्स व टूल्सचे कलेक्शन असलेला स्मार्टफोन आता स्मार्ट सोबती बनत आहे, जो वापरकर्त्यांच्या उद्देशाला समजून घेतो आणि रिअल टाइममध्ये प्रतिसाद देतो. हे परिवर्तन प्रतिक्रियेवरून अपेक्षेपर्यंत झाले आहे, जेथे एआय यूआय बनले आहे आणि टास्क्स त्वरित पूर्ण होतात.

नेक्स्ट-जनरेशन गॅलॅक्सी डिवाईसेस नवीन एआय-पॉवर्ड इंटरफेससह बदलण्यात आले आहेत, ज्यांना त्यांच्या संपूर्ण क्षमता अनलॉक करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या सर्वोत्तम हार्डवेअरचे पाठबळ आहे. हे भविष्य आधीच घडण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि सर्वोत्तम गॅलॅक्सी एआय व सॅमसंग कारागिरीचा उलगडा होणार आहे.

९ जुलै रोजी सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स त्यांचे आगामी फोल्डेबल्स लॉंच करण्यासाठी ब्रूकलिन, न्यूयॉर्क येथे गॅलॅक्सी अनपॅकचे आयोजन करणार आहे.

## शब्दकोडे क्रमांक २१४८



**आडवे शब्द :-**


१) सतत, खंड न पडता
४) चाकर
६) बाण
८) सावकार
१०) त्वरित, लवकर
११) घागरा
१४) तरुण(हिं.)
१६) न स्वीकारणे
१७) मदत करणारा
१९) बंधन
२०) वेगळा
२१) अनेक प्रकार
२३) होडी चालविणारा
२६) सेवक
२७) गळ्याच्या मागचा अवयव, प्रतिष्ठा
२८) नूतन
२९) राजविंडा, सुकुमार
३१) माया, ममत्व
३४) सिंह
३५) लोखंडाला चढलेला गंज
३६) अंधारात शोधणे,
३८) ** सदाशिव, भोळा
३९) हिंदीत सर्व
४०) मिठाई तयार करणारा
४२) रक्तवाहिनी
४४) डावरा
४६) स्वर्गंगा एका हिंदी नटीचे नाव
४८) शेकडा प्रमाण
४९) साय
५०) चंद्र
५२) नवेच्या विरुद्ध
५३) वर्ष, साल
५४) घोडा
५५) श्रेष्ठ पुरुष
५७) कडक
५९) अजगर, एक इंग्रजी आद्याक्षर
६१) मातीचा कण
६२) धनुष्याच्या ताणलेल्या दोरीचा आवाज
६३) दुर्दशा
६५) पाणी
६६) साडेसातीचा ग्रह
६७) जाणकार
६९) केस
७०) छोटा
७१) मयूर
७२) निमग्न
७३) फणीने केस मोकळे करण्याची क्रिया
७४) पाणी उकळताना होणारा आवाज

**उभे शब्द :-**

१) वकिलाचे कूळ
२) वाघोबा
३) तप करणारा
४) नोकराशी केलेला करार
५) हात
७) रात्र
८) द्रव्य, पैसा
९) आवळा देऊन घेण्याचे फळ
१२) कप्पा, खण
१३) मोठी नदी
१५) वाईट इच्छा
१६) जेऊ घालणारा
१७) पुष्परस
१८) तरतूद
१९) ध्वनी
२२) विनंती करणे
२४) वाईट, नासलेले
२५) यज्ञ
२८) अत्यंत नीच
३०) पाहुणचार
३२) मोठे घर, राजवाडा
३३) नृत्य
३५) लाल
३६) डोक्यावरचे केस ज्याने झडतात तो रोग
३७) पटल
३९) खोलवर, खोल
४०) उपस्थित
४१) वाचण्यास योग्य असे साहित्य
४२) मालक
४३) व्यवस्थित, यथायोग्य
४५) उलटी, वांती
४६) घुसळणे, चर्चा
४७) खेळण्याच्या पत्त्यातील एक काळे पान
५१ विष
५३) स्सरसकट
५६) रात्री फिरणारा, (चोर, घुबड इ.)
५८) टोळीचा प्रमुख
५९) नाविक दल
६०) गाईची एक जंगली जात
६३) प्रतिष्टा अब्रू
६४) नवरदेव
६६) काया, देह
६८) कल्याण
६९) ** देवयानी
७१) बैलाच्या सहाय्याने विहिरीतून पाणी काढण्याचे साधन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## राशीभविष्य

**मेष :** आज आनंद आणि सौहार्द वाढेल. व्यवसायात केलेले बदल फायदेशीर ठरतील. तुम्हाला नवीन कपडे मिळतील. नोकरीत पदोन्नतीसोबतच बदलही होतील. काही महत्त्वाच्या कामात यश मिळण्याची चिन्हे आहेत.

**वृषभ :** तुमचा गोड आवाज आणि साधे वर्तन लोकांना तुमच्याकडे आकर्षित करेल. राजकारणात तुमच्या उत्कट आणि प्रभावी भाषणाबद्दल उच्चपदस्थ लोकांकडून तुमचे कौतुक होईल.

**मिथुन :** आज तुम्हाला परीक्षेत किंवा स्पर्धेत चांगलं यश मिळेल. पत्रकारिता क्षेत्राशी संबंधित लोकांचं त्यांच्या लेखन किंवा कामाबद्दल बॉसकडून कौतुक होईल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस वाटेल.

**कर्क :** अत्यंत महत्त्वाच्या कामात उशीर झाल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. राजकारणात तुम्हाला जनतेचा पाठिंबा मिळेल. तुम्ही राजकीय क्षेत्रात वर्चस्व प्रस्थापित कराल. अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने काम थांबेल.

**सिंह :** व्यवसाय योजना यशस्वी होण्याची शक्यता आहे. नोकरीतील तुमच्या कामामुळे बॉसचे लक्ष तुमच्याकडे आकर्षित होईल. एखाद्या प्रिय व्यक्तीमुळे समाजात तुमचा आदर आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** आज दिवसाची सुरुवात तणावाने होईल. कामाच्या ठिकाणी तुम्ही करत असलेल्या चांगल्या कामाचे श्रेय दुसरे कोणीतरी घेईल. कामासाठी घरच्या व्यक्तींपासून दूर जावे लागू शकते.

**तुळ :** आज दिवसाची सुरुवात निरुपयोगी धावपळीने होईल. काहीतरी अनुचित घडण्याची भीती असेल. अभ्यासात अडथळे आल्याने मन अस्वस्थ असेल. नोकरीसाठी खूप भटकंती करूनही निराश व्हाल.

**वृश्चिक :** आज तुम्ही तुमच्या कामाच्या क्षेत्रात अत्यंत व्यस्त राहाल. राजकारणात पक्ष बदलण्यापूर्वी, विचार आणि परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करा. त्यानंतरच निर्णय घ्या. वाहन खरेदी करण्याची इच्छा पूर्ण होईल.

**धनु :** आज तुम्हाला नोकरीच्या मुलाखतीत किंवा स्पर्धा परीक्षेत यश मिळेल. नोकरी मिळवण्याची तुमची जुनी इच्छा पूर्ण होईल. मनासारखं यश मिळेल. कामाच्या ठिकाणी अनावश्यक संघर्ष होऊ शकतो.

**मकर :** आज व्यवसायातील अडथळे सरकारी मदतीमुळे दूर होतील. तुम्हाला सरकारी सत्तेचा लाभ मिळेल. नोकरीसाठी तुमचा शोध पूर्ण होईल. कुटुंबात नवीन पाहुणा येऊ शकतो.

**कुंभ :** आज नोकरदार वर्गाला काम मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस वाटेल. सरकारी मदतीने व्यावसायिक कामातील अडथळे दूर होतील. आज तुम्ही नवीन काम किंवा व्यवसाय सुरू करू शकता.

**मीन :** तुमचा दिवस उत्तम राहील. तुम्हाला प्रत्येक कामात यश मिळेल. तुमचे आरोग्य ठीक असेल. व्यवसायात तुम्ही एखादे मोठे काम भागीदारीत सुरु करू शकता. उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण होतील.

# उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार
## - प्रकाश आंबेडकर

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

"२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी अचानक 76 लाख मतांची भर पडली, हा प्रकार निवडणुकीच्या पारदर्शकतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे," असा घणाघात वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर, ते आता थेट सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार आहेत.

आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना आंबेडकरांनी न्यायालयाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. "निवडणूक आयोग स्वतः म्हणतो की 76 लाख मतदान वाढले, पण त्याचा डाटा नाही; मग निवडणूक कशी पारदर्शक ठरते?" असा सवाल करत त्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला लोकशाहीविरोधी ठरवले.

प्रकाश आंबेडकरांनी स्पष्ट केले की, त्यांची याचिका ही निवडणूक निकालाबाबत नसून निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेच्या चौकशीसाठी होती. मात्र कोर्टाने चुकीच्या व्याख्येमुळे तिला 'निवडणूक याचिका' समजून निकाल दिला, हे लोकशाही व्यवस्थेवर गदा आणणारे असल्याचे ते म्हणाले.

प्रेस नोटनुसार मतदानाच्या टक्केवारीत ६.८०% म्हणजे तब्बल ७६ लाख मतांची वाढ झाली होती. याबाबतची नोंद, माहिती आणि पुरावे मागूनही न्यायालयासमोर सादर करण्यात आले नाहीत, अशी गंभीर टीका करत त्यांनी विचारले, "डाटा नाही, पण मतं आली कुठून?"

आंबेडकर म्हणाले की, निवडणुकीत अनियमितता झाली असून, या "चोरांना" न्यायालयातून पाठबळ मिळत असल्याचा अंशतः आरोप त्यांनी केला. "ही निवडणूक खरीच फ्री अँड फेअर होती का, याची सखोल चौकशी व्हावी म्हणून आम्ही सर्वोच्च न्यायालयात जात आहोत," असे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.

या प्रकरणात लोकसत्ता दैनिकातील विश्लेषण आणि निवडणूक आयोगाची अधिकृत प्रेस नोट यांचा उल्लेख याचिकेत असूनही, कोर्टाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे आंबेडकरांनी खंतपूर्वक सांगितले.

या प्रकरणामुळे महाराष्ट्रातील निवडणूक प्रक्रियेवर नव्याने राजकीय वादळ निर्माण होण्याची शक्यता आहे. आंबेडकरांच्या या पावलामुळे सर्वोच्च न्यायालयात निवडणूक आयोगाच्या कामकाजाची पुन्हा एकदा कसोटी लागणार आहे.

# संघर्षाची तयारी ठेवा; मनाने आणि शरीराने सुदृढ राहिलात, तरच आयुष्याची लढाई जिंकाल!
## विद्यार्थ्यांना विश्वास नांगरे–पाटील यांचा सल्ला

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

सध्याच्या विद्यार्थ्यांभोवती, नव्या पिढीभोवती मोबाईलचा विळखा आहे. या आभासी जगाच्या मोहात न अडकता आयुष्याचे ध्येय ठरवा. त्यानंतर ते गाठण्यासाठी अभ्यासाचे, वेळेचे नियोजन करा. संघर्ष करण्याची तयारी ठेवा. मनाने आणि शरीराने सुदृढ राहीलात, तरच आयुष्याची लढाई जिंकाल, असा शब्दांचे बळ अतिरिक्त पोलिस महासंचालक (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) श्री. विश्वास नांगरे – पाटील यांनी दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पंखात भरले. मार्गदर्शनपर केलेल्या भाषणात श्री. नांगरे-पाटील यांनी दिलेले वैविध्यपूर्ण दाखले, स्वानुभव ऐकून उपस्थित विद्यार्थी अक्षरशः भारावले होते.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १०वी) परीक्षेत बृहन्मुंबई




महानगरपालिकेच्या २४८ माध्यमिक शाळांमधून सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा आणि शाळांचा गुणगौरव सोहळा भायखळा येथील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात आज (दिनांक २६ जून २०२५ ) पार पडला. यावेळी श्री. प्रमुख पाहुणे या नात्याने विश्वास नांगरे-पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. राजेश कंकाळ आदींसह उपशिक्षणाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, यशस्वी विद्यार्थी आणि त्यांचे पालक या सोहळ्याला उपस्थित होते.

श्री. नांगरे-पाटील यांनी त्यांच्या भाषणातून कोकरूड (जि. सांगली) येथील शालेय जीवनापासून तर दिल्ली येथील केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) परीक्षेच्या तयारीपर्यंतचा प्रवास उलगडून दाखविला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून तर स्वामी विवेकानंद यांच्यापर्यंतचे दाखले देत विद्यार्थ्यांना अभ्यासातील सातत्य, नियोजन आणि ध्येयपूर्तीपर्यंत थांबायचं नाही, असे मार्गदर्शन केले. दहावी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी पाच वर्षांपर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येत होती. यामध्ये आणखी दोन वर्षांची वाढ करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आता दहावीनंतर पुढील सात वर्षे शिष्यवृत्ती देण्यात येते. या निर्णयाचे देखील श्री. नांगरे-पाटील यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांना शिक्षणासह नीतिमूल्ये, सामाजिक बांधिलकी, नैतिकता आदींबाबतही धडे द्या, असे आवाहन त्यांनी शिक्षकांना उद्देशून केले. विविध ठिकाणी नोकरी निमित्ताने आलेले स्वअनुभव देखील त्यांनी कथन केले. सोबतच 'कायझेन' आणि 'इकिगाई' या दोन जपानी संकल्पनांचाही भाषणात धावता उल्लेख करून विद्यार्थ्यांत सातत्य आणि नियोजनाचे महत्त्व पटवून दिले. श्री. नांगरे-पाटील यांनी ओघवत्या शैलीत केलेल्या भाषणाने शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांची मने जिंकली.

# वाढवण बंदर व वडोदरा-मुंबई एक्स्प्रेस-वेशी उत्तन - विरार मार्ग जोडा - मुख्यमंत्री

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उत्तन-विरार सागरी मार्ग (यूव्हीएसएल) चा सुधारित आणि आर्थिकदृष्ट्या किफायतशीर प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर केला. यावेळी, प्रस्तावित उत्तन विरार मार्ग वाढवण बंदर व समृद्धी महामार्गाला जोडण्यात यावे. त्यामुळे हा सागरी मार्ग प्रकल्प मुंबईला महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाशी जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

प्रस्तावित उत्तन विरार सागरी मार्ग प्रकल्पाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनातील मंत्रीमंडळ कक्षात झालेल्या बैठकीत आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते. श्री. मुखर्जी यांनी सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची माहिती दिली.

उत्तन-विरार सागरी मार्ग हा प्रकल्पाच्या विरार कनेक्टरमार्फत हा सेतू वडोदरा-मुंबई एक्स्प्रेसवेशी थेट जोडला जाणार आहे, ज्यामुळे उत्तर उपनगरांपासून पश्चिम किनारपट्टीपर्यंतचा मालवाहतूक व प्रवासी वाहतूक मार्ग अधिक जलद व कार्यक्षम होणार आहे. हा प्रकल्प केवळ आर्थिक संधीच निर्माण करणार नाही, तर भारताच्या बंदर आधारित विकास दृष्टिकोनाला महत्त्वाची साथ देणारा ठरणार आहे. हा प्रकल्प केवळ आर्थिक संधीच निर्माण करणार नाही, तर भारताच्या बंदर आधारित विकास दृष्टिकोनाला महत्त्वाची साथ देणारा ठरणार आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

सविस्तर तांत्रिक व अभियांत्रिकी मूल्यांकन केल्यानंतर, एमएमआरडीएने सविस्तर प्रकल्प अहवालासह प्रकल्प रचनेचे 87,427 कोटी रुपयांपासून ते 52,652 कोटी रुपयांपर्यंतच्या खर्चाचे प्रस्ताव असलेल्या सहा वेगवेगळ्या पर्यायांचे सादरीकरण या बैठकीत केले. त्यातून आर्थिकदृष्ट्या अधिक व्यवहार्य, कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक असलेला 52,652 कोटी रुपयांच्या पर्यायाची मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी निवड केली. या पर्यायामुळे प्रकल्प खर्च ८७,४२७.१७ कोटींवरून ५२,६५२ कोटींवर आणण्यात यश आले आहे.

**प्रकल्प खर्च कपातीमागील मुख्य कारणे :**

☞ लेन डिझाइनमध्ये योग्य ते बदल: पूर्वी ४+४ लेन आणि इमर्जन्सी लेन असा मोठा रस्ता ठेवला होता. आता तो ३+३ लेनवर आणला गेला आहे. कनेक्टरसाठीसुद्धा ३+३+इमर्जन्सी ऐवजी फक्त २+२ लेन ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे सिव्हिल आणि स्ट्रक्चरल कामांमध्ये खूप बचत झाली.

☞ भविष्यातील जोडण्या लक्षात घेऊन नियोजन: भविष्यातले रस्ते जोडण्याचे टप्पे आणि सद्यस्थितीत अस्तित्वात असलेले रस्त्यांचे जाळे हे सगळं विचारात घेऊन महागाईचा अंदाज लक्षात घेत बजेट ठरवलं आहे. त्यामुळे जास्तीचा खर्च टाळता आला.

☞ जमीन अधिग्रहणाचा खर्च कमी : रचना आणि लेनची रुंदी कमी केल्यामुळे 'राईट ऑफ वे' म्हणजेच आवश्यक जागेची लांबी कमी झाली. त्यामुळे जमीन विकत घेण्याचा आणि प्रकल्पबाधितांवर होणारा खर्च बराच कमी झाला.

☞ कनेक्टरच्या रचनेत सुधारणा: पूर्वी दोन खांबांवर (पिलर्स) असलेली रचना होती, त्याऐवजी एका खांबावर आधारित असेल. त्यामुळे बांधकाम स्वस्त आणि पर्यावरणपूरक बनलं.

☞ तात्पुरते खर्च, सल्लागार फी आणि सुरुवातीचे इतर खर्च कमी: त्यामुळे एकूण खर्चात मोठी बचत झाली.

# 'खासगी मराठी शाळांना नाममात्र भाड्याने वर्गखोल्या द्या'

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

पालिकेच्या शालेय इमारतींमध्ये खासगी मराठी माध्यमाच्या शाळांना आणि संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांना नाममात्र भाड्याने वर्गखोल्या मिळाव्यात व पूर्वी जाहीर केलेल्या भाडेवाढ स्थगितीची तत्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने केली आहे.

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने २०२३ मध्ये यासंदर्भात निर्णय घेतला होता. परंतु, त्याची अंमलबजावणी अद्याप रखडली आहे. राज्यभरातील सुमारे २२० मराठी माध्यमाच्या खासगी शाळा व कनिष्ठ महाविद्यालये भाड्याने वर्गखोल्या वापरत असून त्यामध्ये सुमारे २५,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मराठी शाळांना सध्या भाडेवाढीमुळे आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. संबंधित महापालिका

आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व शिक्षणाधिकारी यांच्यासमवेत तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली. पालिकेच्या वर्गखोल्या नाममात्र भाड्याने देण्याबाबत आदेशही देण्यात आला. मात्र, शिक्षण विभाग किंवा लेखा विभागाकडून तसा अंतिम आदेश किंवा परिपत्रक अद्याप जारी करण्यात आलेले नाही.

# वाहतूक व्यावसायिकांच्या समस्या निराकरणासाठी समिती गठीत करून महिन्याच्या आत अहवाल सादर करावा - परिवहन मंत्री

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

वाहतूक व्यावसायिकांच्या ई-चलन विषयक समस्यांचे निराकरण करण्याची शासनाची भूमिका असून त्यासाठी परिवहन विभागांने संबंधितांची समिती गठीत करावी व एका महिन्याच्या आत समितीने अहवाल सादर करावा, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

मंत्रालयात ई-चलन प्रक्रिया सुधारणासंदर्भात आयोजित बैठकीत मंत्री श्री.सरनाईक यांनी संबंधितांना मार्गदर्शन केले. बैठकीस उद्योग मंत्री उदय सामंत, यांच्यासह अतिरिक्त मुख्य सचिव (परिवहन) गृह विभाग संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी, विविध वाहतूक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री श्री.सरनाईक म्हणाले की, ई- चलन प्रणालीत सुधारणा करताना प्राधान्याने वाहनचालक व मालक यांना नियमांचे पालन करण्यास प्रोत्साहन देणारे निकष असावे, त्यात कुठेही जाचक अटी लादू नये. एकाच दिवसात एका कारणासाठी वेगवेगळी चलन वसूल करु नये. त्यासाठी चलनाचा ग्राह्यता कालावधी निश्चित करावा, व्यावसायिक वाहनांना पार्किंग सुविधा उपलब्ध करुन द्यावी. मुंबईमध्ये जड वाहतूक वाहनांना प्राधान्याने पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. वाहतूक संघटनांच्या समस्या सोडवण्यासाठी परिवहन विभाग, पोलीस आणि संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांची सयुंक्त समिती गठीत करावी, त्यामध्ये वाहतूक संघटनांच्या प्रतिनिधींचा सहभाग घ्यावा, जेणेकरुन समितीच्या कामात पारदर्शकता व सर्वसमावेशकता येईल. तसेच पोलिस विभागमार्फत करण्यात येणाऱ्या कारवाईत सध्याच्या ई-चलन निकषात शिथिलता आणावी. परिवहन विभागाच्या परित्रकाच्या निकषानुसार पोलिसांनी देखील आवश्यक तिथेच कार्यवाही करावी. चलन लावताना लाईव्ह फोटो अपलोड करावे, रिअल टाइम फोटो घ्यावेत. अनावश्यक कारवाई करणे थांबवावे. संपूर्ण चलन प्रक्रिया ही सहिष्णू, पारदर्शक आणि सुव्यवस्थितरित्या राबविण्याच्या दृष्टीने समितीने अभ्यास करावा. ई-चलनाचे जे निकष जाचक ठरणारे असतील त्यात सुयोग्य बदल करण्यात यावे. वाहनांसाठीची गती मर्यादा, पार्किंग नियमावली यासर्वांचा अभ्यास करुन समितीने अहवाल द्यावा. वाहतूक संघटनांच्या मागण्यांना न्याय देण्याची विभागाची भूमिका असल्याचे मंत्री श्री.सरनाईक यांनी सांगितले.

# भूतबाधा झाल्याच्या संशयाने अमानुष मारहाण

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

भांडुप परिसरात अडीच वर्षांच्या निष्पाप बालकावर भूतबाधा असल्याचे सांगून अमानुषपणे अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी दाम्पत्याने या चिमुकल्याला जळत्या आगपेटीच्या काड्यांनी चटके दिले. आरोपी दाम्पत्य वैभव कोकरे (३५) आणि त्याची पत्नी वैभवी ऊर्फ हर्षदा यांना पोलिसांनी अटक केली आहे.

पीडित मुलाच्या आईने भांडुप पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ती एका दुकानात काम करत होती, हे दुकान आरोपी वैभव कोकरेचे होते. काही दिवसांनी वैभवने तिला आपल्या घरी कामासाठी बोलावले. ती गेल्या १५ दिवसांपासून त्यांच्या घरी काम करत होती आणि सोबत आपला लहान मुलगाही नेत होती. पोलिसांच्या माहितीनुसार, जेव्हा तो मुलगा सतत रडत होता, तेव्हा वैभव आणि त्याच्या पत्नीने त्याच्या आईला सांगितले की, मुलावर भूतबाधा झाली आहे आणि त्यावर उपचार करणे आवश्यक आहे. या बहाण्याने त्यांनी त्या चिमुकल्याला जळत्या आगपेटीच्या काड्यांनी चटके दिले आणि काठीने मारहाण

केली. तसेच पीडित महिलेला धमकी देण्यात आली की, तिने ही गोष्ट कुणालाही सांगू नये. प्रकरण तेव्हा उघडकीस आले, जेव्हा महिलेने कसाबसा आपल्या नातेवाईकांशी संपर्क केला आणि मदतीची विनंती केली. नंतर नातेवाईक कोकरे यांच्या घरी पोहोचले आणि त्या महिलेला व तिच्या मुलाला तिथून सोडवून रुग्णालयात दाखल केले. सध्या चिमुकला वाडिया रुग्णालयात उपचार घेत आहे. पीडित मुलाच्या काकांनी, दत्तात्रय कदम यांनी सांगितले की आरोपी दाम्पत्याने केवळ त्यांच्या पुतण्याला छळले नाही, तर त्यांच्या आजारी बहिणीच्या नवऱ्यालाही घरात येऊन मारहाण केली. त्यांनी असेही सांगितले की, पीडित महिला सोमवारपासून नातेवाईकांच्या संपर्कात नव्हती. नंतर तिने सांगितले की, तिचा मोबाईल काढून घेतला होता आणि तिला घराबाहेर पडू दिले जात नव्हते.

# खंडणीप्रकरणी दोघांची मुक्तता

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

एका बांधकाम व्यावसायिकाच्या तक्रारीवरून दाखल झालेल्या खंडणीच्या गुन्ह्याप्रकरणी गुंड रवी पुजारीशी संबंधित असलेल्या दोन आरोपींना मकोका विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे. २०१९ मध्ये पुजारीच्या सांगण्यावरून २५ कोटी रुपयांच्या खंडणीची धमकी देऊन २ कोटी रुपये मागितल्याचा दावा तक्रारदाराकडून करण्यात आला होता.

या अंतर्गत खंडणीविरोधी पथकाने विल्यम रॉड्रिग्ज (३०) आणि आकाश शेट्टी (४०) यांना अटक केली होती. वारंवार कॉलमुळे बिल्डरने १५ जानेवारी २०१९ रोजी गोरेगाव पोलीस ठाण्यात संपर्क साधला. नंतर हा खटला खंडणीविरोधी कक्षाकडे वर्ग करण्यात आला. दोन्ही आरोपींनी बिल्डरच्या कुटुंबाची, त्यांच्या व्यवसायाची आणि त्यांच्या इतर तपशीलांची माहिती गोळा केली आणि ती पुजारीला दिली होती.

आरोपींचा कॉल डेटा रेकॉर्ड, कॉलचे व्हॉइस रेकॉर्डिंग आणि रॉड्रिग्जच्या कबुलीजबाबावर तक्रारदार मोठ्या प्रमाणात अवलंबून होते. असे सांगत न्यायालयाने नमूद केले की, पोलिसांनी फोनवरून व्हॉइस रेकॉर्डिंग काढताना योग्य प्रक्रिया पाळली नव्हती.; त्यामुळे ते विश्वसनीय नव्हते. प्रमुख साक्षीदारांव्यतिरिक्त, बिल्डरच्या कुटुंबातील सदस्यांनीही त्यांच्या साक्षीत सुधारणा केल्या होत्या, ज्याचाजबाबात उल्लेख नव्हता.

# मेट्रोला मालमत्ता करमाफी द्यावी- एमएमआरडीएची पालिकेला विनंती

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मेट्रो प्रकल्पासाठी वापरण्यात येणाऱ्या मालमत्तेवरील सुमारे एक हजार कोटींवर मालमत्ता कर थकीत आहे. आरएमसी प्लांट व कास्टिंग यार्डवर आकारण्यात येणारा मालमत्ता कर थकीत आहे. महानगरपालिकेकडून आकारण्यात येणाऱ्या या मालमत्ता करामधून सवलत मिळावी, अशी विनंती केली आहे. एमएमआरडीएने शासनाच्या नगरविकास विभागाकडे याबाबत पाठपुरावा केला असून, मालमत्ता कर माफ करण्याबाबतचा अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात यावा, असे पत्र लिहून लक्ष वेधले आहे.

एमएमआरडीएच्या वतीने कर माफ करावा, अशी विनंती करणारे पत्र मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त कार्यालयास दिले आहे. नगरविकास विभागालाही याबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्याबाबत विनंती केली आहे. मेट्रो प्रकल्पासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात स्थापन करण्यात येणाऱ्या आरएमसी प्लांट व कास्टिंग यार्डवरील मालमत्ता कर माफ करण्याबाबत एमएमआरडीएने पत्राद्वारे विनंती केली आहे.

ही जागा एका कंत्राटदार कंपनीला कार्यान्वित करण्यासाठी देण्यात आली आहे. ही जागा आरएमसी प्लांट उभारणीसाठी वापरण्यात येणार असून, ती सार्वजनिक हिताच्या मेट्रो प्रकल्पासाठी वापरली जात आहे. यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे आणि शिफारशींसह संबंधित कंत्राटदाराकडून कर सवलतीची मागणी करण्यात आली आहे. मेट्रो प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक हित लक्षात घेता आरएमसी प्लांटसाठी वापरण्यात येणाऱ्या जागेवरील पालिकेचा मालमत्ता कर माफ करण्यात यावा. शासनाच्या मार्गदर्शनाखाली यावर लवकर निर्णय होऊन पालिकेकडून करमाफीचा लाभमिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# भाषेच्या मुद्द्यावर भाजपही आक्रमक

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीनंतर गुरूवारी भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक पार पडली. या बैठकीत स्थानिक पातळीवरील समीकरणांचा आढावा घेण्यात आला. तसेच, हिंदी सक्तीच्या निमित्ताने आक्रमक झालेल्या विरोधकांना सडेतोड उत्तर देण्याचे धोरणही कोअर कमिटीच्या बैठकीत निश्चित करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपाचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, प्रदेशाध्यक्ष आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह भाजपाचे राज्यातील महत्वाचे नेते या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत विविध महामंडळांवरील नियुक्त्यांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत चर्चा करून निर्णय घ्यावा, या नियुक्त्या मार्गी लावाव्यात अशी विनंतीही करण्यात आली. दरम्यान, कोअर कमिटीच्या बैठकीत हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून तापलेल्या राजकीय वातावरणाचेही पडसाद उमटले. हिंदी सक्तीच्या आडून विरोधक भाजपाला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. राज्यात हिंदीची सक्ती नाही. तरीही भाजपला लक्ष्य केले जात आहे. त्रिभाषा सूत्राचा निर्णयही पूर्वीचाच आहे. त्यामुळे या मुद्द्यावर सडेतोड उत्तर देण्याचाही निर्णय करण्यात आल्याचे समजते.

## महत्त्वाच्या बातम्या

### तोतया पोलिसांनी उकळली खंडणी

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

मलबार हिल येथील व्यावसायिकाला सायबर पोलीस असल्याचे सांगत पाच लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी मलबार हिल पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे यातील एक आरोपी हा तक्रारदाराच्या ओळखीचा असल्याची माहिती पुढे आली आहे. तक्रारदार हे व्यावसायिक असून, त्यांना तीन व्यक्तींनी संपर्क साधत कसारा सायबर पोलीस ठाण्यातून बोलत असल्याचे सांगितले. तसेच अल्पवयीन मुलांकडून मसाज करून घेतल्याप्रकरणी तुमच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यासाठी तुम्हाला अटक होऊ शकते, त्यांनी असे सांगितले. यावर आपण काहीच केले नसल्याचे तक्रारदारांनी सांगितले. मात्र, आरोपींनी अटकेपासून वाचण्यासाठी त्यांच्याकडे पाच लाखांची खंडणी मागितली.

### लाचखोर पोलिसाला रंगेहाथ अटक

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

विनाहेल्मेट कारवाई टाळण्यासाठी दुचाकीस्वाराकडून ३ हजारांची लाच घेणाऱ्या दादर वाहतूक शाखेतील एका पोलीस शिपायाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने अटक केली. विनायक बापू राठोड असे त्याचे नाव असून तो पोलीस शिपाई पदावर वाहतूक शाखा दादर विभाग येथे कार्यरत आहे. या वाहतूक पोलिसाने दुचाकीस्वाराकडे ५ हजारांची लाच मागितली होती. मात्र, तडजोडीअंती हा सौदा ३ हजार ठरला. त्यामुळे एसीबीच्या अधिकाऱ्यांनी ही लाच पडताळणी केली. त्यात हा प्रकार सत्य असल्याचे समोर आले. एसीबी पोलिसांच्या म्हणण्यानुसार, यातील तक्रारदार हे मोटार सायकल हेल्मेट न घालता चालवत होते. त्यामुळे त्यांची मोटारसायकल या वाहतूक पोलिसाने पकडली.

### आंतरराष्ट्रीय विमानतळावर १२० विदेशी वन्य प्राणी जप्त; दोन प्रवाशांना अटक

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

वन्य प्राण्यांची तस्करी केल्याप्रकरणी दोन प्रवाशांना कस्टम अधिकाऱ्यांनी अटक केली. त्यांच्याकडून या अधिकाऱ्यांनी १२० विदेशी वन्य प्राणी जप्त केले आहे. बँकॉकहून ते दोन्ही प्रवासी गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आले होते. त्याची हालचाल संशयास्पद वाटताच त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. त्यांच्या सामानाच्या झडतीदरम्यान एक बॅग सापडली. त्यात एक बॉक्स होता. या बॅगेतून या अधिकाऱ्यांनी बॅसिलिस्क, सरडे, इगुआना, सुमात्र पट्टेदार ससे आणि कुस्कससह १२० जिवंत वन्य प्राणी सापडले. वन्य प्राण्याची तस्करी केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. याच गुन्ह्यांत नंतर त्यांना अटक करणतया आली. जप्त केलेले वन्य प्राणी सीमा शुल्क आणि वन्यजीव गुन्हे नियंत्रण कक्षाने ताब्यात घेतले असून त्यांना पुन्हा बँकाँक येथे पाठविण्यात येणार आहे. या दोन्ही प्रवाशांची कस्टम अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरु आहे. त्यांनी यापूर्वीही वन्य प्राण्याची तस्करी केली आहे का याचा तपास सुरु आहे.

### वयोवृद्धासह दोघांची फसवणूक

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

साडेअकरा लाखांच्या हेव्ही डिपॉझिटचा अपहार केल्याप्रकरणी अमीतकुमार रंजन या प्रॉपर्टी एजंटविरुद्ध वर्सोवा पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. तो बिहारला पळून गेल्याचे तपासात उघडकीस आले असून त्याचा पोलिसांकडून शोध सुरु आहे. यातील वयोवृद्ध वांद्रे येथे राहत असून त्यांचा डेअरी फार्मचा व्यवसाय आहे. त्यांचा अमीतकुमार हा परिचित एजंट आहे. त्यांना अंधेरीतील वर्सोवा गावात एक फ्लॅट विकत घ्यायचा होता, मात्र सहा लाख रुपये कमी पडत असल्याने त्यांचा व्यवहार झाला नव्हता. त्यामुळे त्यांनी तोच रुम हेव्ही डिपॉझिटवर घेण्यासाठी अमीतकुमारसोबत जून २०२३ रोजी एक भाडेकरार केला होता. त्याला हेव्ही डिपॉझिट म्हणून सहा लाख रुपये दिले होते. त्यानंतर त्याने फ्लॅटमध्ये एक भाडेकरु ठेवला होता. फेब्रुवारी २०२४ पर्यंत त्याने त्यांना अठरा हजार भाडे दिले, मात्र नंतर त्याने भाडे देणे बंद केले. चौकशीनंतर अमीतकुमारने तो फ्लॅट दुसऱ्या व्यक्तीला विक्री केला होता. या फ्लॅटमध्ये भाडेकरु ठेवतो असे सांगून अन्य एका व्यक्तीकडून साडेपाच लाख रुपये घेतले होते. मात्र फ्लॅटचा ताबा न देता तो पळून गेला होता. हा प्रकार लक्षात येताच त्यांनी अमीतकुमार रंजनविरुद्ध वर्सोवा पोलिसांत तक्रार केली होती. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर त्याच्याविरुद्ध पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

### २५ लाखांचे शुद्ध सोने घेऊन कारागिराचे पलायन

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

मंगळसूत्र बनविण्यासाठी दिलेल्या सुमारे २५ लाखांचे शुद्ध सोने घेऊन एका कारागिराने पलायन केल्याची घटना झव्हेरी बाजार परिसरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी सुकांतो शिवांता घोष या कारागिराविरुद्ध एल. टी मार्ग पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरु केला आहे. यातील तक्रारदार ज्वेलर्स व्यापारी असून ते काळाचौकी येथे राहतात. त्यांचा सोन्याचे दागिने बनविण्याचा व्यवसाय असून ते होलसेल ज्वेलर्स व्यापार्यांना दागिने खरेदी-विक्री करतात. त्यांचा झव्हेरी बाजार येथील पहिली अग्यारी लेनवर एक युनिट असून तिथेच सुकांतो हा कारागिर म्हणून कामाला होता. फेब्रुवारी ते मे २०२५ या कालावधीत त्यांनी सुकांतो याला सुमारे २५ लाखांचे शुद्ध सोने २२ मंगळसूत्र बनविण्यासाठी दिले होते. मात्र त्याने मंगळसूत्र न बनविता या शुद्ध सोन्याचा अपहार करुन कारखान्यातून पलायन केले होते. हा प्रकार नंतर तक्रारदाराच्या लक्षात येताच त्यांनी त्याला कॉल केला होता, मात्र त्याचा कॉल बंद येत होता. तो त्याच्या ठाण्यातून घरातून पळून गेला होता.

### लेफ्टनंट कर्नलची अज्ञात सायबर ठगाकडून फसवणूक

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

अंधेरी येथे राहणाऱ्या एका लेफ्टनंट कर्नलची अज्ञात सायबर ठगाने फसवणुक केली. शोध निबंध प्रसिद्धीसाठी घेतलेल्या पैशांचा अपहार करुन ही फसवणुक करण्यात आली. याप्रकरणी अंधेरी पोलिसांनी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंदवला आहे. यातील ४१ वर्षांचे तक्रारदार लष्करात लेफ्टनंट कर्नल पदावर काम करतात. ते आर्टिफिशल इंटिलेजन्समध्ये पीएचडी करत आहे. त्यासाठी त्यांनी तीन शोध निबंध लिहिले होते. ते निबंध त्यांना आंतरराष्ट्रीय रिसर्च पेपर जर्नलमध्ये प्रसिद्ध करायचे होते. त्यासाठी त्यांनी गुगलमध्ये सर्च काढून एक मोबाईल क्रमांक शोधून काढला होता. या मोबाईलवर संपर्क साधल्यानंतर समोरील व्यक्तीने त्यांना निबंध प्रसिद्धीसाठी आधी पेमेंट भरावे लागतील असे सांगितले. त्यामुळे त्यांनी तिन्ही निबंध प्रसिद्धीसाठी त्याने दिलेल्या बँक खात्यात १ लाख २८ हजार रुपये पाठविले होते. तीन महिन्यानंतर ते निबंध प्रसिद्ध होईल असे सांगण्यात आले. मात्र तीन महिन्यांत त्यांचे निबंध प्रसिद्ध झाले नाही. त्यामुळे त्याने संबंधित व्यक्तीला कॉल करुन विचारणा केली होती. यावेळी त्याने त्यांना विविध कारण सांगून टाळण्याचा प्रयत्न केला होता.

# बालांगण



## असे साजरे होतात उत्सव





दोस्तांनो, आपल्याकडे सणांच्या निमित्ताने घराघरांमध्ये रोषणाई केली जाते. पणत्या लावल्या जातात. पण आपल्याप्रमाणे इतर देशांमध्येही प्रकाशाचा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव साजरा करण्याच्या पद्धती वेगळ्या असल्या तरी त्याचा उद्देश जवळपास सारखाच असतो.

✻ जपानामध्ये ओनियो फायर फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. हा सोहळा जानेवारी महिन्यात रंगतो. जपानमधल्या फुफुओकामध्ये लोक मेणबत्त्या आणि मशाली पेटवून संपूर्ण शहर उजळवून टाकतात. मशाली पेटवल्यामुळे संकटं दूर होतील, असं इथले लोक मानतात.

✻ थायलंडमध्ये लाम क्रयोंघ नावाचा उत्सव असतो. या उत्सवादरम्यान थाई लोक रात्रीच्या वेळी केळ्याच्या पानांपासून तयार केलेले दिवे लावतात. प्रार्थना करतात आणि हे दिवे वाहत्या पाण्यात सोडून दिले जातात.

✻ फ्लोरिडातल्या अल्टूना शहरात सॅमहेन फेस्टिवलचं आयोजन होतं. हा सुद्धा प्रकाशाचा उत्सव आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात हा उत्सव साजरा होतो.


✻ स्कॉटलंडमध्ये अप हेली नावाचा सण साजरा होतो. जानेवारी महिन्यातल्या शेवटच्या मंगळवारी हा सण साजरा होतो. या दिवशी इथले लोक प्राचीन काळातल्या योद्धयांप्रमाणे पेहराव करून मशाल घेऊन पदयात्रा काढतात.

भन्नाट

## फरक माहिती आहे?

बाजारातून कोणताही अन्नपदार्थ खरेदी करताना तुम्हाला मागच्या बाजूला एक्सपायरी डेट किंवा बेस्ट बिफोर डेट असे लिहिलेली दिसते. पण मित्रांनो, याचा अर्थ माहिती आहे का? बरेच लोक या दोन्ही तारखा सारख्याच मानतात. पण त्या पूर्णपणे भिन्न आहेत आणि त्यांचा अर्थ देखील वेगळा आहे. तेव्हा आज एक्सपायरी डेट आणि बेस्ट बिफोर डेट मध्ये काय फरक आहे ते जाणून घेऊ या.

एक्सपायरी डेट म्हणजे ज्या दिवसानंतर उत्पादन वापरण्यास सुरक्षित मानले जात नाही अशी तारीख. ही तारीख प्रामुख्याने औषधे आणि अन्नपदार्थांवर लिहिलेली असते. याचा अर्थ असा की, या तारखेनंतर हे उत्पादन वापरणे




आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. जसे की, एक्सपायरी डेटनंतर ब्रेडसारख्या अन्नपदार्थांमध्ये बुरशी वाढू शकते. यामुळे अन्न विषबाधा होऊ शकते.

बेस्ट बिफोर डेट म्हणजे ज्या तारखेनंतर उत्पादनाची सर्वोत्तम चव किंवा गुणवत्ता कमी होऊ शकते ती तारीख. अर्थात या तारखेनंतर चव उतरत असली तरी तो पदार्थ खराब होत नाही.

काळजी घ्या

ही तारीख बहुतेकदा कोरडे अन्न, पॅक केलेल्या वस्तू आणि सौंदर्यप्रसाधनांवर लिहिलेली असते. यावरुन एवढेच समजते की, या तारखेनंतर संबंधित उत्पादनाच्या चव, पोत, रंग किंवा वासात काही बदल होऊ शकतो, परंतु उत्पादनात असा कोणताही बदल झाला नाही तर ते वापरले जाऊ शकते.

म्हणजेच बेस्ट बिफोर डेट नंतर देखील आपण उत्पादन वापरु शकतो. परंतु त्यातून विचित्र वास येत असेल, रंग बदलला असेल तर वापर करु नये. उत्पादनाची चव किंवा रंग बदलला असेल तर ते फेकून द्यावे. उत्पादन योग्यरित्या साठवले गेले असेल आणि ते बराच काळ टिकू शकते. सहाजिकच ते वापरले जाऊ शकते. तथापि उत्पादनाच्या एक्सपायरी डेट किंवा बेस्ट बिफोर डेटबद्दल काही शंका असेल तर ते न वापरणे चांगले.

## नाव घेताना बायका लाजतात




छोट्या दोस्तांनो, उत्तर प्रदेशातील अनेक गावे प्रसिद्ध आहेत. यातील अर्ध्याहून अधिक गावे तर शहरांशी स्पर्धा करू शकण्याजोगी आहेत. या राज्यामध्ये तुम्हाला विविध संस्कृतींचे मिश्रण तसेच एकता पाहायला मिळेल. येथे प्रत्येक धर्माचे लोक राहतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे येथील लोक आजही आपल्या संस्कृतीशी, मातीशी जोडलेले आहेत.

तेथील अनेक गावांमध्ये संध्याकाळी घराबाहेर मुले खेळताना दिसतील. महिला विहिरीतून पाणी भरताना दिसतील. पुरुषांचा एक गट गप्पा मारताना, कामे करताना दिसेल. हे दृश्य आता शहरात दिसत नाही. असे असतानाच गावांची अशीही नावे आहेत जी ऐकून तुम्हाला नक्कीच हसायला येईल. कदाचित ती तुम्ही आधी कधीच ऐकलीही नसतील. चला तर, आज अशाच एका गावाविषयी जाणून घेऊ या.

यूपीमधील या गावाचे नाव घेण्यास महिलांना लाज वाटते तर दुसरीकडे पुरुष नाव घेताना हसतात. त्याच वेळी काही लोकांना मात्र त्याचा अभिमान आहे. हे गाव सुलतानपूर जिल्ह्यात असून भदैया ब्लॉकमधील बालमपूर असे त्याचे नाव आहे. हे गाव केवळ त्याच्या नावामुळेच चर्चेत नाही तर त्यात काही खासियत देखील आहे. गावाचे नाव बालमपूर असण्याचे एक खास कारण आहे. ते म्हणजे ते तीन भावांच्या नावावरुन पडले आहे.

अजबगजब

## हे लक्षात आले?




मुलांनो, तुम्ही बातम्या वाचायच्या, सामान्य ज्ञान वाढवायचं तर पेपर वाचायलाच हवा. पण निरखून पाहिले तर पेपरच्या खालच्या बाजूला तुम्हाला चार रंगीत गोल दिसतील. ते तुमच्या लक्षात आले नसतील तर आता बघा. या रंगीत गोलांचा काय अर्थ असावा, हे गोल का बरं दिले जात असावेत, असे प्रश्न तुम्हाला पडले असतील. याच प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊ.

पूर्वीच्या काळी वर्तपानपत्रं कृष्णधवल म्हणजे ब्लॅक अँड व्हाईट असायची. काळानुरुप त्यात बदल झाले आणि रंगीत फोटो, अक्षरं छापली जाऊ लागली. लाल, पिवळा आणि निळा असे तीन प्रमुख रंग असल्याचं तुम्हाला माहीत असेल. पेपर प्रिंट करण्यासाठी प्रिंटरचा वापर होतो. प्रिंटरमध्येही रंगांचं हेच तंत्र वापरलं जातं. प्रिंटरमध्ये या तीन रंगांसह काळ्या रंगाचा समावेश होतो. हे चार गोलांचा सीएमव्हायके हा क्रम असतो. यात सी म्हणजे सियान (निळा), एम म्हणजे मजेंटा (गुलाबी), वाय म्हणजे येलो (पिवळा) आणि के म्हणजे ब्लॅक (काळा) हे रंग असतात. या रंगांना योग्य क्रमाने जोडलं तर दुसरा कोणताही रंग मिळवता येतो. सीएमव्हायकेमुळे छपाईदरम्यान इतर रंग वृत्तपत्राच्या पानावर दिसू शकतात. वृत्तपत्र हातात घेतल्यानंतर काही फोटो धुरकट दिसत असतील किंवा रंग एकमेकांमध्ये मिसळले असतील तर सीएमव्हायकेचं तंत्र बिघडल्याचं समजावं.

असं का असतं?

## मोड वापरा, फोटो खुलवा



दोस्तांनो, आता फोटो काढण्यासाठी स्मार्टफोन वापरला जातो. स्मार्टफोनने फोटो काढण्याचं वेगळंच तंत्र आहे. फोनमध्ये वेगवेगळे मोड असतात. या मोड्सचा वापर करून तुम्ही छान छान फोटो काढू शकता. हे फोटो सोशल साईट्सवर पोस्ट करायचे असतात. त्यामुळे तुमचे फोटो छानच असले पाहिजेत. मग आता स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याने फोटो काढण्याचं तंत्र जाणून घेऊ.

✻ दोस्तांनो, तुमच्या फोनमध्ये बोकेह नावाचा मोड असतो. या मोडमध्ये फोटोची पार्श्वभूमी फिकट म्हणजे ब्लर करता येते. म्हणजे या फोटोत व्यक्ती अगदी स्पष्ट दिसते. तुम्ही या मोडचा वापर करू शकता. बोकेह मोडचा कौशल्याने वापर करून छान फोटो काढता येतील.

✻ रात्रीच्या वेळी फोटो काढायचे असतील तर नाईट स्केप मोड वापरा. या मोडमुळे रात्रीच्या अंधूक प्रकाशात तुम्ही छान फोटो काढू शकाल.

✻ काही स्मार्टफोनमध्ये अल्ट्रा वाइड अँगल कॅमेरा असतो. यामुळे सगळ्या ग्रूपचा फोटो येऊ शकतो. तुमच्या स्मार्टफोनमध्ये असा अँगल असेल तर त्याचा वापर करा.

टेक्नो टिप्स

## आता ई ब्लँकेटचा जमाना



दोस्तांनो, थंडीत जाड पांघरूण किंवा ब्लँकेट घेऊन झोपावंसं वाटतं. अंगावरचं ब्लँकेट बाजूलाही करावंसं वाटत नाही. परदेशात तर थंडीसाठीचं ब्लँकेट लोकर किंवा जाड कापडापासून तयार केलं जातं. मात्र आता आपण ई ब्लँकेट अंगावर घेऊ शकतो. मध्यंतरी श्याओमी या कंपनीने ई ब्लँकेट सादर केलं आहे. या ब्लँकेटचा वापर सहजपणे करता यावा यासाठी कंपनीने ॲपही तयार केलं आहे. आता हे ई ब्लँकेट अंगावर कसं घ्यायचं असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. पण कंपनीने ग्राहकांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली आहे. यात स्मार्ट स्लीप मोड आहे. त्यामुळे ब्लँकेट घेतल्यावर शांत झोप लागेल. या अनोख्या ब्लँकेटमुळे शरीराचं तापमान नियंत्रणात रहातं. पुरेशी ऊब देण्याचं काम हे ब्लँकेट करतं. ब्लँकेटमध्ये व्हॉईस असिस्टंटचीही सोय आहे. व्हॉईस असिस्टंटमुळे ब्लँकेटला तोंडी सूचनाही देता येतील. तेव्हा थंड प्रदेशात जायचं असेल तर हे घेऊन जायलाच हवं.

नवं काही

## बाबा, माझे बाबा!



दोस्तांनो, वडील हा शब्द ऐकताच मनात एका अशा व्यक्तीची प्रतिमा उभी राहते, जो जास्त बोलत नाही पण ज्याच्या खांद्यावर आपण नेहमीच निश्चितपणे विसावतो. आई आपल्याला प्रेमाने आणि काळजीने वाढवते तर वडील जीवनातील प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहण्यास शिकवतात. अनेकदा आपण त्यांचा सल्ला, शिकवण ऐकत नाही. परंतु त्यांच्या प्रत्येक कामातून, प्रत्येक निर्णयातून आपण त्या स्वीकारत राहतो. हे मौल्यवान धडे आपल्याला जीवनाच्या कोणत्याही शर्यतीत मागे राहू देत नाहीत.

आपण बाबांना घर आणि कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या घेताना पाहतो. बिल भरणे असो, दुरुस्तीचे काम असो किंवा घरासाठी आवश्यक वस्तू आणणे असो... वडील नेहमीच आघाडीवर असतात. ते आपल्याला समजावून सांगत नाहीत तर जबाबदार असण्याचा अर्थ काय आहे हे कृतीतून दाखवतात. ते त्यांची झोप, आराम आणि कधीकधी मनातील इच्छाही बाजूला ठेवून कुटुंबासाठी कष्ट करतात. जबाबदारीची ही भावना पाहूनच तुम्ही मुले जीवनात आपली कर्तव्ये कशी पार पाडायची हे शिकता. हा धडा भविष्यात करिअरसाठी, नातेसंबंधांसाठी आणि समाजासाठी आपल्याला जबाबदार बनवतो.

बाबा काम करताना कधी अपयशीही ठरतात. पण ते हार मानत नाहीत. आपण नेहमीच त्यांना यशस्वी होईपर्यंत प्रयत्न करताना पाहतो. बाबा त्यांच्या अपयशांबद्दल उघडपणे क्वचितच चर्चा करतात, परंतु त्यांची चिकाटी आणि कधीही न हार मानण्याची वृत्ती आपल्याला खूप काही शिकवते. आपल्याला शिकायला मिळते की, अपयश हा आयुष्याचा शेवट नाही तर काहीतरी नवीन शिकण्याची आणि चांगल्या प्रकारे प्रयत्न करण्याची संधी आहे. ही मानसिक शक्ती सर्वात मोठ्या आव्हानाला तोंड देताना उपयोगी पडते. तीच संकटकाळात खंबीरपणे उभे राहण्याचे धैर्य देते.

कसे वागाल?

चित्र रंगवा



## साखरेचे खाणार त्याला...





छोट्या दोस्तांनो, आज आपण 'साखरमुक्त' आणि 'नो-ॲडेड शुगर' यातील फरक जाणून घेऊ या. एखाद्या उत्पादनावर नो-ॲडेड शुगर लिहिलेले असते, तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की, त्यात अतिरिक्त साखर टाकलेली नाही. तथापि, याचा अर्थ असा नाही की त्या उत्पादनात अजिबात साखर नसते. त्या उत्पादनात नैसर्गिकरित्या असणारी साखर असते. फळांच्या रसात फ्रुक्टोज किंवा दह्यात लैक्टोज सारखी नैसर्गिक साखर असतेच. म्हणून तुम्हाला एखाद्या उत्पादनावर 'साखरेशिवाय' असे लिहिलेले लेबल दिसले तर समजून घ्या की त्यात कृत्रिम साखर मिसळलेली नाही. केवळ नैसर्गिक साखर आहे.

'साखरमुक्त' असे लेबल असणाऱ्या उत्पादनांमध्ये साखरेचे प्रमाण नगण्य असते. अशा उत्पादनांमध्ये गोडपणासाठी साखरेऐवजी कृत्रिम गोड पदार्थ वापरले जातात. उदाहरणार्थ, मधुमेहाच्या रुग्णांसाठी कोणताही गोड पदार्थ तयार करताना त्यात साखर नसते तर स्टीव्हियासारखे कृत्रिम गोड पदार्थ वापरले जातात.

आता तुमच्या मनात प्रश्न असेल की या दोघांपैकी कोणते चांगले आहे. तर उत्तर असे की, अतिरिक्त साखरेचे प्रमाण कमी करायचे असेल तर साखरेशिवाय तयार केलेली उत्पादने वापरणे चांगले असते. पण कोणी साखर खाणे पूर्णपणे थांबवू इच्छित असेल तर त्यांनी साखरमुक्त उत्पादने निवडणे चांगले.

जाणून घ्या

ठिपके जुळवा



### स्मार्ट टिप्स

#### असा सुरू करा अभ्यास



छोट्या दोस्तांनो, सुट्टी संपल्यावर तुम्ही पुन्हा अभ्यासाला लागला असाल. सुट्टीमुळे अभ्यासाचा थोडा कंटाळा आलेला असतो. पण तुम्हाला पुन्हा एकदा रिचार्ज व्हायला हवं. अभ्यासाला लागायला हवं. यासाठी तुमच्या आवडत्या विषयाचा अभ्यास करायला सुरुवात करा. गणिताचा कंटाळा येत नाही.

### खादाडी


#### मेक्सिकन कॉर्न



काही चटपटीत खायचं असेल तर तुम्ही मेक्सिकन कॉर्न हा पदार्थ बनवू शकता. यासाठी मक्याची दोन कणसं उकडून घ्या. तीन चमचे मेयोनीज, दोन चमचे क्रीम, एक चमचा लाल तिखट, लिंबाचा रस, पाव कप किसलेलं चीझ, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ असे पदार्थ घ्या. आता एका बाउलमध्ये मेयोनीज, क्रीम, मीठ आणि लाल तिखट घालून नीट हलवून घ्या. आता मयोनिजचं हे मिश्रण उकडलेल्या मक्याच्या कणसांवर नीट लावून घ्या. त्यावर लिंबाचा रस लावून वरून किसलेलं चीझ आणि कोथिंबिर घाला. मस्तपैकी मेक्सिकन कॉर्न खा.

### दोस्त हे मस्त

#### असे हे सी ऑटर




सी ऑटर हा प्राणी बराच वेळ पाण्यात रहातो. ऑटर हा प्राणी ऑस्ट्रेलिया खंड सोडून इतर प्रत्येक खंडात आढळतो. ऑटरचे दात अणकुचीदार असतात. तो पटकन शिकार करतो. ते पोहण्यासाठी शेपटीचा वापर करतात. त्यांचे पाय खूप छोटे असतात. म्हणूनच त्यांना पोहायला आवडत असावं.

### योगा टाईम

#### महत्त्व सूर्यनमस्कारांचं




मुलांनो, दररोज सूर्यनमस्कार घालायला हवेत. सूर्यनमस्कार हा संपूर्ण व्यायाम आहे. या व्यायामामुळे तुमचा आजारांपासून बचाव होईल. सर्दी, खोकला, ताप असे आजार फार त्रास देणार नाहीत. तुमचं लक्षही केंद्रित व्हायला मदत होईल. सूर्यनमस्काराची गोडी लागली की तुम्ही हा व्यायाम नियमितपणे कराल.



# सेन्सेक्स पुन्हा 84000 च्या वर सलग चौथ्या दिवशी तेजी

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

भारतीय शेअर बाजार आज २७ जून रोजी सलग चौथ्या दिवशी वाढीसह बंद झाले. सेन्सेक्स ३०३.०३ अंकाने वधारून ८४,०५८.९० वर बंद झाला. तर निफ्टी ८८.८० अंकांच्या वाढीसह २५,६३७.८० वर बंद झाला. यामुळे आज गुंतवणूकदारांच्या संपत्तीत २.६ लाख कोटींची वाढ झाली. या संपूर्ण ट्रेडिंग आठवड्यात सेन्सेक्स आणि निफ्टीने २ टक्क्यांनी वाढ नोंदवली. इस्रायल आणि इराणमधील युद्धबंदी आणि भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार लवकर



सुरू होण्याची शक्यता यामुळे बाजारात गुंतवणूकदारांची भावना बळकट झाली.

तेल आणि वायू, धातू आणि वाहन क्षेत्रात सर्वाधिक खरेदी दिसून आली. शुक्रवारी सलग सहाव्या दिवशी निफ्टी स्मॉलकॅप निर्देशांक वाढीसह बंद झाला. या संपूर्ण आठवड्यात निफ्टी स्मॉलकॅप

**सेन्सेक्स 84,058**

**निफ्टी 25,637**

१०० निर्देशांक जवळपास ४ टक्क्यांनी वाढला आहे. दुसरीकडे, या काळात निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांक २ टक्क्यांनी वाढला.

आज २७ जून रोजी बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४६०.१३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे मागील दिवशी म्हणजेच गुरुवार, २६ जून रोजी ४५७.५२ लाख कोटी रुपये होते. अशाप्रकारे सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल २.४६ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी १८ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये एशियन पेंटच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ३.०६ टक्के वाढ झाली. यानंतर, अल्ट्राटेक सिमेंट, पॉवर ग्रिड, आयसीआयसीआय बँक आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे शेअर्स १.३९ टक्क्यांवरून २.४३ टक्क्यांनी वाढून बंद झाले.

# खोमेनींना ठार करायचे होते पण योजना फसली

तेल अविव, दि. २७ वृत्तसंस्था

इराण आणि इस्रायलमध्ये चाललेला १२ दिवसांचा सशस्त्र संघर्ष थांबल्यानंतर आता इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांना मारण्याची योजना आखल्याचे कबूल केले आहे. मात्र आयत्यावेळेला खोमेनी भूमिगत झाल्यामुळे त्यांचा ठावठिकाणा मिळू शकला नाही, असेही ते म्हणाले.

जर खोमेनींचा ठावठिकाणा मिळाला असता तर आम्ही त्यांना निश्चितच बाहेर येण्यास भाग पाडले असते, अशी माहिती काट्झ यांनी कान पब्लिक टिव्हीला दिलेल्या मुलाखतीत दिली. इराणचे सर्वोच्च नेते अतिशय चलाखीने अज्ञात स्थळी भूमिगत झाले होते. तसेच त्यांनी आपल्या कमांडर्सशीही संपर्क



तोडला होता. ज्यामुळे त्यांच्यावर हल्ला करणे शक्य झाले नाही, असेही काट्झ म्हणाले.

टीव्हीला दिलेल्या मुलाखतीत काट्झ यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. ते म्हणाले, १२ दिवस चाललेल्या संघर्षादरम्यान आम्ही खोमेनींचा खूप शोध घेतला. आमचे ध्येय इराणमधील राजवट बदलणे नव्हते, तर इराणमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण करण्याचे आमचे उद्दिष्ट होते.

इराणचे अणुसंशोधन थांबविणे हाच सशस्त्र संघर्षाचा उद्देश असल्याचे इस्रायलने आतापर्यंत सांगितले होते. मात्र आता संरक्षण मंत्र्यांनीच इराणच्या सर्वोच्च नेत्यांना संपविण्याची योजना आखल्याचे कबूल केले आहे.

१३ जून रोजी इराण आणि इस्रायल यांच्यात लष्करी संघर्ष सुरू झाला होता. २५ जून रोजी अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर युद्धविराम घडून आला. दरम्यान इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे वरिष्ठ कमांडर आणि अणु वैज्ञानिक मारले गेले. टाइम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार, इस्रायलने इराणवर जोरदार हवाई हल्ला केला. तसेच या हल्ल्यामुळे इराणचा अणु आणि क्षेपणास्त्र निर्मितीचा कार्यक्रम अनेक वर्ष मागे ढकलला.

खोमेनींना ठार करण्यासाठी इस्रायलने अमेरिकेची परवानगी मागितली होती का? असे विचारले असता काट्झ यांनी चॅनेल १३ ला सांगितले की, या गोष्टींसाठी आम्हाला परवानगीची आवश्यकता नाही. काट्झ यांनी खोमेनी यांची तुलना हेजबोलाचे नेते हसन नसरल्लाह यांच्याशी केली. मागच्या वर्षी हसन नसरल्लाह इस्रायलच्या हल्ल्यात ठार झाले.

# लिव्ह-इन रिलेशनशिपची संकल्पना मध्यमवर्गीय मूल्यांच्या विरोधात

## अलाहाबाद उच्च न्यायालयाची टिप्पणी

प्रयागराज, दि. २७ वृत्तसंस्था

अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका प्रकरणावरील सुनावणी दरम्यान लिव्ह-इन रिलेशनशिपबाबत एक महत्वाचं निरीक्षण नोंदवलं आहे. लग्नाचं खोटं आश्वासन देऊन एका महिलेचं लैंगिक शोषण केल्याचे आरोप असलेल्या एका आरोपीला न्यायालयाने जामीन मंजूर करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवलं. सुनावणी वेळी न्यायालयाने म्हटलं की, 'लिव्ह-इन रिलेशनशिपची संकल्पना भारतीय मध्यमवर्गीय समाजात स्थापित मूल्यांच्या विरुद्ध आहे.'

या प्रकरणाबाबतची याचिका शान आलमने दाखल केली होती. तसेच न्यायालयांमध्ये पोहोचणाऱ्या अशा प्रकरणांच्या वाढत्या संख्येबाबतही अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने म्हटलं की, सर्वोच्च न्यायालयाने लिव्ह-इन रिलेशनशिपला कायदेशीर मान्यता दिल्यानंतर न्यायालय अशा प्रकरणांना कंटाळलं आहे. भारतीय मध्यमवर्गीय समाजात लिव्ह-इन-



रिलेशनशिपची संकल्पना प्रस्थापित कायद्याच्या विरुद्ध असल्यामुळे अशा प्रकारच्या खटल्यात वाढ झाल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त 'बार अँड बेंच'ने दिलं आहे.

न्यायालयाने पुढं असंही म्हटलं की, लिव्ह-इन रिलेशनशिपमुळे महिलांना जास्त नुकसानीला सामोरं जावं लागतं, तर पुरुष लिव्ह-इन रिलेशनशिप संपल्यानंतर पुढे जाऊ शकतात आणि लग्न देखील करू शकतात. मात्र, ब्रेकअपनंतर महिलांना जीवनसाथी शोधणं कठीण असतं. भारतीय दंड संहिता आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचं संरक्षण कायदाच्या (POCSO) विविध तरतुदींखाली गुन्हा दाखल करण्यात आलेल्या शान आलम नावाच्या आरोपीच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने ही टिप्पणी केली.

या प्रकरणात लग्नाचं खोटं आश्वासन देऊन आणि नंतर लग्न करण्यास नकार देऊन फिर्यादीशी शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप या प्रकरणात आरोपीवर करण्यात आला होता. तसेच तक्रारदाराच्या वकिलाने खंडपीठासमोर युक्तिवाद करताना म्हटलं की, आरोपीच्या कृत्यांमुळे तिचे आयुष्यभर शोषण झालं आहे कारण कोणीही तिच्याशी लग्न करण्यास तयार होणार नाही.

त्यानंतर खंडपीठाने म्हटलं की लिव्ह-इन-रिलेशनशिपची संकल्पना तरुण पिढीला खूप आकर्षित करत असली तरी सध्याच्या प्रकरणांत त्याचे प्रतिकूल परिणाम दिसून येत आहेत. तसेच २५ फेब्रुवारीपासून आरोपीला सतत तुरुंगवास आणि आधी कोणताही गुन्हेगारी इतिहास नसणे, हे आरोपांचे स्वरूप आणि तुरुंगातील गर्दी असल्याच्या कारणास्तव खंडपीठाने जामीन मंजूर केला.

# कोलकाता हादरले! लॉ कॉलेजमधील विद्यार्थीनीवर सामूहिक अत्याचार, तीन आरोपींना अटक

कोलकाता, दि. २७ वृत्तसंस्था

मागील वर्षी कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेजमध्ये एका तरुणीवर अत्याचाराची घटना घडली होती. या प्रकरणाला वर्ष उलटले असून आता आणखी एक अशीच घटना समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण देश हादरला. कोलकाता येथील लॉ कॉलेजमधील एका तरुणीवर सामुहिक अत्याचार केल्याचे समोर आले.

शहरातील एका लॉ कॉलेजमध्ये एका विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार झाला. या घटनेप्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींमध्ये एक माजी विद्यार्थी आणि त्याच संस्थेतील दोन कर्मचारी आहेत. सध्या पोलिस आरोपींची चौकशी करत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ जून रोजी रात्री १० ते १०.५० वाजेपर्यंत आरोपींनी तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. या काळात पीडिता दयेची याचना करत राहिली. पण आरोपींनी तिच्यावर अत्याचार केले.

पीडित महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केली. २६ जून रोजी आरोपींना अटक करण्यात आली. पोलिसांनी तिन्ही आरोपींचे मोबाईल फोनही जप्त केले आहेत आणि तिघांनाही न्यायालयात हजर करण्याची तयारी सुरू आहे. पोलिसांनी आरोपींच्या कुटुंबियांनाही बोलावून घटनेबद्दल विचारपूस केली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडितेने शहर पोलीस ठाणे गाठून महाविद्यालयातील दोन कर्मचारी आणि एका माजी विद्यार्थिनीविरुद्ध सामूहिक बलात्काराची तक्रार दाखल केली. पीडितेच्या तक्रारीच्या आधारे, तिची राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालयात तपासणी करण्यात आली.

पीडितेने पोलिसांना सांगितले की, आरोपीने तिला कॉलेजच्या खोलीत बोलावले. तिथे सामूहिक अत्याचार केला. आरोपींपैकी एकाने तिच्यावर बलात्कार केला आणि इतरांनी मुख्य आरोपीला मदत केली.

# सोन्या-चांदीच्या दरात आज मोठी घसरण

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी

आज सराफा बाजारात सोने आणि चांदीच्या किमतीत घसरण होत आहे. सोनं सतत स्वस्त होत असून ते प्रति १० ग्रॅम १०२४ रुपयांनी घसरून ९६१३५ रुपयांवर आलं. चांदीच्या किमतीत ३५० रुपयांची घट झाली आहे आणि ती प्रति किलो १०६८०० रुपयांवर आली. जीएसटीमुळे सोन्याची किंमत प्रति १० ग्रॅम १००००० रुपयांच्या खाली गेली आहे. जीएसटीमुळे २४ कॅरेट सोनं प्रति १० ग्रॅम ९९०१९ रुपये दरानं विकलं जात आहे, तर चांदी ११०००४ रुपये प्रति किलो दरानं विकली जात आहे.

# एसीच्या तापमानावर मर्यादा आवश्यक

**जागतिक तापमान वाढीचे परिणाम गेल्या आठ दहा वर्षांच्या कालावधीत प्रकर्षाने जाणवू लागलेले आहेत. जागतिक तापमान वाढीसाठीची जी काही प्रमुख कारण आहेत त्यामध्ये वातावरणात मोठ्या प्रमाणात होणारे कार्बन वायूचे उत्सर्जन हे अत्यंत महत्वाचे असे कारण आहे. अर्थात जगभरात वातानुकूलित यंत्रणेचा [एसी ] होत असलेला अतिरेकि वापर आणि त्या माध्यमातून होणारे कार्बन वायूचे उत्सर्जन हे मानवी आरोग्याच्या आणि म्हटलं तर अस्तित्वाच्या दृष्टिकोनातून देखील अत्यंत गंभीर आहे. म्हणूनच वातावरण कमीत कमी कार्बनमुक्त होण्यासाठी एसीच्या तापमानावर मर्यादा आवश्यक आहे. याच संधर्भात पर्यावरण अभ्यासक डॉ. मेघश्री दळवी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

**साप्ताहिक संवाद**

१] एसी च्या तापमानामुळे होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाची सद्यस्थिती नेमकी काय आहे?

एसी च्या तापमान वाढीचे प्रमाण हे प्रत्येक वर्षी वाढतेच आहे अर्थात त्या मध्यमातूनच वातावरणात कार्बन सारख्या घातक वायूचे उत्सर्जन देखील वाढतेय. युरोपमध्ये २०१८ च्या उन्हाळ्यात इलेक्ट्रिक पंख्यांची मागणी इतकी वाढली कि आयात करून देखील पुरवठा कमी पडू लागला. आपल्याकडे मागील वर्षीच्या उन्हाळ्यात बंगळुरूमध्ये एसी ची मागणी ५० टक्क्यांनी वाढली. आज जागतिक पातळीवरील ऊर्जेच्या वापरापैकी ७ टक्के एसीसाठी होतो. आणि तो २०५० पर्यंत अधिकच वर जाईल. अस्थिर हवामान आणि बदलते ऋतुचक्र यामुळे एसीचा वापर वाढतो. त्यासाठी लागणारी अधिकची ऊर्जा निर्माण करताना कार्बन उत्सर्जनात भर पडते. मग पुन्हा तापमानात वाढ आणि पर्यायाने एसीसाठी लागणाऱ्या ऊर्जेत वाढ असे दुष्टचक्र सुरु आहे. या कार्बन उत्सर्जनाचे धोके तितकेच गंभीर होत आहेत.

२] तापमान वाढीमुळे शहरी भागांमध्ये उष्णतेची बेट तयार होत आहेत म्हणजे नेमकं काय?

एसीच्या बाह्य यंत्रणेमुळे परिसरातील तापमान झपाट्याने वाढते. शहरामध्ये मोकळ्या मैदानात किंवा झाडांच्या सावलीत थोडा थंडावा वाटतो. पण रस्त्यावर किंवा इमारतीजवळ प्रचंड उष्णता

**लोकरंग**

जाणवते. बांधकामात वापरलेले सिमेंट कॉंक्रीट,डांबर आणि लोखंड दिवसभर उष्मा शोषून ठेवतात आणि तापमान वाढते. इमारतींच्या गर्दीत वाऱ्याला अडथळे आल्याने या उष्णतेला बाहेर पडायला वाव नसतो. त्यामुळे रात्री देखील तापमान फारसे घटत नाही. याचा परिणाम म्हणून शहरातील काही भागात मोकळ्या परिसराच्या तुलनेत २ ते ५ अंश सेल्सिअस जास्त तापमान असते. यालाच उष्णतेचे बेट अर्थात हिट आयलंड म्हणतात. एसीचा वापर वाढल्याने शहरातील उष्णतेची बेटे अधिकच दाहक होऊन नागरी जीवनावर अनेक दुष्परिणाम जाणवत आहेत.

३] एसी च्या तापमानवाढीवर नियंत्रणाचा जो तोडगा सरकारने काढलेला आहे तो काय आहे?


एसी च्या अतिरेकी वापराचा धोका लक्षात घेऊनच भारत सरकारने यावर एसीचे तापमान २० ते २८ अंश सेल्सिअस मर्यादित ठेवण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. म्हणजेच २० अंश सेल्सिअसच्या खाली जात येणार नाही. आणि बाहेर अति थंडी असली तरीही हीटिंग २८ अंशाच्या वर नेता येणार नाही. या प्रस्तावाचे मुख्य उद्दिष्ट हे ऊर्जा बचत हे आहे. हा नियम सध्या प्रस्ताव म्हणून सार्वजनिक तसेच व्यावसायिक ठिकाणांसाठी तसेच खाजगी जागांसाठी देखील लागू असेल. भविष्यात या प्रस्तावाचे कायद्यात रूपांतरण होईल.

# घटनेतील 'धर्मनिरपेक्ष' व 'समाजवादी' शब्दांवर संघाचा आक्षेप

नागपूर, दि. २७ प्रतिनिधी

स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिली आणि एकमेव आणीबाणी लागू करण्याला नुकतीच (२५ जून) ५० वर्षं पूर्ण झाली. यानिमित्त भारतीय जनता पार्टीने २५ जून हा काळा दिवस म्हणून पाळला. यात भाजपाची मातृसंस्था आरएसएस (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) देखील सहभागी होती. या आणीबाणीबद्दल बोलताना आरएसएसचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेतून 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' हे शब्द काढून टाकण्याबद्दल विचार करण्याची मागणी केली आहे.

काँग्रेसवर टीका करताना होसबाळे म्हणाले, "तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने २५ जून १९७५ रोजी आणबाणी जाहीर केली. तब्बल २१ महिने (२१ मार्च १९७७ पर्यंत) ही आणीबाणी कायम होती. या काळात सरकारने लोकांचं नागरी स्वातंत्र्य हिरावून घेतलं होतं. विरोधी पक्षांच्या नेत्यांवर व प्रसारमाध्यमांवर क्रूरपणे कारवाया



केल्या जात होत्या". दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात बोलताना होसबाळे यांनी हे वक्तव्य केलं आहे. यावेळी ते म्हणाले, "आणीबाणीच्या काळात काँग्रेस सरकारने घटनेच्या प्रस्ताविकेत समाजवादी व धर्मनिरपेक्ष हे शब्द जोडले होते, हे शब्द घटनेच्या प्रस्ताविकेत तसेच ठेवायचे का याबाबत विचार करायला हवा.

समाजवादी व धर्मनिरपेक्ष या संज्ञा आणीबाणीच्या कालखंडात काँग्रेसने घटनेत समाविष्ट केल्याचं नमूद करताना होसबाळे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानात मात्र या संज्ञा नव्हत्या. तत्कालीन इंदिरा गांधी यांच्या सरकारने ५० वर्षांपूर्वी देशावर आणीबाणी लादल्याबद्दल काँग्रेसने माफी मागावी अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली. इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ रोजी आणीबाणीची घोषणा केली आणि त्यानंतर सरकारने हजारो नागरिकांना तुरुंगात डांबून त्यांचा छळ केला होता. न्यायव्यवस्था व माध्यमांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध लादले. या गोष्टी ज्यांनी केल्या तेच आज देशभर घटनेच्या प्रती घेऊन फिरत आहेत, अशी टीका देखील होसबाळे यांनी केली.

भाजपाच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने २५ जून हा संविधान हत्येच्या दिवस म्हणून पाळला. याबद्दल बोलताना दत्तात्रेय होसबाळे म्हणाले, "१९७५ ते १९७७ या दोन वर्षांत आपल्या नागरिकांनी अमानवी अत्याचार सहन केले. आणीबाणीच्या काळात लोकांची सक्तीने नसबंदी करण्यात आली होती. जनतेचं नागरी स्वातंत्र्य देखील हिरावलं होतं. मात्र, जनतेने सरकारशी संघर्ष केला. त्यांच्या संघर्षाची आपण आठवण ठेवली पाहिजे".

# इइपिसी इंडियाची सरकारला अमेरिकेसोबतच्या BTA मध्ये क्षेत्रीय दरांचा समावेश करण्याची विनंती

इइपिसी इंडियाचे अध्यक्ष श्री. पंकज चढ्ढा यांनी अलिकडेच अमेरिकेने स्टील, ॲल्युमिनियम





आणि संबंधित उत्पादनांवरील कलम २३२ शुल्क २५% वरून ५०% पर्यंत वाढवण्याच्या निर्णयाबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, "इतकी तीव्र वाढ आमच्या निर्यातदारांसाठी एक धक्का आहे. आमच्या ऑटो क्षेत्रावरही परिणाम झाला आहे, त्याच

**नोंद**

कायद्यांतर्गत २५% शुल्क आकारले जात आहे. या शुल्कांचा परिणाम भारताच्या अमेरिकेला होणाऱ्या अभियांत्रिकी निर्यातीवर होतो, ज्यांचे मूल्य दरवर्षी २० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. आम्हाला आशा आहे की द्विपक्षीय व्यापार करार (BTA) मध्ये या क्षेत्रीय दरांना योग्यरित्या संबोधित केले जाईल."

श्री.चढ्ढा यांनी आशा व्यक्त केली की युरोपियन युनियन सोबत मुक्त व्यापार करार या वर्षाच्या सुरुवातीलाच स्वाक्षरी केला जाऊ शकतो, कारण यूकेसोबतचा व्यापार करार आधीच अंतिम झाला आहे आणि तो प्रमुख विकसित देशांसोबतच्या FTA साठी एक नमुना म्हणून पाहिला जातो.

श्री चढ्ढा यांनी नमूद केले की भारत-यूके FTA अंतिम झाला असला तरी, त्याच्या अंमलबजावणीसाठी सुमारे एक वर्ष लागू शकते. श्री चढ्ढा यांनी इयु ने कार्बन बॉर्डर ॲडजस्टमेंट मेकॅनिझम अंतर्गत प्रस्तावित केलेल्या कार्बन करापासून भारतीय एमएसएमइ साठी तीन वर्षांची स्थगिती सुचवली, जी जानेवारी २०२६ मध्ये लागू होईल. त्यांनी इयुच्या काही स्टील उत्पादनांवर सेफगार्ड ड्यूटी वाढवण्याच्या प्रक्रियेलाही हिरवा झेंडा दाखवला आणि इयु सोबत व्यापार करार अंतिम करताना त्यावर उपाय शोधण्याची विनंती सरकारला केली.


श्री दीपेंद्र सिंग कुशवाह, विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र हे पुरस्कार समारंभात विशेष पाहुणे होते.

आपल्या भाषणात श्री. कुशवाह म्हणाले, "आम्ही महाराष्ट्रातील निर्यातीला पाठिंबा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत आणि ते आमचे कर्तव्य आहे. परंतु मुख्य भूमिका तुमच्याकडून (निर्यात करणाऱ्या समुदायाकडून) येते. आम्ही फक्त सुविधा आणि पाठिंबा देतो. वास्तविक निर्यात तुमच्याकडून केली जाते आणि म्हणूनच महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे निर्यातदार राज्य आहे. महाराष्ट्रातील निर्यातीत अभियांत्रिकी क्षेत्र खूप महत्त्वाची भूमिका बजावते."

**चला पर्यटनाला**

# आंध्र प्रदेशातील गांडीकोटा

गांडीकोटा हे भारतातील ग्रँड कॅनियन म्हणूनही ओळखले जाणारे हे आंध्र प्रदेशातील एक छोटेसे गाव आहे. हे बेलम लेण्यांपासून थोड्या अंतरावर वसलेले आहे आणि तिथून पेन्ना नदी वाहते. शहरात वसलेला गांडीकोटा किल्ला हे एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे कारण ते भूतकाळातील अप्रतिम वास्तुकलेवर



प्रकाश टाकते. हे आंध्र प्रदेश प्रसिद्ध ठिकाण आंध्र प्रदेशच्या हृदयापासून फक्त 5 तासांच्या अंतरावर आहे, परंतु सार्वजनिक वाहतुकीद्वारे देखील या ठिकाणी पोहोचता येते.तिरुपती या भगवान व्यंकटेश्वराच्या मंदिराबद्दल कोणी ऐकले नाही? हे हिंदूसाठी सर्वात प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे आणि आंध्र प्रदेशातील सर्वोत्तम पर्यटन स्थळ आहे. हे तिरुमाला येथे आहे, तिरुपतीच्या सात टेकड्यांपैकी एक. स्थापत्य आणि पायवाट या दोन्ही बाबतीत हे मंदिर भव्य आहे. मंदिराला दररोज 50,000 यात्रेकरू भेट देतात आणि दररोज लाखो देणगी प्राप्त करतात. हिंदू संस्कृतीची भव्यता जाणून घेण्यासाठी या मंदिराला भेट द्यायलाच हवी.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# हिंजवडी आयटी पार्कचा पालिकेत समावेश करा

## नागरिकांसह आयटीयन्सचे आंदोलन

हिंजवडी, दि. २७ प्रतिनिधी

पुण्यातील आयटी पार्क म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडीमध्ये वाहतूक कोंडी, पावसाच्या पाण्याने होणारी तुंबई आता नित्याचीच झाली आहे. रस्त्यांवर पडलेले खड्डे, तासनतास वाहतूक कोंडीत होणारी दैना अन् विविध मुलभूत समस्या इथल्या नागरिकांना भेडसावत आहेत. याचविरोधात आता हिंजवडीकरांनी आक्रमक भूमिका घेतली असून हिंजवडी माण चा समावेश नजिकच्या महापालिकेमध्ये करा, अशी मागणी केली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, आयटीनगरी हिंजवडी माण आणि आसपासच्या गावांचा समावेश महानगरपालिकेत करावा यासाठी हिंजवडी मधील आयटीयन्स आणि ग्रामस्थ हिंजवडी मधील छत्रपती शिवाजी महाराज एकवटले आहेत. पिंपरीच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये हे आंदोलन सुरु असून आम्हाला महापालिकेत सहभागी करून घ्या अशी ग्रामस्थ आणि आयटी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. हिंजवडीत आय टी हब आल्यापासून विविध मूलभूत समस्यांनी नेहमीच हा आय टी पार्क वंचित राहीला आहे. तासनतास हिंजवडीमधील वाहतूक कोंडीमध्ये आयटीयन्स वेळ घालवून कंपनीमध्ये पोचावे लागत आहेत, त्यातच रस्तावर पडलेले खड्डे, नैसर्गिक ओढे नाले बुजवल्यामुळे 4 ते 5 फुटांपर्यंत रस्तावर पाणी साचत आहे.

# प्रसुतीसाठी आलेल्या महिलेच्या पोटाला जेलऐवजी ॲसिड लावले

जालना, दि. २७ प्रतिनिधी

प्रसूतीसाठी दाखल झालेल्या महिलेच्या पोटाला प्रसूतीपूर्वी सोनोग्राफी करताना जेली ऐवजी ऍसिड लावल्याचा संतापजनक प्रकार जालन्यामधून समोर आला आहे. जालन्याच्या भोकरदान येथील ग्रामीण रुग्णालयात हा प्रकार घडला. या घटनेनंतर महिलेने गोंडस बाळाला जन्म दिला असून महिला गंभीर भाजल्याने तिच्यावर भोकरदन ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

भोकरदन ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल असलेल्या महिलेची प्रसूतीपूर्वी सोनोग्राफी करताना महिलेच्या पोटाला जेलीऐवजी नर्सकडून ऍसिड लावण्यात आल्याने महिला गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. शिला संदीप भालेराव असे या प्रसूतीसाठी दाखल असलेल्या महिलेचे नाव आहे. सोनोग्राफीच्या अर्ध्या तासानंतर या महिलेने गोंडस बाळाला जन्म ही दिला आहे. बाळ सुखरूप आहे. मात्र महिलेल्या पोटासह अवघड जागा भाजल्याने महिलेवर उपचार सुरू आहेत. ऍसिडचे इन्फेक्शन झाल्याने महिला गंभीर भाजली आहे.

ग्रामीण रुग्णालयातील ब्रदरने सोनोग्राफी रूममध्ये औषधाच्या ट्रेमध्ये सोल्युशनऐवजी ऍसिड ठेवल्याने चुकून नर्सकडून ऍसिड लागले असल्याची माहिती रुग्णालयात प्रशासनकडून नातेवाईकांना देण्यात आली. मात्र सोनोग्राफी दरम्यान पोटातील बाळाचे ठोके चेक करताना नर्सने पोटावर ऍसिड टाकल्यानंतर गर्भवती महिला ओरडू लागल्याने नातेवाईकांनी नर्सला विचारणा केली. यावेळी नर्सने त्यांच्यावरच आरडाओरड करून रुग्णालयातून दोन तास पसार झाली होती असा गंभीर आरोप ही महिलेच्या नातेवाईकांनी केला आहे. दरम्यान महिला गंभीर भाजल्याने तिच्यावर भोकरदन ग्रामीण रुग्णालयातचं उचार केल्या जातं आहे. या घटनेने भोकरदन ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.

# विदर्भात पुन्हा एकदा मुसळधार पावसाचा इशारा

नागपूर, दि. २७ प्रतिनिधी

येत्या २४ तासांमध्ये नागपूर आणि आसपासच्या परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. यंदा राज्यात वेळेपूर्वीच मान्सूनचं आगमन झालं होतं, सामान्यपणे राज्यात मान्सून ७ जून रोजी दाखल होतो, मात्र यावेळी तब्बल १२ दिवस आधीच म्हणजेच २५ मे रोजीच राज्यात पावसानं एन्ट्री केली. दरम्यान येत्या २४ तासांमध्ये नागपूर आणि आसपासच्या परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. बुधवारी रात्री पावसाने धुवाधार हजेरी लावली, मात्र गुरुवारी दिवसभर फक्त ढगाळ वातावरण होतं, त्यानंतर गुरुवारी संध्याकाळपासून पावसाची रिपरिप जिल्ह्यात सर्वत्र सुरू झाली, सावनेर तालुक्यात सर्वाधिक 56 मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101